सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ | वर्ष ३ रे अंक ३३० | पाने १२ | किंमत रु. ६/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com


## विचारपुष्प



नित्याच्या आधारावर संस्कार प्रदान करण्याच्या सक्षम साधनांपैकी सर्वांत पहिले साधन आहे मनुष्य. त्या साधनांमध्ये उपरोक्त माता, पिता व आचार्य यांच्याशिवाय महापुरुष, गुरुजन, बंधुजन, मित्रमंडळी इत्यादी येतात. संस्कार प्रदान करण्याच्या कार्यात या सर्वांचा प्रभाव असतो. यांच्याही शिवाय संत, महात्मा, परिव्राजक, साधू, धर्माचार्य, प्रवचनकार, कीर्तनकार इत्यादी विभूती संस्करणाच्या प्रक्रियेची चेतनायुक्त साधने आहेत.

**- रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## विनम्र अभिवादन



महात्मा गांधी यांचा आज स्मृतिदिन.

# अर्थव्यवस्था वृद्धीचा दर ७.२ टक्के राहणार

**● ग्रामीण-शहरी भागातील मागणीत संतुलन ● पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीने रोजगार, उत्पन्नात वाढ**


◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

पायाभूत सुविधांवर वाढविलेला खर्च आणि विविध देशांसोबत झालेल्या द्विपक्षीय करारामुळे गुंतवणुकीला मिळालेली चालना मिळाली आणि जागतिक अस्थिरतेच्या परिस्थितीत देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग वाढला आहे. एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था वृद्धीचा दर ६.८ ते ७.२ टक्क्यांपर्यंत राहणार आहे, तर चालू आर्थिक वर्षात अर्थव्यवस्थेचा दर ७.४ टक्के असेल. डॉलरच्या तुलनेत रुपयाची होणारी घसरण अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारी नसल्याचे आर्थिक सर्वेक्षण अहवालात म्हटले आहे.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी गुरुवारी लोकसभेत आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला. या अहवालात २०२५-२६ या वर्षातील आर्थिक कामगिरी आणि प्रमुख निर्देशकांचा आढावा घेण्यात आला आणि पुढील आर्थिक वर्षासाठीचा दृष्टिकोन सादर केला. विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी चलनाचे दर स्थिर राहणे आवश्यक आहे. परकीय चलनाचा साठा कमी झाल्याने डॉलर्सच्या तुलनेत रुपया काही प्रमाणात घसरला, तरी इतर घटकांच्या कामगिरीमुळे अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम अल्प राहील असेही अहवालात नमूद आहे.

उच्च किमतीत कच्च्या तेलाची आयात करावी लागली तरी, महागाई आटोक्यात राहील. केंद्र सरकारच्या उपाययोजनांमुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था अधिक वेगवान राहील. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये वित्तीय तूट ४.४ टक्क्यांवर आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. बाँड्या माध्यमातून निधी उभारून वित्तीय स्थिती मजबूत करण्यास मदत झाल्याचे अहवालात नमूद आहे.

अमेरिकेने ५० टक्के व्यापार शुल्क आकारले असताना एप्रिल-डिसेंबर कालावधीत निर्यातीत २.४ टक्के, सेवा क्षेत्रात ६.५ टक्के, तर याच काळात आयातीत ५.९ टक्क्यांनी वाढ झाली. जीएसटी सुधारणांमुळे जागतिक अनिश्चिततेचे रूपांतर संधीत झाले. ◂(वृत्तसंस्था)




### अहवालातील ठळक मुद्दे

- अहवालात सार्वजनिक आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेच्या बदलावर भर
- हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधीचे विकार, मधुमेह, लठ्ठपणा आणि मानसिक आरोग्यावर भर देण्याच्या सूचना
- रस्ते, रेल्वे, लॉजिस्टिक्स आणि डिजिटल पायाभूत सुविधांवर सरकारी खर्च वाढल्याने आर्थिक हालचालींना चालना
- मजबूत परकीय चलन साठा, स्थिर बँकिंग व्यवस्था आणि धोरणात्मक विश्वासार्हता भारतासाठी संरक्षणात्मक कवच.
- चलन स्थिरतेसाठी निर्यात वाढवणे आवश्यक. मूल्यवर्धित आणि तंत्रज्ञानावर आधारित निर्यातीवर विशेष भर देण्याची शिफारस
- येत्या काळात नवीन तंत्रज्ञानावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करणार. सोने-चांदीतील अभूतपूर्व वाढीवर सरकारचे लक्ष
- बेरोजगारीचा दर सातत्याने कमी होत आहे, २०१७-१८ मध्ये तो ६ टक्के होता. २०२३-२४ मध्ये ३.२ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. शहरी बेरोजगारीचा दरही किंचित सुधारला. एप्रिल-डिसेंबर कालावधीत निर्यातीत २.४ टक्के वाढ झाली.

### कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे



विकसित राष्ट्राचे लक्ष साध्य करण्यासाठी कृषी क्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे. रासायनिक खतांची गरज पूर्ण करण्यासाठी प्रकल्पांना प्राधान्य, संशोधनाला चालना, सिंचन व्यवस्था मजबूत करणे आणि शेतमाल साठवणुकीची व्यवस्थेवर भर द्यावा लागणार आहे. मका, सोयाबीन, डाळींसह अनेक पिकांचे उत्पादन सरासरीपेक्षा कमी आहे. ■

### औषध उत्पादनात भरीव वाढ



औषध उत्पादनात भारत तिसऱ्या स्थानावर आहे. डिसेंबरपर्यंत १९१ देशांमध्ये औषधांची निर्यात करण्यात आली. या क्षेत्राची वार्षिक उलाढाल ४.७२ लाख कोटींवर आहे. एकूण निर्यातीत या क्षेत्राचा वाटा ७ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. ५० टक्क्यांपेक्षा जास्त निर्यात अमेरिका, युरोपात केली जाते. ■

## दोन माओवाद्यांचा बिजापुरात खात्मा

◆ **बिजापूर, २९ जानेवारी**

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात गुरुवारी झालेल्या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन माओवाद्यांचा खात्मा केला, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली.

जिल्हा राखीव रक्षक दलाचे पथक नक्षलविरोधी अभियानासाठी गेले असताना जिल्ह्याच्या दक्षिणेकडील जंगलात सकाळी सात वाजताच्या सुमारास ही चकमक झडली. आतापर्यंत दोन माओवाद्यांचे मृतदेह घटनास्थळी आढळले. जवानांनी चकमकस्थळावरून एके-४७ रायफल, नऊ मिमी व्यासाचे पिस्तूल, इतर शस्त्रे आणि स्फोटकांचा साठा जप्त केला, असे अधिकाऱ्याने सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## ११ हजारांनी वाढले सोने;चांदीचाही उच्चांक

**नवी दिल्ली :** चांदी-सोन्याचे दर सलग चौथ्या दिवशी विक्रमी उच्चांकावर पोहोचले आहेत. इंडिया बुलियन ॲण्ड ज्वेलर्स असोसिएशननुसार, २९ जानेवारी रोजी १० ग्रॅम २४ कॅरेट सोन्याचा भाव ११,४८६ रुपयांनी वाढून १,७६,१२१ रुपयांवर पोहोचला आहे. तीन दिवसांत सोने २१,८११ रुपयांनी महागले आहे. यापूर्वी २३ जानेवारीला सोन्याचा भाव १,५४,३१० रुपये/१० ग्रॅम होता. ■

# जि. प., पं. स. निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांत बदल

**● ५ ऐवजी ७ फेब्रुवारीला मतदान ● ९ फेब्रुवारीला मतमोजणी**

◆ **मुंबई, २९ जानेवारी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला. त्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून, ५ ऐवजी आता ७ फेब्रुवारी रोजी मतदान; तर ७ ऐवजी ९ फेब्रुवारीला मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारीला निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यासारख्या टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारीच्या पुढे दोन आठवड्यांची मुदतवाढ दिली आहे. परंतु, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी अपघाती निधन झाल्यामुळे शासनाने राज्यात २८ ते ३० जानेवारीपर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला. ◂(तभा वृत्तसेवा)

# आजचा काळ व्यवधानाचा नव्हे, तर तोडग्यांचा : पंतप्रधान मोदी

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

संसदेचे कामकाज सुरळीत चालवण्यासाठी सर्व सदस्यांनी सहकार्य करावे. आजचा काळ हा व्यवधानाचा नाही तर, तोडग्यांचा आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केले.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील दुसऱ्या दिवसाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी आज नवीन संसद भवनातील हंस द्वारासमोर पत्रकारांशी बोलताना मोदी म्हणाले की, आजचा काळ हा कामकाजात अडथळा आणण्याचा नाही तर चर्चेतून कोणत्याही समस्येवर तोडगा काढण्याचा आहे. त्यामुळे आमच्या सर्वांचे प्राधान्य समस्या निर्माण करण्याला नव्हे, तर त्यावर तोडगा काढायला असले पाहिजे. ही हिंमत, समाधान आणि निर्णय घेण्याची वेळ आहे. त्यामुळे सर्व सदस्यांनी देशासमोरच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने आवश्यक निर्णयाला गती देण्यासाठी आपल्या ऊर्जेचा वापर केला पाहिजे. जेणेकरून अशा निर्णयाचा फायदा देशाला नेहमीसाठी होत राहील.




युरोपियन देशांसोबत झालेल्या व्यापारी कराराचा उल्लेख करीत मोदी म्हणाले की, या शतकातील दुसऱ्या टप्प्यातील २५ वर्षांची सुरुवातच युरोपियन देशांसोबतच्या कराराने झाली आहे. अशा करारांमध्ये देशातील तरुणांच्या उज्ज्वल भविष्याचे संकेत आहे.

भारत आणि युरोपियन देशांत झालेल्या 'मदर ऑफ ऑल डील' अशा करारामुळे देशातील उद्योग तसेच निर्मिती क्षेत्रासाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. देशातील उद्योग क्षेत्राने याचा फायदा घेतला पाहिजे. या करारामुळे आपल्याकडे उत्पादित वस्तू युरोपियन बाजारपेठेत उपलब्ध करून देण्याची संधी भारतीय उद्योग क्षेत्राला प्राप्त झाली आहे. अशी खुली बाजारपेठ मिळाल्यामुळे ग्राहकांचा विश्वास जिंकण्यासाठी सर्व उद्योजकांनी आपल्याकडील दर्जेदार वस्तू या बाजारात पोहोचवल्या पाहिजे, असे मोदी म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)

## महत्त्वाचे

### शेवटच्या तासाभरात बाजाराची झेप

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारासाठी गुरुवारचा दिवस चमत्कारिक ठरला. सत्राच्या सुरुवातीला घसरणीच्या गर्तेत असलेला बाजार शेवटच्या एका तासात फिनिक्स पक्ष्यासारखा झेपावला.



निर्देशांक आणि निफ्टी खालच्या स्तरावरून एक टक्क्यांहून अधिक वधारले. विदेशी गुंतवणूकदारांनी १५ दिवसांनंतर केलेल्या खरेदीमुळे आणि धातू शेअर्समधील ऐतिहासिक तेजीमुळे बाजाराने हिरव्या निशाणीत निरोप घेतला. विदेशी गुंतवणूकदारांनी रोख बाजारात तब्बल ४८० कोटींची खरेदी केली.

## अजित पवारांवरील आरोप मागे घ्यावेत : संजय राऊत

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाजपकडून देण्यात आलेल्या पानभर श्रद्धांजली जाहिरातींवरून नवा राजकीय वाद उफाळून आला आहे. उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार टीका करत, जाहिराती देणे ही श्रद्धांजली नाही, तर अजित पवारांवर लावलेले ७० हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल, असा थेट हल्लाबोल केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही राऊत यांनी यावेळी स्पष्ट सल्ला दिला आहे.

# 'दादा परत या'

## शोकाकुल बारामतीत अजितदादांना अखेरचा दंडवत

**● शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार ● कार्यकर्त्यांचा टाहो, कुटुंबीयांच्या हुंदक्यांनी राज्य गहिवरले**

◆ **बारामती, २९ जानेवारी**

बुधवारी सकाळपासूनच सतत अश्रू ढाळत असलेले बारामतीकरांचे हृदय अखेर गुरुवारी दादांच्या धगधगत्या चितेसमोर धाय मोकलून रडले. लाखो चाहत्यांचा दंडवत स्वीकारत दादा अनंतात विलीन झाले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी शोकाकुल वातावरणात अन्त्यसंस्कार करण्यात आला. त्यांचे पुत्र पार्थ आणि जय यांनी अन्त्यसंस्काराचे सर्व विधी पूर्ण करीत दादांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अन्त्यसंस्कारासाठी पवार कुटुंबीय, आप्तेष्ट आणि मोठ्या नेत्यांसह कार्यकर्ते तसेच दादांचे लाखो चाहते आवर्जून हजर होते.



तत्पूर्वी, सकाळी सहा वाजेपासून काटेवाडी येथे दादांचे पार्थिव तीन तास अन्त्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. काटेवाडीहून विद्या प्रतिष्ठानपर्यंत दादांची अन्त्ययात्रा निघाली तेव्हा रस्त्याच्या बाजूला हजारो नागरिकांनी साश्रू नयनांनी दादांना निरोप दिला. अन्त्यसंस्कारावेळी उसळलेला जनसागर पाहून दादांची लोकप्रियता किती होती, याची साक्ष देशाला पटली.

**शरद पवार गहिवरले**

अजितदादांचे पार्थिव अन्त्यसंस्कारासाठी चितेजवळ ठेवले असताना त्यांचे काका शरद पवार एकटक आपल्या पुतण्याकडे पाहत होते. ज्या क्षणी दादांना खऱ्या अर्थाने अखेरचा निरोप देण्याची वेळ आली तेव्हा शरद पवारांना अश्रू अनावर झाले आणि त्यांनी पुतण्याला हात जोडत आकाशाकडे पाहिले.

**अमित शाह, नितीन नवीन यांची उपस्थिती**

अन्त्यदर्शनासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, चंद्रबाबू नायडू यांचे चिरंजीव नारा लोकेश, राहुल नार्वेकर, नीलम गोरे, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, सुशीलकुमार शिंदे, पृथ्वीराज चव्हाण, मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, रितेश देशमुख, रवींद्र चव्हाण, शशिकांत शिंदे, मीरा कुळकर्णी, विजयसिंह मोहिते पाटील, अमोल कोल्हे, छगन भुजबळ, प्रफुल्ल पटेल, हसन मुश्रीफ, सुनील तटकरे, आदिती तटकरे, दत्ता भरणे, शिवेंद्रसिंहराजे भोसले, संजय कुटे उपस्थित होते. ◂(तभा वृत्तसेवा)




# अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू

## एएआयबी संस्थेने घेतली जबाबदारी, मुख्यमंत्री फडणवीसांच्या पत्राची केंद्राकडून दखल

**मुंबई, दि.२९ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बुधवारी विमान अपघातात दुर्दैवी अंत झाला. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण महाराष्ट्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. मुंबईहून बारामतीच्या विमानतळावर लँड करत असतानाच त्यांच्या विमानाचा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील सर्वांचाच मृत्यू झाला आहे. आता हा अपघात नेमका कशामुळे झाला, याची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आता याची चौकशी एएआयबी या संस्थेने सुरू केली असल्याची माहिती समोर आली आहे.



विमान अपघात तपास ब्यूरो या संस्थेने अपघाताची चौकशी सुरू केली असून त्याचा अहवाल आल्यानंतर तो राज्य सरकारलाही पाठवण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अपघाताची चौकशी करावी असे पत्र केंद्रीय उड्डाण मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांना लिहिले होते. त्या पार्श्वभूमीवर या अपघाताची चौकशी सुरू करण्यात आली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या पत्रावर प्रतिक्रिया देताना मंत्री किंजरापु राममोहन नायडू यांनी म्हटले की, विमान अपघात ब्यूरो या संस्थेने तपास सुरू केला आहे. विमानातील ब्लॅकबॉक्स ताब्यात घेण्यात आला आहे. विमान अपघात आणि घटना नियमांनुसार, तपास सुरू केला आहे. तो पारदर्शी आणि कालबद्ध पद्धतीने होईल.

**राज्य सरकारलाही दिला जाणार चौकशीचा अहवाल**

तसेच पुढे बोलताना किंजरापु राममोहन नायडू म्हणाले, या अपघातातील सर्व टेक्निकल रेकॉर्ड्स, ऑपरेशनल तपशील, घटनास्थळावरील तथ्य याचा तपास केला जात आहे. भविष्यात अशा घटना होऊ नयेत, या आपल्या विनंतीची मंत्रालयाने दखल घेतली असून, चौकशी अहवाल येताच त्यादृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. या चौकशीत महाराष्ट्र सरकारचेही सहकार्य आम्हाला मौल्यवान असेल. स्थानिक प्रशासनाची यात मदत लागेल. हा संपूर्ण चौकशी अहवाल राज्य सरकारलाही आम्ही देऊ, अशी माहिती नायडू यांनी दिली आहे.

**देवेंद्र फडणवीस यांनी केली होती मागणी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवलेल्या पत्रात असे म्हटले की, अजित पवार यांच्यासारख्या अतिशय वरिष्ठ नेत्याचा विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्यासह आणखी ४ जणांना यात प्राण गमवावे लागले. हा अपघात नेमका कशामुळे घडला, याच्या कारणांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच भविष्यात असे अपघात घडणार नाहीत या दृष्टीने तातडीने पाऊले उचलण्यात यावी, अशी देखील मागणी फडणवीसांनी पत्रातून केली होती.




# कर्तव्यपथावर महाराष्ट्राचा चित्ररथ अव्वल

**● मंत्रालयांमध्ये संस्कृती मंत्रालयाचा चित्ररथ सर्वोत्कृष्ट ● नौदलाचे मार्चिंग पथक तिन्ही दलांमध्ये आकर्षक**

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

प्रजासत्ताक दिन परेड-२०२६ च्या विजेत्यांची नावे जाहीर करण्यात आली असून, यामध्ये भारतीय नौदलाच्या मार्चिंग पथकाला तिन्ही दलांमध्ये सर्वोत्तम मानण्यात आले. राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये महाराष्ट्राने सर्वोत्तम चित्ररथांच्या यादीत अव्वल स्थान पटकावले. यामध्ये गणेशोत्सवाला आत्मनिर्भरतेचे प्रतीक म्हणून दर्शवण्यात आले होते.




### चित्ररथात मराठी रंगभूमी आणि गणेशोत्सव

महाराष्ट्राच्या चित्ररथात कला प्रतिष्ठानांच्या मालिकेत मराठी चित्रपट आणि नाट्यसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते आणि संगीतकार, विष्णुपंत पागनीस यांना गाणे रेकॉर्ड करताना दाखवण्यात आले होते तसेच फाशीला सामोरे जाणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची आणि तिरंगा हातात घेतलेल्या भारतमातेची प्रतिमाही दाखवण्यात आली होती. पागनीस यांनी गायलेल्या गाण्याच्या १९२८ च्या दुर्मिळ रेकॉर्डिंगचे चित्रण होते, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. ■

पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या महिलांनी चित्ररथाच्या दोन्ही बाजूंनी लोकनृत्य सादर केले. संस्कृती मंत्रालयाच्या 'वंदे मातरम्'च्या १५० वर्षांच्या वारशाचा उत्सव साजरा करणारा चित्ररथ मंत्रालये आणि विभागांच्या श्रेणीत विजेता ठरला. अधिकाऱ्यांनी सांगितले की, ३० जानेवारी रोजी राष्ट्रीय रंगशाळा कॅम्पमध्ये पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन केले जाईल. ◂(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री करा

## मंत्री नरहरी झिरवाळ यांची मागणी

**बारामती, दि.२९ जानेवारी-**

अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होत असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकारणात मोठी खळबळ उडवणारे वक्तव्य समोर आले आहे. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ यांनी थेट सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी करत अजित पवार यांच्या पश्चात निर्माण झालेल्या नेतृत्वाच्या प्रश्नावर स्पष्ट भूमिका मांडली आहे. झिरवाळ यांच्या या विधानानंतर राज्याच्या राजकारणात आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नव्या हालचालींना वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचे समोर आले आहे. मात्र, ही भेट नेमकी कशाबद्दल होती, याची माहिती अजून पुढे आली नाही. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय सन्मानात अंत्यसंस्कार करण्यात आले. बुधवारी बारामतीत झालेल्या भीषण विमान अपघातात अजित पवार यांचे निधन झाले होते. त्यांच्या अंतिम दर्शनासाठी आणि अंत्यसंस्कारासाठी बारामतीत हजारोंचा जनसागर उसळला होता. सर्वसामान्य नागरिकांपासून ते राजकीय नेत्यांपर्यंत, प्रत्येकाच्या डोळ्यांत अश्रू होते. आपल्या लाडक्या 'दादा'ला अखेरचा निरोप देताना संपूर्ण बारामती भावुक झाली होती.

अजित पवार यांच्या पार्थिवाला त्यांचे पुत्र



पार्थ पवार आणि जय पवार यांनी मुखाग्नी दिला. चिता पेटताना उपस्थितांची मने सुन्न झाली होती. अंत्यसंस्काराच्या संपूर्ण विधी दरम्यान पार्थ पवार आणि जय पवार हेच प्रमुखपणे समोर उभे राहून सर्व मान्यवरांच्या भेटी घेत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि पवार कुटुंबातील इतर सदस्य खाली बसून होते. त्यामुळे अनेकांच्या नजरा पार्थ आणि जय पवार यांच्यावर खिळल्या होत्या. अजित पवार यांचे राजकीय वारसदार म्हणून हे दोघे पुढे येणार, असे संकेत यातून मिळाल्याची चर्चा सुरू झाली.

अजित पवार हे केवळ राज्याचे उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते अर्थमंत्री, बारामती विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे या जागा कोण भरणार, पक्षाची धुरा कोण सांभाळणार आणि सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका काय असेल, असे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर अजित पवारांच्या अंत्यसंस्कारानंतर लगेचच नरहरी झिरवळ यांनी केलेल्या वक्तव्याने या चर्चांना अधिकच धार दिली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरहरी झिरवाळ यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट शब्दांत सांगितले की, अजित पवार यांच्यानंतर सुनेत्रा पवार यांना राज्याचे उपमुख्यमंत्रीपद देण्यात यावे. झिरवाळ यांच्या या मागणीने राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी पक्षाने तातडीने निर्णय घ्यावा, असा संकेत या विधानातून देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अंत्यसंस्काराच्या दिवशीच अशी मागणी समोर आल्यामुळे तिचे राजकीय महत्त्व अधिक वाढले आहे.

पवार कुटुंबीय हे कायमच राजकारणात प्रॅक्टिकल आणि दूरदृष्टीने विचार करणारे मानले गेले आहेत. परिस्थितीची गरज, पक्षाची दिशा आणि सत्तासमीकरणे ओळखून निर्णय घेण्याची परंपरा या कुटुंबाची राहिली आहे. त्यामुळे एका बाजूला अजित पवार यांच्या जाण्याचे दुःख असले, तरी दुसऱ्या बाजूला राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये कोणतीही निर्नायकी अवस्था निर्माण होऊ नये, यासाठी हालचाली सुरू झाल्याचे चित्र आहे.

# राकाँसमोर राष्ट्रीय अध्यक्षासह उपमुख्यमंत्रिपदासाठी पेच?

## दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण की स्वतंत्र गट राहणार?

### पवार कुटुंबीयांच्या निर्णयाकडे राज्याचे लक्ष

**मुंबई २९ जानेवारी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या आकस्मिक निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या होऊ घातलेल्या विलीनीकरणाचे काय, असा प्रश्न दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांना पडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी व राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदावर कुणाची निवड करावी, असा पेच या पक्षात निर्माण झाला. त्यामुळे या दोन्ही आव्हानांवर शरद पवार आणि संपूर्ण पवार कुटुंबीय काय निर्णय घेतात यावर दोन्ही अजित पवार व शरद पवार यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांसह नेत्यांचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या निवडणुकीदरम्यान राकाँचे दोन्ही गट एकत्र येण्याच्या मार्गावर असल्याचे संकेत खुद्द अजितदादा पवार यांनी दिले होते. त्यानुसार दोन्ही पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरही हालचाली सुरू झाल्या होत्या. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर दोन्ही गटांच विलीनीकरण करण्यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले होते. मात्र, अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राकाँच्या शरद पवार आणि अजित पवार गटासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. देश आणि राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती पाहता, दोन्ही गटांना आधार देणाऱ्या आणि सोबत घेऊन चालणाऱ्या नेतृत्वाची नितांत गरज निर्माण झाली आहे.

दोन्ही पक्षांचे विलीनीकरण झाल्यास उपमुख्यमंत्रिपद तसेच राष्ट्रीय अध्यक्षपद आणि विधिमंडळाच्या नेतेपदा बाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. दोन्ही गटांचे विलीनीकरण न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी, विधिमंडळ पक्ष नेतेपदी आणि उपमुख्यमंत्रिपदी कुणाची निवड करायची हा निर्णयही लवकरच घ्यावा लागणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### अजित पवार गटाच्या नेत्यांची चर्चा?

अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे अजित पवार गटाच्या मंत्र्यांसह नेत्यांमध्ये मोठा राजकीय पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे अजित पवार गटाच्या नेत्यांची एक बैठक झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्रिपदाचा चेहरा आणि विधिमंडळ पक्ष नेतेपदाच्या चेहऱ्यावर चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

ऑनलाईन तभा वाचण्यासाठी
epaper.dainiktarunbharat.com
वर भेट द्या!



हिमालय पर्वतराजींमध्ये सध्या तुफान बर्फवृष्टी सुरू आहे. हिमाचल प्रदेशातील मंडी येथील पराशर तलावावर चढलेली बर्फाची जाड चादर. बर्फवृष्टीमुळे निसर्गाचे सौंदर्य अधिकच खुलले आहे

# कापूस उत्पादकांना हेक्टरी ५० हजार रुपये पीक विमा द्या

### शेतकरी संघटनेची मागणी

**यवतमाळ, २९ जानेवारी**

यवतमाळ जिल्ह्यात खरीप हंगामात कापसाचे उत्पादन २०२४-२५ च्या तुलनेत ६७ टक्के कमी झाल्याने जिल्ह्यातील कापूस उत्पादकांना हेक्टरी ५० हजार रुपये पीकविमा देण्यात यावा, अशी मागणी शेतकरी संघटना विज्ञान व तंत्रज्ञान आघाडीचे आघाडी प्रमुख मिलिंद दामले यांनी केली.

यवतमाळ जिल्ह्यात शेतकऱ्यांनी आजपर्यंत सीसीआय व खाजगी व्यापाऱ्यांना १४ लाख क्विंटल कापूस विकला आहे. १०० किलो कापसात ३५० किलो रुई व ६५ किलो सरकीचे उत्पादन होते. कापसाची एक गाठ १७० किलोची असते. या हिशेबाने यवतमाळ जिल्ह्यात २,८८,२३५ कापसाच्या गाठी उत्पादित झाल्या आहेत.

कृषी आयुक्तालयाच्या सांख्यिकी विभागाने जिल्ह्यात खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये कापसाच्या ८,७३,५०७ गाठींचे उत्पादन झाल्याचे कळवले आहे. याचा अर्थ खरीप हंगाम २०२४-२५ च्या तुलनेत यंदा कापसाची आवक फक्त ३३ टक्के कापसाची नापिकी झाली आहे. यंदाच्या खरीप हंगामात जिल्ह्याची एकूण पेरणी ८,८६,९१४ हेक्टर असून, कापूस पेरणी क्षेत्र ४,९६,९१६ हेक्टर आहे. जिल्ह्याच्या एकूण खरीप पीक पेरणीच्या तुलनेत कापसाचे क्षेत्र ५६ टक्के आहे.

कापसाची आजवरची आवक फक्त तीन क्विंटल प्रती हेक्टर असून, कापसाचे पीक कर्ज ७५,००० रुपये प्रती हेक्टर आहे. जिल्ह्याची कापूस आवक तीन क्विंटल प्रती हेक्टर विचारात घेतल्यास पीक कर्ज २५,००० रुपये क्विंटल, तर कापसाचे किमान आधारभूत दर ८,११० रुपये क्विंटल आहे. ◂(तभा वृत्तसेवा)



### राज्यात यवतमाळ जिल्ह्याचा वाटा १३ टक्के

या खरीप हंगामात राज्याचे कापूस पेरणी क्षेत्र ३८,५४,७२५ हेक्टर, तर यवतमाळ जिल्ह्याचे ४,९६,९१६ हेक्टर आहे. म्हणजेच राज्याच्या कापूस पेरणी क्षेत्रात यवतमाळ जिल्ह्याचा वाटा १३ टक्के आहे, याकडे शेतकरी संघटनेने लक्ष वेधले आहे.

## महत्त्वाचे

### मेलानिया ट्रम्पचा माहितीपट ब्रिटनमध्ये फ्लॉप

**लंडन** : मेलानिया ट्रम्प यांच्यावरील 'मेलानिया' हा माहितीपट चित्रपट ब्रिटनमध्ये फ्लॉप झाला आहे. लंडनमध्ये शुक्रवारी स्क्रीनिंगसाठी फक्त एक तिकीट विकले गेले आहे, तर संध्याकाळी ६ वाजताच्या स्क्रीनिंगसाठी दोन तिकिटे विकली गेली आहेत. लंडनच्या व्ह्यू थिएटर्समध्ये एकूण २८ नियोजित स्क्रीनिंगसाठी अजूनपर्यंत एकही तिकीट विकले गेले नाही. हा चित्रपट अमेरिकेच्या पहिल्या महिला मेलानिया ट्रम्प यांच्या जीवनाची झलक दाखवतो. अमेझॉनने हा माहितीपट ब्रिटनमधील १०० पेक्षा जास्त चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित केला.

### बांगलादेशात हिंसक संघर्षात जमात नेता ठार

**ढाका** : बांगलादेशातील शेरपूर जिल्ह्यात एका कार्यक्रमादरम्यान बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) आणि जमात समर्थकांमध्ये झालेल्या संघर्षात जमात नेते मौलाना मोहम्मद रेजाऊल करीम (४२) यांचा मृत्यू झाला. त्यांना गंभीर अवस्थेत मयमनसिंग मेडिकल कॉलेज रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे त्यांनी बुधवारी रात्री सुमारे ९:४५ वाजता अखेरचा श्वास घेतला. ते शेरपूरच्या श्रीबर्दी उपजिल्हा जमात युनिटचे सचिव होते. हा हिंसाचार झेनेगाती उपजिल्हा मिनी स्टेडियममध्ये घडली. येथे प्रशासनातर्फे एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये शेरपूर-३ जागेवरून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना मतदारांसमोर आपला जाहीरनामा सादर करण्यासाठी बोलावण्यात आले होते.

### दोन वर्षांत अफगाणिस्तानला परतले ४८ लाख लोक

**काबुल** : अफगाणिस्तानच्या लोकसंख्येत दोन वर्षांत १२ टक्के वाढ झाली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या एजन्सीनुसार, डिसेंबर २०२३ ते डिसेंबर २०२५ पर्यंत सुमारे ४८ लाख अफगाणी स्थलांतरित इराण आणि पाकिस्तानमधून आपल्या देशात परतले आहेत. यामुळे देशाच्या लोकसंख्येत इतका फरक पडला आहे. २०२५ मध्ये २७ लाख लोक परतले. दररोज सरासरी १० हजार लोक अफगाणिस्तानला परत येत आहेत. ते म्हणाले की, गेल्या वर्षी उन्हाळ्यात एका दिवसात विक्रमी ७० हजार लोक इस्लाम किल्ला सीमेवरून दाखल झाले होते.

### आठ वर्षांनंतर चीनमध्ये पोहोचले ब्रिटिश पंतप्रधान


**बीजिंग** : ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टार्मर आठ वर्षांनंतर तीन दिवसांच्या दौऱ्यावर चीनमध्ये पोहोचले. यापूर्वी २०१८ मध्ये तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान थेरेसा मे चीनमध्ये पोहोचल्या होत्या. गेल्या आठ वर्षांत जागतिक राजकारण खूप बदलले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आक्रमक धोरणांमुळे आणि विधानांमुळे युरोपियन देश नवीन भागीदार शोधत आहेत, अशा परिस्थितीत चीन त्यांना एक मजबूत पर्याय दिसत आहे. चीनला रवाना होण्यापूर्वी स्टार्मर यांनी माध्यमांना सांगितले होते की, ब्रिटनला अमेरिका आणि चीनपैकी एकाची निवड करण्याची गरज नाही.

### टेक्सासमध्ये नवीन एच-१बी व्हिसावर बंदी

**टेक्सास** : अमेरिकेतील महत्त्वाचे राज्य टेक्सासमध्ये नवीन एच-१बी व्हिसा जारी करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. गव्हर्नर ग्रेग ॲबट यांनी पुढील वर्षी मे पर्यंत एच-१बी श्रेणीतील व्हिसा जारी न करण्याचा आदेश दिला आहे. पहिल्या टप्प्यात टेक्सासच्या सर्व सरकारी कार्यालयांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये ही बंदी लागू होईल. या आदेशामुळे सुमारे १५ हजार भारतीयांवर परिणाम होऊ शकतो. टेक्सास वर्कफोर्स कमिशनकडून सर्व एच-१बी व्हिसाधारकांची संख्या, नोकरीची भूमिका (जॉब रोल), मूळ देश आणि व्हिसाची मुदत (एक्सपायरी) याबद्दल २७ मार्चपर्यंत डेटा रिपोर्ट मागवण्यात आला आहे.

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८२,५६६.३७ (+२२१.६९) |
| निफ्टी | २५,४१८.९० (+७६.१५ ) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,७८,००० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. ३,९३,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३३.१ | १९.५ |
| अमरावती | ३१.८ | १५.३ |
| भंडारा | ३२.० | १५.० |
| बुलडाणा | २९.४ | १५.७ |
| चंद्रपूर | ३०.६ | १८.६ |
| गडचिरोली | २९.२ | १५.४ |
| गोंदिया | २८.० | १५.० |
| नागपूर | २८.८ | १६.९ |
| वर्धा | २९.९ | १६.४ |
| वाशीम | २९.८ | १६.० |
| यवतमाळ | २९.० | १८.० |

# धन्यवाद प्रस्तावावर संसदेत ३४ तास चर्चा

**नवी दिल्ली, २९ जानेवारी**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला बुधवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. गुरुवारी संसदेत आर्थिक सर्वेक्षण सादर करण्यात आले.

संसदेच्या अधिवेशनाला आता शुक्रवारी आणि शनिवारी सुटी असून, रविवारी म्हणजे १ फेब्रुवारीला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् संसदेत अर्थसंकल्प सादर करणार आहे.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर संसदेत ३४ तास चर्चा होणार आहे, लोकसभेत ही चर्चा १८ तास, तर राज्यसभेत १६ तास होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी ४ फेब्रुवारीला लोकसभेत, तर ५ फेब्रुवारीला राज्यसभेत या चर्चेला उत्तर देणार आहे. कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय घेण्यात आला.

देशाच्या अर्थसंकल्पावरही संसदेच्या दोन्ही सभागृहांत ३४ तास चर्चा होणार आहे, लोकसभेत ही चर्चा १८ तास तर, राज्यसभेत १६ तास होणार आहे. केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन् अर्थसंकल्पावरील चर्चेला लोकसभेत ११ फेब्रुवारीला तर, राज्यसभेत १२ फेब्रुवारीला उत्तर देणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारीला संपणार असून, दुसऱ्या टप्प्यातील अधिवेशन ९ मार्चपासून सुरू होणार आहे, २ एप्रिलपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# अनिल अंबानींची १८०० कोटींची मालमत्ता जप्त

**मुंबई, २९ जानेवारी**

रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्याशी संबंधित कंपन्यांविरुद्ध सुरू असलेल्या मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) १,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीची नवीन मालमत्ता जप्त केली आहे. या कारवाईसह या प्रकरणात केंद्रीय तपास यंत्रणेने जप्त केलेल्या मालमत्तेचे एकूण मूल्य आता अंदाजे १२,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

ही कारवाई रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल), रिलायन्स कमर्शियल फायनान्स लिमिटेड (आरसीएफएल), येस बँक घोटाळा तसेच रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित कथित फसवणुकीच्या प्रकरणांचा भाग आहे. ईडीने जप्तीच्या नव्या यादीत रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चरचे बीएसईएस यमुना पॉवर, बीएसईएस राजधानी पॉवर आणि मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडमधील शेअर होल्डिंगचा समावेश असल्याचे सांगितले आहे. व्हॅल्यू कॉर्प फायनान्स ॲण्ड सिक्युरिटीज लिमिटेडकडे असलेल्या १४८ कोटी रुपयांच्या बँक ठेवी आणि १४३ कोटी रुपयांच्या मिळकती तात्पुरत्या स्वरूपात जप्त करण्यात आल्या आहेत. कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अंगराई सेथुरामन यांच्या नावावर असलेले एक निवासी घर, तसेच वरिष्ठ कर्मचारी पुनीत गर्ग यांचे शेअर्स आणि म्युच्युअल फंडदेखील जप्त करण्यात आले आहेत. या नव्या जप्तीचे एकूण मूल्य १,८८५ कोटी रुपये असल्याचे ईडीने स्पष्ट केले आहे.


सरकारी तपास यंत्रणा या प्रकरणात अनिल अंबानी व त्यांच्या संबंधित कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणावर धनाचा गैरवापर झाल्याचा शंका व्यक्त करीत आहे. ◂(वृत्तसंस्था)

# 'बीएलए'च्या हल्ल्यात १२ पाकिस्तानी सैनिक ठार

**इस्लामाबाद, २९ जानेवारी**

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील पंजगुर जिल्ह्यात बुधवारी रात्री बलुच लिबरेशन आर्मी अर्थात् बीएलएच्या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे १२ जवान ठार झाले, तर सहा जखमी आहे. या हल्ल्यात पाकिस्तानी लष्कराचे मोठे नुकसान झाले.

बीएलएचे प्रवक्ते जियांद बलोच यांनी निवेदनात म्हटले की, पंजगूर भागात पाकिस्तानी लष्करासोबत झालेल्या चकमकीत आम्ही जोरदार प्रत्युत्तर दिले. आम्ही लष्कराची तळे आणि वाहनांना लक्ष्य करीत गोळीबार केला. यात त्यांचे मोठे नुकसान झाले. चिलखती वाहने आणि इतर वाहतुकीचा वापर करून लष्कराने या भागात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु, आम्ही जोरदार विरोध केला. चकमकीत पाकिस्तानी लष्कराचे १२ जवान ठार झाले, तर सहापेक्षा अधिक जखमी आहेत. बीएलए यापुढे अधिक घातक हल्ले करेल आणि पाकिस्तानी लष्कराला प्रत्येक आघाडीवर अपयश आणि पराभवाचा सामना करावा लागेल. ◂(वृत्तसंस्था)



# साध्वी प्रेम बाईसा यांचा मृत्यू

**जोधपूर, २९ जानेवारी**

राजस्थानमधील प्रसिद्ध साध्वी प्रेम बाईसा यांची जोधपूरमधील पाल गाव येथील आश्रमात प्रकृती खालावल्यानंतर रुग्णालयात नेताना मृत्यू झाला. घटनेनंतर पोलिसांनी आश्रम ताब्यात घेतला असून, मृतदेह महात्मा गांधी रुग्णालयाच्या शवगृहात ठेवण्यात आला. त्यांच्या अनुयायांनी विषप्रयोगाचा आरोप केला आहे.

पोलिस अधीक्षक छवी शर्मा यांनी सांगितले की, साध्वी प्रेम बाईसा यांना बुधवारी सकाळी श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने आश्रमातच डॉक्टरांना बोलावून त्यांना इंजेक्शन देण्यात आले. इंजेक्शननंतर त्यांना थोडा वेळ आराम मिळाला, मात्र एका तासानंतर त्यांची प्रकृती पुन्हा खालावल्याने तातडीने रुग्णालयात नेताना त्यांचा मृत्यू झाला. मंगळवारीच त्या अजमेर येथे नऊ दिवसांची भागवत कथा पूर्ण करून आश्रमात परतल्या होत्या. साध्वींचे निधन बुधवारी सायंकाळी ५:३० वाजता झाले, परंतु रात्री ९:२८ वाजता त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून पोस्ट शेअर करण्यात आली. या पोस्टमध्ये त्यांनी सनातन धर्मासाठी आपले जीवन समर्पित केल्याचा आणि अग्निपरीक्षा यांसारख्या शब्दांचा उल्लेख केला. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### मतभेदांदरम्यान खडगे-राहुलना भेटले थरूर

**नवी दिल्ली** : काँग्रेस पक्षश्रेष्ठींसोबत मतभेद असल्याच्या वृत्तानंतर, काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी गुरुवारी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी यांची भेट घेतली. तिघांचीही ही बैठक संसदेतील खडगे यांच्या कार्यालयात झाली. बैठकीनंतर थरूर म्हणाले, मी पक्षाच्या दोन्ही नेत्यांशी बोललो. सर्व काही ठीक आहे. आम्ही सर्वजण एकत्र काम करीत आहोत. मी नेहमीच पक्षासाठी प्रचार केला आहे. ही बैठक अशा वेळी झाली जेव्हा थरूर आणि पक्ष नेतृत्वात काही मतभेद निर्माण झाले आहेत. अलिकडेच केरळ विधानसभा निवडणुकीच्या तयारीबाबत एआयसीसीची बैठक झाली होती, ज्यामध्ये थरूर उपस्थित राहिले नाहीत.

### समीर वानखेडेंची याचिका दिल्ली हायकोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली, २९ जानेवारी**

भारतीय महसूल सेवा विभागाचे अधिकारी समीर वानखेडे यांनी बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानच्या प्रॉडक्शन हाऊस आणि वेबमालिकेच्या विरोधात मानहानी खटल्याची याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली.

वानखेडे यांनी 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेबमालिकेतील नायकाच्या भूमिकेवर आक्षेप घेत याचिका दाखल करण्यात आली होती. वेबमालिकेच्या माध्यमातून आपली खिल्ली उडवल्याचा आरोप त्यांनी केला होता. बदनामी केल्याप्रकरणी त्यांनी निर्मात्यांवर दोन कोटी रुपयांचा मानहानीचा खटला दाखल केला. मालिकेतील पात्र काल्पनिक असून, यातून बदनामी झाल्याचे स्पष्ट होत नसल्याचे नमूद करीत न्यायालयाने याचिका फेटाळली. मालिकेत वानखेडे यांच्यासारखे दिसणारे एक पात्र दाखवण्यात आले. यातून सार्वजनिक प्रतिष्ठा मलीन करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

# पश्चिम बंगालमध्ये सीबीआयचे छापे


## हजार कोटींच्या बँक फसवणूक प्रकरणी कारवाई

**कोलकाता, २९ जानेवारी**

एक हजार कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणूक प्रकरणात सीबीआयने पश्चिम बंगालच्या कोलकाता शहरात गुरुवारी सहा ठिकाणी छापे टाकले. वित्त कंपनीचे प्रवर्तक, संचालकांचे निवासस्थान आणि कार्यालयांवर एकाचवेळी कारवाई करण्यात आली.

सीबीआयच्या अधिकाऱ्याने सांगितले की, एसबीआय-युको बँकेतून बोगस दस्तावेजाच्या आधारे वित्त कंपनीच्या प्रवर्तकाने कर्ज घेतले. कर्जाचे हप्ते चुकल्याने बँकेने चौकशी केली असता, फसवणुकीचा प्रकार समोर आला. बँकेच्या अधिकाऱ्यांनी तक्रार केल्यानंतर सीबीआयने या प्रकरणाचा तपास सुरू केला. २०१४ ते २०२० दरम्यान निधीचा कथित अपहार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर वित्त कंपनीचे प्रवर्तक आणि संचालकांचे निवासस्थान व कार्यालयावर छापे टाकण्यात आले. आरोपींनी दोन कंपनीच्या माध्यमातून दोन टप्प्यांत ७३०.८२ कोटी आणि २६०.२० कोटींचे कर्ज घेतले. कर्जाची परतफेड न झाल्याने बँकांच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर फसवणुकीचा प्रकार समोर आला.

२०२३ मध्ये संबंधित सार्वजनिक क्षेत्रातील बँकेच्या दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सीबीआयकडे औपचारिक तक्रार दाखल केली. नंतर सीबीआयने दोन्ही कंपन्या आणि त्यांच्या प्रवर्तकांवर गुन्हा दाखल केला. ◂(वृत्तसंस्था)




केवळ जाहिराती देऊन सहानुभूती दाखवणे हा श्रद्धांजलीचा खरा अर्थ नाही. अजित पवारांवर लावलेले ७० हजार कोटींचे आरोप मागे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.
**संजय राऊत,** उबाठा शिवसेना खासदार

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
शुक्रवार, ३० जानेवारी २०२६ 



काही माणसे कोणत्या पक्षाची आहेत, कोणत्या पदावर आहेत यापेक्षा ती महाराष्ट्राच्या राजकारणात दिसत राहिली की, आधार वाटतो. त्यातले अजितदादा पवार हे तसे आधार वाटायचे. आज घरातले कुणीतरी आपल्यात नाही असे वाटत आहे. खूप त्रास होतोय!
**संकर्षण कऱ्हाडे,** लेखक, अभिनेता



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी सभागृहाच्या कोपऱ्यात कुणाशी गंभीर मुद्यावर चर्चा करीत असावेत?

# भारतातच तयार होणार 'सुपरजेट-१००'

## एचएएल आणि रशियाची मेक इन इंडिया करारावर स्वाक्षरी

◆ **हैदराबाद, २९ जानेवारी**

भारताची एरोस्पेस कंपनी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) आणि रशियाची युनायटेड एअरक्राफ्ट कॉर्पोरेशन (यूएसी) यांनी नागरी विमान वाहतूक क्षेत्रात ऐतिहासिक भागीदारी केली आहे. हैदराबादमध्ये आयोजित विंग्स इंडिया प्रदर्शनादरम्यान भारतात रशियाचे प्रसिद्ध सुपरजेट-१०० (एसजे-१००) विमाने तयार करण्यासाठी एचएएल आणि यूएसी यांनी करार केला.



रशियन एजन्सी तासच्या वृत्तानुसार, हैदराबादमध्ये आयोजित विंग्स इंडिया आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक प्रदर्शनादरम्यान हा करार करण्यात आला. या कराराचा मुख्य उद्देश 'मेक इन इंडिया' उपक्रमाला बळकटी देणे आणि प्रादेशिक जोडणीसाठी विदेशातील आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करणे आहे.स्वाक्षरी समारंभ आयोजित करण्यात आला. या करारांतर्गत, एचएएल ट्विन-इंजिन नॅरो-बॉडी जेट विमानांचे परवाना-उत्पादन करेल, जे प्रादेशिक जोडणीसाठी आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने 'मेक इन इंडिया' उपक्रमाला पाठिंबा देईल.

एचएएलचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डीके सुनील यांनी हैदराबाद येथे पत्रकार परिषदेत सांगितले की, कंपनी पुढील तीन वर्षांत त्यांच्या विद्यमान सुविधांमध्ये अर्ध-नॉक-डाऊन १०० विमानांचे उत्पादन सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवते. त्यांनी पुढे सांगितले की, पुढील दीड वर्षात ते अंदाजे १० विमाने खरेदी करू शकतात. त्यांनी पुढे सांगितले की, भारतासारख्या देशासाठी त्यांना २०० पेक्षा जास्त विमानांसाठी एक मजबूत बाजारपेठ दिसते. ◀(वृत्तसंस्था)

### शक्य तितक्या लवकर विमाने तैनात

सुनील यांनी स्पष्ट केले की त्यांचे उद्दिष्ट उत्पादनाची वाट पाहणे नाही, तर शक्य तितक्या लवकर विमान तैनात करणे आहे. एचएएलला अंदाजे १० ते २० विमाने भाड्याने घ्यायची आहेत, जी थेट रशियाकडून हवेत योग्य स्थितीत खरेदी करता येतील. ■

### आसनक्षमता ८७ ते १००

सुपरजेट १०० हे एक कार्यक्षम आणि उच्च-तंत्रज्ञानाचे व्यावसायिक विमान आहे. हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बनवले आहे आणि सामान्यतः ८७ ते १०८ आसन क्षमता आहे. हे विमान सध्या नऊ रशियन एअरलाईन्स आणि अनेक रशियन आणि परदेशी सरकारी कंपन्या चालवतात. ■

# बंगालच्या उपसागरात भारत-रशियाचा युद्ध सराव

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

भारत आणि रशियन नौदलाचा बंगालच्या उपसागरात १८ फेब्रुवारीपासून युद्ध सराव होणार आहे. यासाठी रशियन नौदलाचे पथक भारताच्या दिशेने १ फेब्रुवारीपासून रवाना होईल. दहशतवाद्यांविरोधात संयुक्त कारवाई, तस्करीला आळा आणि माहितीची देवाण-घेवाण करणे हा युद्ध सरावाचा उद्देश असल्याचे संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे. युद्ध सरावातून दोन्ही देशांचे नौदल आपली क्षमता सादर करणार आहे. रशियन नौदलाच्या पथकातील फ्रिगेट मिलान ही युद्धनौका सरावात सहभागी होणार आहे. सरावाला इंद्र व्यायाम नाव देण्यात आले. भारतीय युद्धनौका आणि पाचशे नौदलाचे जवान सरावात सहभागी होईल. ◀(वृत्तसंस्था)

# भारतात परतणार तीन अतिप्राचीन मूर्ती

## अमेरिकेतील नॅशनल म्युझियमचा निर्णय



◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

अमेरिकेतील वॉशिंग्टन येथील स्मिथसोनियन नॅशनल म्युझियम ऑफ एशियन आर्टने तीन मौल्यवान कांस्य मूर्ती भारत सरकारला परत करण्याचा निर्णय घेतला आहे. या मूर्ती तमिळनाडूतील मंदिरांमधून बेकायदेशीरपणे तस्करी करण्यात आल्या होत्या.

व्यापक संशोधन आणि अभिलेखागार तपासणीतून पुष्टी झाली की, या चोल आणि विजयनगर काळातील मूर्ती भारतीय कायद्यांचे उल्लंघन करून दशकांपूर्वी परदेशात विकल्या गेल्या होत्या. तामिळनाडूच्या मंदिरांमधून चोरीला गेलेल्या शिव नटराज (चोल काळ, सुमारे ९९०), सोमस्कंद (चोल काळ, १२ वे शतक) आणि परावईसह संत सुंदरार (विजयनगर काळ, १६ वे शतक) या मूर्ती दक्षिण भारतीय कांस्य कास्टिंगच्या समृद्ध कलात्मकतेची उदाहरणे आहेत. राष्ट्रीय आशियाई कला संग्रहालयाने या तीन मूर्तींच्या उत्पत्तीची सविस्तर तपासणी केली, प्रत्येक कामाच्या व्यवहार इतिहासाची तपासणी केली.

तपासानंतर, संग्रहालयाने केवळ त्यांच्या परतफेडीची घोषणा केली नाही तर, शिव नटराजाची मूर्ती दीर्घकालीन कर्जावर ठेवण्याचा आणि तिच्या चोरीची आणि जगासमोर परत येण्याची संपूर्ण कहाणी दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. 'दक्षिण आशिया, आग्नेय आशिया आणि हिमालयातील ज्ञानाची कला' या प्रदर्शनाचा भाग म्हणून ती जगजाहीर केली जाईल.

२०२३ मध्ये, संग्रहालय संशोधकांनी, पुडुचेरी येथील फ्रेंच संस्थेच्या फोटो संग्रहाच्या सहकार्याने, पुष्टी केली की या कांस्य पुतळ्यांचे फोटो १९५६ ते १९५९ दरम्यान तामिळनाडूतील मंदिरांमध्ये काढले गेले होते. ◀(वृत्तसंस्था)

### कोणती मूर्ती कुठली?

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने या निष्कर्षांचा आढावा घेतला आणि पुष्टी केली की भारतीय कायद्यांचे उल्लंघन करून पुतळे काढून टाकण्यात आले होते. संग्रहालय संचालक चेस एफ. रॉबिन्सन म्हणाले, ही शिव नटराजाची मूर्ती तंजावर जिल्ह्यातील श्री भाव औषधेश्वर मंदिराची होती, जिथे हे छायाचित्र १९५७ मध्ये काढण्यात आले होते. नंतर २००२ मध्ये, राष्ट्रीय आशियाई कला संग्रहालयाने न्यू यॉर्कमधील डोरिस वेनर गॅलरीमधून ही कांस्य मूर्ती मिळवली.

संग्रहालयातील एका संशोधकाने सांगितले की डोरिस वेनर गॅलरीने पुतळ्याची विक्री सुलभ करण्यासाठी संग्रहालयाला बनावट कागदपत्रे दिली होती. सोमस्कंद आणि संत सुंदरार परवाई यांच्यासह ही मूर्ती १,००० वस्तूंच्या भेटवस्तूचा भाग होती. संशोधनातून असे दिसून आले की, ही मूर्ती मन्नारकुडी तालुक्यातील अलाथूर गावातील विश्वनाथ मंदिराची होती. शिवाय, शिव मंदिरातील संत सुंदरार परवाई यांची मूर्ती कल्लाकुरूची तालुक्यातील वीरसोलापुरम गावातील होती. ■

# यूजीसीच्या नवीन नियमांना सुप्रीम कोर्टाची स्थगिती

## नव्याने मसुदा तयार करण्याचा केंद्राला निर्देश

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) वतीने लागू करण्यात आलेल्या नव्या भेदभावविरोधी नियमांना सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्थगिती दिली. हे नियम अस्पष्ट असून, त्यांचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने केंद्र सरकार आणि यूजीसीला नोटीस बजावली आहे. पुढील आदेश येईपर्यंत या वादग्रस्त नियमांची अंमलबजावणी रोखण्यात आली तसेच २०१२ चे नियम पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहेत.

उच्च शिक्षण संस्थांमध्ये जातीय भेदभाव रोखण्यासाठी आणि समावेशकतेला चालना देण्यासाठी यूजीसीने याच महिन्यात नवीन नियमावली जाहीर केली होती. या नियमांनुसार, सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये भेदभावविरोधी तक्रारींचे निवारण करण्यासाठी समता समिती स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले होते. या समित्यांमध्ये इतर मागासवर्गीय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, दिव्यांग आणि महिला प्रतिनिधींचा समावेश आवश्यक असल्याचे म्हटले होते.

तातडीच्या सुनावणीची मागणी

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या न्यायासनासमोर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी तातडीच्या सुनावणीची मागणी केली. सामान्य प्रवर्गातील व्यक्तींविरोधातही भेदभाव होण्याची शक्यता आहे. माझे प्रकरण राहुल देवण आणि अन्य विरुद्ध संघ असे आहे, असे वकिलांनी सांगितले. सरन्यायाधीशांनी, आम्हाला परिस्थितीची जाणीव आहे. आवश्यक त्रुटी दूर करा. प्रकरण सुनावणीसाठी सूचीबद्ध करू, असे स्पष्ट केले होते. जातआधारित भेदभावाची व्याख्या केवळ एससी, एसटी आणि ओबीसीपर्यंत मर्यादित ठेवल्यामुळे सामान्य किंवा अनारक्षित प्रवर्गातील व्यक्तींना भेदभावाविरोधात संस्थात्मक संरक्षण व तक्रार निवारणाचा हक्क नाकारला जात आहे, असे याचिकेत नमूद केले होते. ◀(वृत्तसंस्था)

### अनेक राज्यांमध्ये विद्यार्थ्यांची निदर्शने

विद्यार्थ्यांचा विरोध आणि न्यायालयाचे ताशेरे यूजीसीच्या या निर्णयामुळे अनेक राज्यांमध्ये विद्यार्थ्यांनी निदर्शने केली होती. या नियमावलीतील तरतुदी स्पष्ट नसल्याने त्यांचा गैरवापर होऊ शकतो, असा दावा टीकाकारांकडून करण्यात आला. जोपर्यंत या प्रकरणाची पुढील सुनावणी होत नाही, तोपर्यंत हे नवे नियम लागू करता येणार नाहीत, असे या मुद्यावर न्यायालयाने स्पष्ट केले आहे. ■

# कोलंबियात विमान कोसळले, १५ प्रवासी ठार

◆ **बोगोटा, २९ जानेवारी**

कोलंबियाच्या ईशान्येकडील नॉर्टे दे सँटेंडर प्रांतातील डोंगराळ भागात १५ प्रवाशांना घेऊन जाणारे बीचक्राफ्ट कंपनीचे खासगी विमान कोसळले. यात कोलंबियाच्या एका खासदारासह १५ प्रवाशांचा मृत्यू झाला. कॅमिलो डाझा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून या विमानाने उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांमध्येच विमानाचा हवाई वाहतूक नियंत्रण कक्षाशी संपर्क तुटला आणि त्यानंतर ही घटना घडली. मृतकांमध्ये दोन वैमानिकांचा समावेश आहे. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी 'एक्स'वर म्हटले की, व्हेनेझुएलाच्या सीमेवर कुआरासिका या डोंगराळ भागात विमान कोसळले. ◀(वृत्तसंस्था)

# बीएसएफच्या गोळीबारात एक तस्कर ठार

## शस्त्रास्त्रांसह कोट्यवधींचे मादकपदार्थ जप्त

◆ **अमृतसर, २९ जानेवारी**

पंजाबच्या फाजिल्का आंतरराष्ट्रीय सीमेवरून भारतात घुसखोरी करण्याचा पाकिस्तानी तस्करांचा कट सुरक्षा दलाने गुरुवारी पहाटे उधळला. बीएसएफ आणि पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एक तस्कर ठार झाला, तर इतर पाकिस्तानी सीमेत पळून जाण्यात यशस्वी झाले. यानंतर राबविण्यात आलेल्या शोधमोहिमेत मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि कोट्यवधी रुपयांचे मादकपदार्थ जप्त करण्यात आले.

पंजाबचे पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी पत्रपरिषदेत सांगितले की, बीएसएफ आणि पंजाब पोलिस पंजाबच्या फाजिल्का आणि अमृतसर सीमेवर गस्त घालत असताना सीमेवर संशयास्पद हालचाली दिसून आल्या. बीएसएफचे जवान शहनिशा करण्यासाठी गेले असता, त्यांच्यावर गोळीबार झाला. याला जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले. सुरक्षा जवानांनी केलेल्या गोळीबारानंतर घुसखोर पाकिस्तानी सीमेत पळून गेले. शस्त्रे आणि मादकपदार्थाच्या तस्करीचा कट उधळून लावण्यात यश आले. यानंतर पोलिस आणि बीएसएफने संयुक्त शोधमोहीम राबवली असता, एक मृतदेह आढळून आला. त्याची ओळख अजून पटलेली नाही. तस्कर दोन मोठ्या बॅगांमधून शस्त्रे आणि मादकपदार्थांची खेप भारतात पाठवण्याच्या तयारीत होते. ◀(वृत्तसंस्था)

### शोधमोहिमेत काय आढळले?

बीएसएफ आणि पोलिसांच्या संयुक्त शोधमोहिमेत विदेशी शस्त्रास्त्रांचा मोठा साठा सापडला. यामध्ये ११ ग्लॉक, ५ झिगाना, ३ नॉरिंको आणि बॅरेटा अशा एकूण २० पिस्तूल आहेत. ३९ मॅग्झिन्स, एक बंदूक आणि ३१० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. याशिवाय २.१६० किलो हेरॉईन जप्त करण्यात आले. ■

### ४० किलो हेरॉईन, ग्रेनेड जप्त

दुसरीकडे अमृतसरच्या राजासांसी भागातील ओठियां गावाजवळ पोलिसांनी ड्रोनच्या साहाय्याने पाकिस्तानातून पाठवण्यात आलेले ४० किलो हेरॉईन आणि चार ग्रेनेड जप्त करण्यात आले. काही तरुण मोटारसायकलवरून ही खेप घेऊन जात होते, मात्र गावकरी आणि रस्ते कामगारांनी अडवल्यामुळे ते मोटारसायकल सोडून पसार झाले. ■

# भारतात येणार २२ मुस्लिम देशांचे परराष्ट्रमंत्री

◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

भारतात पहिल्यांदाच भारत-अरब परराष्ट्र मंत्र्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी शनिवारी २२ मुस्लिम देशांचे मंत्री राजधानी दिल्ली येथे येणार आहे.

मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावाच्या पृष्ठभूमीवर होणारी बैठक महत्त्वाची असेल. यात परराष्ट्र मंत्री, राज्यमंत्री आणि अरब लीग सचिवालयाचे अधिकारी बैठकीत सहभागी होणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाने गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्या अध्यक्षतेत पहिल्यांदाच ही बैठक होत आहे.


अरब लीग सदस्य देशांचे परराष्ट्र मंत्री आणि अरब लीगचे सरचिटणीस भारताच्या दौऱ्यावर येणार आहे. बैठकीपूर्वी शुक्रवारी भारत आणि अरब अधिकाऱ्यांमध्ये चर्चा होईल. दहा वर्षांच्या काळात दोन्ही बाजूंमधील ही दुसरी बैठक आहे.

पहिली बैठक २०१६ मध्ये बहरीनमध्ये झाली. पहिल्या बैठकीत अर्थव्यवस्था, ऊर्जा, शिक्षण आणि संस्कृती या क्षेत्रात भागीदारी वाढविण्याऱ्यावर चर्चा झाली. शनिवारपासून सुरू होणाऱ्या बैठकीत विद्यमान भारत-अरब भागीदारी अधिक मजबूत आणि व्यापक करण्यावर चर्चा होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# चित्रपट वार्ता

## 'रणपती शिवराय'च्या प्रदर्शनाची तारीख बदलली

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांवरील 'रणपती शिवराय स्वारी आग्रा' या चित्रपटाची मागील अनेक दिवसांपासून चर्चा होती. दिग्पाल लांजेकरच्या शिवरायांवरील अष्टक चित्रपटातील एक पुष्प म्हणून याकडे पाहिले जात आहे. हा ३० जानेवारी रोजी प्रदर्शित होणार होता. मात्र, आता याच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलली आहे. हा चित्रपट ६ फेब्रुवारी रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तारीख पुढे ढकलण्याचे कारण स्पष्ट झालेले नाही. या भव्य चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन दिग्पाल लांजेकर यांचे आहे. यात मृणाल कुलकर्णी, अभिजीत श्वेतचंद्र, समीर धर्माधिकारी, अजय पूरकर, दिग्पाल लांजेकर, स्मिता शेवाळे, पुनीत इस्सर, विराजस कुलकर्णी, योगेश सोमण, अक्षय वाघमारे, ऋषी सक्सेना अशी मातब्बर कलाकारांची फौज राहणार आहे. ■




## 'छोटी बहू' पुन्हा होणार आई



**मुंबई :** 'छोटी बहू' मालिकेद्वारे घराघरात पोहोचलेली अभिनेत्री रुबिना दिलैक बिग बॉस आणि लाफ्टर शेफसारख्या रिॲलिटी शोमध्येही गाजली. तिचा चाहतावर्ग फार मोठा आहे. आता तिने चाहत्यांसमोर आपल्या जीवनातील गोड बातमी जगजाहीर केली आहे. रुबिना दुसऱ्यांदा आई होणार आहे. अर्थात, हे तिचे तिसरे अपत्य राहील. कारण, आधी तिला जुळ्या मुली आहेत. या बातमीनंतर ३८ वर्षीय रुबिनावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. २०१८ मध्ये तिने अभिनव शुक्लासोबत लग्न केले. काही वर्षांतच दोघांवर वेगळे होण्याची वेळ आली होती. मात्र, 'बिग बॉस'च्या घरात त्यांच्यातील धागा पुन्हा जुळला आणि नंतर त्यांचे नातेही दृढ झाले. तिने नुकतीच एक पोस्ट शेअर करत आपण पुन्हा गर्भवती असल्याची बातमी दिली. तिने लिहिले की, सर्व काही आपल्या मनासारखे घडत नसेल तर, त्यापेक्षाही चांगले घडणार असते आणि हेच जीवनाचे सौंदर्य आहे. ■

## भारतीच्या बाळाचे झाले नामकरण



**मुंबई :** विनोदी कलाकार भारतीसिंह हिच्या दुसऱ्या बाळाचा नुकताच जन्म झाला. त्याला जन्माच्या आधीपासूनच 'काजू' हे टोपणनाव दिले होते. आता 'काजू'चे विधीवत नामकरण झाले असून त्याचे नाव 'यशवीर' असे ठेवले आहे. भारती आणि हर्ष लिंबाचिया या दाम्पत्याने या निमित्ताने एका छोटेखानी समारंभाचेही आयोजन केले होते. या खास प्रसंगाचे फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी आपल्या लाडक्या मुलाचे नावही उघड केले. भारती आणि हर्षने इन्स्टाग्रामवर नामकरण सोहळ्याचे फोटो शेअर करीत कॅप्शनमध्ये यशवीर असे लिहिले. नावासोबत त्यांनी हार्ट इमोजी लावला आहे. मात्र, या जोडप्याने मुलाचा चेहरा दाखवला नाही. ■

# ग्रीनलॅण्डच्या सुरक्षेसाठी ४० राफेल विमाने सज्ज

## विमानवाहू लढाऊ नौका चार्ल्स डी गॉल रवाना

## अमेरिकेच्या कारवाईला देणार प्रत्युत्तर

◆ **पॅरिस, २९ जानेवारी**

ग्रीनलॅण्डवर ताबा मिळविण्याचे अमेरिकेचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी फ्रान्सने ४० राफेल लढाऊ विमाने सज्ज केली आहे. याशिवाय अणुऊर्जेवर चालणारी चार्ल्स डी गॉल ही विमानवाहू लढाऊ नौका ग्रीनलॅण्डच्या दिशेने रवाना झाल्याची माहिती फ्रेंच संरक्षण मंत्रालयाने दिली. ग्रीनलॅण्डवर ताबा मिळविण्यासाठी अमेरिकेने बळाचा वापर केल्यास त्यांना प्रत्युत्तर देण्याची आमची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रीनलॅण्डवर अमेरिकेच्या लष्करी हल्ल्याच्या धोक्याला प्रतिसाद म्हणून फ्रेंच नौदल सज्ज आहे. राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं लवकरच डेन्मार्क आणि ग्रीनलॅण्डच्या नेत्यांशी भेटणार आहे. राष्ट्राध्यक्ष कार्यालयाने निवेदनात म्हटले की, मॅक्रॉं युरोपियन एकता, डेन्मार्क आणि ग्रीनलॅण्डचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेचे रक्षण करण्यासाठी मित्र देशांच्या प्रमुखांशी लवकर बैठक घेणार आहे. दुसरीकडे फ्रान्सच्या संरक्षण मंत्रालयाने म्हटले की, चार्ल्स डी गॉल लढाऊ नौका उत्तर अटलांटिककडे रवाना झाली आहे. नौदलाचे ओरियन २६ पथक टूलॉन नौदल तळावरून ग्रीनलॅण्डच्या दिशेने रवाना झाले. येत्या आठवड्यात अटलांटिक प्रदेशात सराव होणार आहे. सरावात मित्र देशांचे लष्करी आणि नौदलाचे पथक सहभागी होईल. ग्रीनलॅण्डच्या सुरक्षेसाठी सरावाचे आयोजन करण्यात आले.

**युद्धस्थिती उद्‌भवल्यासारखे वागू नका**

रुबियो म्हणाले, ग्रीनलॅण्डच्या सुरक्षेसंदर्भात आम्ही ठाम आहे, युद्धाची परिस्थिती उद्‌भवल्यासारखे वर्तन योग्य नाही. ताकद दाखवायची वेळ आल्यास अमेरिका मागे राहणार नाही. आम्हाला शांततेने तोडगा काढायचा आहे. ◀(वृत्तसंस्था)

### युरोपियन देशांनी संयम बाळगावा : रुबियो



ग्रीनलॅण्डवरून फ्रान्सकडून सुरू असलेल्या हालचालीवर संताप व्यक्त करताना अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो प्रसार माध्यमांशी संवाद साधताना म्हणाले, आर्क्टिक प्रदेशातील सुरक्षा आणि धोरणात्मक सहकार्यासंदर्भात आमची डेन्मार्क आणि ग्रीनलॅण्ड यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. युरोपियन देशांनी संयम बाळगावा, आम्ही यापूर्वीच बळाचा वापर करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. सर्व पक्षांमधील मतभेद शांततेने सोडवण्याची आमची तयारी आहे. ■



लेह येथे धावपट्टीसाठी पायाभूत सुविधा प्रकल्पाचे उद्घाटन वेस्टर्न एअर कमांडचे एअर मार्शल जेएस मान यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला संबोधित करताना लडाखचे नायब राज्यपाल कविंदर गुप्ता

# तुम्ही फसवणुकीचा नवा प्रकार शोधला

## आरक्षण मागणाऱ्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले



◆ **नवी दिल्ली, २९ जानेवारी**

स्वतःला बौद्ध अल्पसंख्यक असल्याचा दावा करून वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमात आरक्षण मागणाऱ्या दोन उमेदवारांना तुम्ही तर, फसवणुकीचा नवा प्रकार शोधला अशा शब्दांत सर्वोच्च न्यायालयाने फटकारले.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेत झालेल्या सुनावणीत न्यायासनाने म्हटले की, तुम्ही खऱ्या अल्पसंख्यकांचे हक्क हिरावून घेऊ पाहत आहात. तुम्ही देशातील सर्वांत समृद्ध, सुविधा-संपन्न आणि उच्च जातीय समुदायांपैकी एक आहात. अशा लोकांनी प्रत्यक्षात वंचित असलेल्या समाजांचे अधिकार काढून घेणे गुन्हा आहे. दोन्ही उमेदवार हरयाणातील समृद्ध जाट समाजातून येतात. लेखी परीक्षेपूर्वी या उमेदवारांनी स्वतःला सामान्य प्रवर्गातील सांगितले होते, मात्र आता बौद्ध अल्पसंख्यक असल्याचा दावा केला. सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना विचारले, 'पूनिया' हे आडनाव जाट समाजातही आहे आणि अनुसूचित जातींमध्येही. तुम्ही नेमके कोणते 'पूनिया' आहात, वकिलांनी उत्तर दिले की, त्यांचे पक्षकार जाट आहेत. त्यावर न्यायालयाने प्रश्न केला, मग तुम्ही अल्पसंख्यक कसे ठरलात, वकिलांनी धर्मांतर केल्याचे सांगत ते संविधानिक अधिकार असल्याचा युक्तिवाद केला, यावर न्यायासनाने त्याला फटकारले. ◀(वृत्तसंस्था)

### युक्तिवादावर सरन्यायाधीश संतप्त

याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी बचाव करत, आम्ही प्रामाणिकपणे बौद्ध धर्म स्वीकारला आहे, असे म्हटल्यावर सरन्यायाधीशांनी इशारा दिला की, आम्हाला पुढील कठोर टिप्पणी करायला भाग पाडू नका. असा युक्तिवाद मान्य केला तर सर्वच लोक हेच करू लागतील. उच्च जातीय लोक धर्मांतर करू लागतील आणि खऱ्या गरजूंचे अधिकार हिरावून घेतील. ■

### काय आहे प्रकरण?

मेरठमधील सुभारती वैद्यकीय महाविद्यालयात बौद्ध अल्पसंख्यक समुदायासाठी आरक्षण आहे. निखिल कुमार पूनिया आणि एकता या दोन उमेदवारांनी नीट-पीजी अभ्यासक्रमासाठी या महाविद्यालयात अल्पसंख्यक कोट्यातून प्रवेशाची मागणी केली. आपण बौद्ध धर्म स्वीकारल्याचा दावा करीत त्यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने जारी केलेले प्रमाणपत्रही सादर केले होते. ■

## अग्रलेख...

# विमान प्रवास आणि सुरक्षितता

दि. २८ जानेवारीच्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा करुण अंत झाला. साऱ्या देशाला या घटनेचा धक्का बसला. तंत्रज्ञान एवढे अद्ययावत झालेले असताना अजूनही विमाने कां कोसळतात किंवा त्यांचे अपघात कां होतात, हा केवळ विमान वाहतुकीच्या क्षेत्रासाठी नव्हे तर सामान्यांच्या मनातलाही प्रश्न. विमान अपघाताची बातमी आल्याबरोबर लोकांना धक्का बसतो. विमान प्रवासाची भीती वाटू लागते. मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले आहे, मंगळावर मोहिमा पाठवल्या आहेत. मानवाने अतिशय बुद्धिमान संगणक बनवले आहेत आणि अत्यंत प्रगत मशीन्स तयार केल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पल्याडही सुपर इन्टेलिजन्सचे वारे वाहू लागले आहेत. विमानांमध्ये आधुनिक इलेक्ट्रॉनिक्स यंत्रणा, सेन्सर्स, नेव्हिगेशन सिस्टम्स आणि ऑटोपायलट यंत्रणा अशा अनेक गोष्टी असतात. तरीही अपघात होतात. त्यामुळे विमान प्रवासाच्या सुरक्षिततेबद्दल शंका निर्माण होते. सामान्यांना प्रश्न पडतो, की जर तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असेल तर विमाने पूर्णपणे क्रॅश-प्रूफ का नाहीत?... याचे उत्तर सोपे नाही. विमान वाहतूक सुरक्षित आहे यात वाद नाही. इतर परिवहन व्यवस्थांच्या तुलनेत विमानांचे अपघात कमीच आहेत. तरीही तंत्रज्ञानाला अनेक मर्यादा असतातच. तंत्रज्ञानाद्वारे जोखीम किमान पातळीवर आणली जाऊ शकते, परंतु ती कधीही पूर्णपणे संपत नाही. विमाने अशा वातावरणात उडत असतात, ज्यात भौतिकशास्त्र, हवामान, यांत्रिक प्रणाली आणि मानवी निर्णय या साऱ्यांचा मेळ असतो. चुकीच्या वेळी छोट्या समस्या उद्‌भवतात आणि त्यातून मोठे काही तरी घडते.

अजूनही विमानांचे अपघात कां होतात, हे समजून घेण्यासाठी, आपण प्रथम हे समजून घ्यायला हवे की, विमान हवेत उडते किंवा उडत राहते कारण त्याचे इंजिन उडण्यासाठी आवश्यक असलेली शक्ती निर्माण करते. एरवी गुरुत्वाकर्षण नेहमीच विमानाला खाली खेचण्याचा प्रयत्न करीत असते. यात काहीही बिघडले तरी विमानाचा तोल जाणे शक्य आहे. जमिनीवर धावताना कारचे इंजिन बिघडले तर कार थांबविली जाऊ शकते किंवा थांबते. हवेत उडत असलेल्या विमानाचे इंजिन बिघडले तर वैमानिकाच्या हाती फार वेळ नसतो. वेगामुळे ही परिस्थिती अधिक गंभीर बनते. व्यावसायिक विमाने ताशी सुमारे ८०० किलोमीटर वेगाने प्रवास करतात. छोटी खाजगी जेट विमाने देखील ताशी ५०० ते ६०० किलोमीटर वेगाने जातात. नेमके काय घडते आहे, हे समजून घेण्यासाठी आणि प्रतिक्रिया देण्यासाठी वैमानिकांना फार कमी वेळ मिळतो. उड्डाणाचे सर्वांत धोकादायक टप्पे म्हणजे टेकऑफ आणि लॅण्डिंग. बहुतेक अपघात या दोन टप्प्यांवर होतात. कारण विमान जमिनीच्या जवळ असते आणि वैमानिकांकडे कोणत्याही अडचणीतून सावरण्यासाठी फार कमी वेळ (अगदी काही सेकंदांचा) असतो. लॅण्डिंग दरम्यान हवामान, दृश्यमानता आणि धावपट्टीची परिस्थिती सर्वांत महत्त्वाची असते. क्रूझिंगच्या विशिष्ट उंचीवर असताना काही समस्या निर्माण झाल्यास वैमानिकांना विचार करण्यासाठी आणि कृती करण्यासाठी वेळ मिळतो. जमिनीजवळ असताना तशी परिस्थिती नसते.

याशिवाय, हवामान हा विषय विमान वाहतुकीतील सर्वांत मोठ्या आव्हानांपैकी असतोच. कोणतेही तंत्रज्ञान निसर्गावर नियंत्रण ठेवू शकत नाही. वैमानिकांना धुके, पाऊस, वादळे, जोरदार वारे, वीज इत्यादी गोष्टींचा उड्डाणादरम्यान सामना करावा लागतो. धुक्यामुळे दृश्यमानता इतकी कमी होऊ शकते की शेवटच्या क्षणापर्यंत धावपट्टी दिसत नाही. वादळामुळे वर आणि खाली शक्तिशाली हवेचे प्रवाह निर्माण होतात. पायलट, सह-पायलट, हवाई वाहतूक नियंत्रक, देखभाल अभियंते आणि ग्राऊंड स्टाफ हे सर्व महत्त्वाची भूमिका बजावत असतातच. पण, शेवटी ती माणसेच आहेत. ती तणावग्रस्त होऊ शकतात किंवा गोंधळून जाऊ शकतात. ती सूचनांचा चुकीचा अर्थ लावू शकतात. उपकरणांचे रीडिंगही चुकीचे होऊ शकते. आतापर्यंतच्या अनेक अपघातांच्या चौकशा असे सांगतात की, विमानांचे अपघात हे मोठ्या चुकीपेक्षाही चुकीच्या किंवा त्रुटीपूर्ण मानवी निर्णयांच्या साखळीमुळे घडतात.

विमान हे देखील मशीन आहे आणि सर्व मशीन्सप्रमाणे ते देखील बिघडू शकते. विमानात हजारो सुटे भाग असतात. इंजिन, वायर्स, सेन्सर्स, संगणक, हायड्रॉलिक्स, लॅण्डिंग गियर आणि बरेच काही. देखभालीचे कठोर नियम असूनही, काही भाग जीर्ण होऊ शकतात, काही ठिकाणी दोष निर्माण झालेले असू शकतात. काही वेळा मॅन्युअल अर्थात मानवी नियंत्रण आणि स्वयंचलित नियंत्रण यांच्यात गोंधळ निर्माण होऊ शकतो. जगातील कोणतेही मशीन पूर्णपणे अपयश-प्रतिरोधक नाही. त्याला विमान अपवाद असू शकत नाही. सुरक्षेत पायाभूत सुविधा देखील भूमिका बजावत असते. मोठ्या आंतरराष्ट्रीय विमानतळांवर प्रगत लॅण्डिंग सिस्टम, रडार सपोर्ट, शक्तिशाली रनवे लाईटिंग आणि अचूक हवामानविषयक माहिती देणारी यंत्रणा असते. छोट्या विमानतळांवर या सर्व सुविधा असतीलच असे नाही. अशा ठिकाणी, वैमानिकांना त्यांना जे काही दिसत असते, त्यावरच अधिक अवलंबून राहावे लागते. विशेषतः प्रतिकूल हवामान किंवा रात्रीच्या लॅण्डिंग दरम्यान यामुळे धोका वाढतो. विमान वाहतूक ही अशाप्रकारची जोखीम शक्य तितकी कमी करण्यासाठी डिझाईन केलेली आहे यात वाद नाही. पण, जोखीम शून्य असे डिझाईन अद्याप तयार झालेले नाही. ज्याप्रमाणे रुग्णालयात कोणत्याही रुग्णाचा कधीही मृत्यू होणार नाही याची हमी दिली जाऊ शकत नाही, त्याचप्रमाणे कोणत्याही विमानाचा कधीही अपघात होणार नाही, याचीही खात्री देता येत नाही. अत्यंत कडक सुरक्षा मानके, अनेक बॅकअप सिस्टम आणि भूतकाळातील चुकांपासून सतत शिकणे व सुधारणे त्यासाठी आवश्यक असते. विमान वाहतूक ही सांख्यिकीयदृष्ट्या रस्ते प्रवासापेक्षा बरीच सुरक्षित झाली आहे ती या सुधारणांमुळे आणि त्या सुधारणांच्या मुळाशी पूर्वीच्या चुकाच होत्या.

अनेक लोक विमान वाहतुकीची तुलना अंतराळ मोहिमांशी करतात आणि विचारतात की, आपण मंगळावर जाऊ शकत असू तर आपण विमानांना पूर्णपणे सुरक्षित का बनवू शकत नाही? ही तुलना योग्य नाही. बहुतांशी अंतराळ मोहिमा मानवरहित किंवा दूरस्थपणे (रिमोटली) नियंत्रित असतात, वर्षानुवर्षे त्यांचे नियोजन झालेले असते आणि त्यांना विमानाच्या वाट्याला येणाऱ्या हवामानाच्या प्रतिकूलतेचा सामना करावा लागत नाही. प्रवासी विमाने दररोज ठरलेल्या वेळी उड्डाण व लॅण्डिंग करतात. त्यांची सुरक्षितता मानवी निर्णयांवर अवलंबून असते. सगळे विमान अपघात एकाच कारणामुळे होत नाहीत. ते छोट्या-छोट्या समस्यांच्या साखळीमुळे होतात. हवामानातील प्रतिकूलता, छोटासा तांत्रिक बिघाड, चुकीचा निर्णय हे सारे एकत्रित घडले तर धोकादायक परिस्थिती निर्माण होते. वैमानिकांना फार कमी वेळात यातले नेमके काय ते ओळखावे लागते आणि संचालन करावे लागते. वैमानिक दबावाखाली काम करतात. त्यांच्यावर असंख्य जिवांची जबाबदारी असते. संकट समोर दिसत असताना त्यांचाही ताण वाढत असणार. विचार करण्याची क्षमता प्रभावित होत असणार. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे मेन्टेनन्स अर्थात देखभालीचा. ती देखील मानवी निरीक्षण व कृतीवर अवलंबून असते. तपासणी परिपूर्ण झाली नसेल तर किरकोळ दोष दुर्लक्षित होऊ शकतो आणि तोच मोठा होऊन घातक ठरू शकतो. आकडेवारी स्पष्टपणे दर्शवते की विमान प्रवास हा परिवहनाच्या सर्वांत सुरक्षित मार्गांपैकी एक आहे. लाखो उड्डाणे सुरक्षित चालतात. रस्ते अपघातात मृत्यूची शक्यता विमान अपघातापेक्षा खूप जास्त असते. तथापि, विमानाचा अपघात होतो तेव्हा त्यात प्राणहानी मोठी होते आणि धक्कादायक असे बरेच काही असते. विमान प्रवासाबद्दल नकारात्मकता बाळगण्याचे कारण नाही. आधुनिक काळात तो अनेकांसाठी गरजेचा आहे. तंत्रज्ञानाने जोखीम कमी होऊ शकते. परंतु ते भौतिकशास्त्राचे नियम बदलू शकत नाही, हवामान नियंत्रित करू शकत नाही किंवा मानवी मर्यादांचा मुद्दा निकालात काढू शकत नाही, हे वास्तव दुर्लक्षित करता येत नाही.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# डिजिटल प्रतिकृती : उद्याचे आभासी वास्तव

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तीबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे आणि काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्त्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता घटकाभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर? या प्रतिकृतीला डिजिटल ट्विन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तीची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन हे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या साहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व तयार करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रीकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे, व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. डिजिटल ट्विन हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी २००२ मध्ये सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नावीन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्यसेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केली जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधील देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृद्धता आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टिमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाईम डेटा आणि सिम्युलेशन एकत्र करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांच्या भौतिक समकक्षांना जवळून प्रतिबिंबित करता येते. डिजिटल जुळे डेटा स्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते. आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथक्करण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्ये ही अफाट क्षमता आहे. पण कालानुरूप त्यात त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते, पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा आपल्याला मदत करू शकतो. एआयमधील प्रेडिक्टिव्ह अॅनॅलिटिक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा एखाद्या ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुम्हाला हवी तेव्हा रिअलटाईम अर्थात मदत करू शकतात. आपला घसा बसला असेल तर, आपल्या वतीने संभाषणही करू शकतात. यात आपल्या आवाजाचे, लकबींचे पृथक्करण केले असते. फक्त यासाठी आपले संभाषण (अनेक वर्षांचे) रेकॉर्ड केले जाते. यासाठी वेअरेबल (परिधान केलेले संगणकीय उपकरण) वापरले जाते. 'प्लॉड' या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे.

हा ऑडिओ तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमचा प्राधान्यक्रम, संवाद जाणून घेत काही वर्षांत तुमचे डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथक्करण करते आणि माहिती निर्माण करते. इथे तसे नाही, फक्त आपला डिजिटल ट्विन आपल्याशी संबंधित माहितीचे पृथक्करण करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काही जणांना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो. इच्छित स्थळ शोधतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने पत्ता शोधला की कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य नक्कीच सुसह्य होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दल सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हे वास्तव आहे. तंत्रज्ञान चहुदिशांनी विस्तारत असून प्रगतीची नवनवी कवाडे उघड होत आहेत. त्यातून नित्य नेमाने नवे तंत्रज्ञान जुन्या तंत्रज्ञानाची जागा घेत आहे. यातूनच मानवी विकासाला नवी दिशा मिळत आहे. त्याचा सगळ्यात मोठा फायदा उद्योग आणि सेवाजगत घेत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र अशाच भराऱ्या घेत राहणार आहे. त्यात तगण्यासाठी आणि स्वविकास साधण्यासाठी तंत्रज्ञांबरोबरच सामान्यांना आणि युवा पिढीला सतत तयारीत राहावे लागणार आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल व्यास**

# जुन्या मैत्रीचे नवीन पर्व

विज्ञानाने सारे जग मुठीत घेतले. पण, माणूस दुरावतो, माणुसकी हरवत चाललेली आहे, अशी अनेक दूषणे दिली जातात. नव्या जुन्यांची तुलना करताना आजच्या पिढीवर प्रश्नचिन्हे उभी केली जातात. प्रत्यक्षात आजचे चित्र वेगळे आहे. त्याला भेटावसं, बोलावसं वाटत असेलही. पण, शारीरिक, बौद्धिक क्षमतेच्या वर नोकरी, व्यवसायात तो-ती गुंतून गेले आहेत. माणूस अनेक लोकांमध्ये वावरतो. पण, त्यात कुठे तरी व्यावहारिक झालर असते. पण, शाळा किंवा महाविद्यालयीन जीवनात निर्माण झालेली मैत्री अपेक्षाविरहित आणि मनाच्या खोल कप्प्यात कायमची जपलेली असते. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर आयुष्य प्रत्येकाला वेगवेगळ्या कारणांनी वेगवेगळ्या दिशांनी घेऊन जाते. नोकरी, व्यवसायासाठी गावाबाहेर जातो, तर कोणी कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमध्ये इतका गुंततो की जुने मित्र हळूहळू संपर्काबाहेर जातात. अनेक वर्षे सोबत शाळेत गेलेले, एकाच बाकावर बसलेले, डबा वाटून खाल्लेले, एक कट चहा दोघे वाटून घेणारे मित्र विखुरले जातात. कुठल्या तरी सुख दुःखात एकमेकांच्या आठवणी निघतात. चर्चा होते आणि पुन्हा आपल्या गुंताळ्यात सर्व गुंतले जातात.

कोरोनानंतर जगण्याचा अर्थ कळला आणि पुन्हा भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला जातो. अशा परिस्थितीत 'व्हॉट्सॲप'सारख्या माध्यमाने शाळेतील मित्रांना पुन्हा एकत्र आणण्यात मोठी भूमिका बजावली आहे. एखादा जुना मित्र, मैत्रीण पुढाकार घेते. संपर्क शोधले जातात आणि हळूहळू एक व्हॉट्सॲप ग्रुप तयार होतो. अगदी विदेशात राहूनही आपले वर्गमित्र शोधून त्यांना व्हॉट्सॲपच्या माळेत गुंफले जाते. पहिल्या काही दिवसांत ओळख परेड होते. नावं ओळखीची वाटतात, पण चेहरा आठवत नाही. मुली सासरी गेल्याने त्यांची सासरची आडनावं कळत नाही. अशा वेळी कुणी जुन्या आठवणी काढतो, कुणी वर्गातल्या खोड्यांचा उल्लेख करतो तर कुणी शिक्षकांचे किस्से सांगतो. याच संवादातून माजी विद्यार्थी स्नेहमिलन मेळाव्याची कल्पना पुढे आली असावी. आज गावागावांत माजी विद्यार्थी मेळावे होत आहेत. बऱ्याच मेळाव्यांसाठी देशविदेशातून मित्र येतात. शाळेच्या जुन्या आठवणींमध्ये ते रमून जातात. हिंगणघाट येथे मोहता शाळेतील माजी विद्यार्थी इक्राम हुसैन यांनी शाळेला ११ हजारांची भेट दिली. मेहकर येथे ज्येष्ठ पत्रकार नितीन कुळकर्णी यांच्या १९८८ च्या तुकडीने तर एक दिवस अख्खी शाळा डोक्यावर घेतली होती. वर्धेतील १९९० सालच्या तुकडीने मंदार अभ्यंकर यांच्या नेतृत्वात रत्नीबाई विद्यालयातील माजी शिक्षकांचा सत्कार केला. १९९१-९२ च्या तुकडीने २०१६ मध्ये मथुरादेवी शाळेतील माजी विद्यार्थी उद्योजक वैभव काशिकर, सचिन अग्निहोत्री यांनी लहानपणी शाळेत सांभाळ करणाऱ्या मावशींचा सन्मान केला होता. न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये १९८९ च्या तुकडीने प्रदीप बजाज यांच्या पुढाकारात झालेल्या विद्यार्थी मेळाव्यात शाळेला मराठी भाषेची प्रयोग शाळा, वॉटर कूलर, खुर्च्यांची भेट दिली होती. अमरावती जिल्ह्यातील जरूड येथील १९९० च्या तुकडीच्या माजी विद्यार्थ्यांचा व्हॉट्सॲप ग्रुप अमेरिकेतील मैत्रीण ममता गोळे हिने तयार केला.

आठवणी ताज्या करताना प्रदीप सातपुतेने शाळेतील पाण्याच्या टाकीची अवस्था बघून डोळ्यात पाणी आल्याची भावना व्यक्त करताना शाळेचा जिव्हाळा जाणवतो. त्याचे कारण म्हणजे शिक्षणाचे बाजारीकरण झाले नव्हते आणि शिक्षक व्यावहारिक नव्हते. शाळेला काचेचे मुलामे चढले नव्हते. तिथे सर्व समान होते. माजी विद्यार्थी मेळाव्यात चेहऱ्यावर वयाची छाया दिसते, केस पांढरे झालेले असतात. पण, माजी विद्यार्थी मेळावा आठवणींचा, भावनांचा आणि आत्मीयतेचा संगम ठरतो. माजी विद्यार्थी मेळावे हे समाजाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे ठरतात. यातून सामाजिक बांधिलकी वाढते, एकमेकांना मदतीची भावना निर्माण होते आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आदर्श उभा राहतो. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास नाती कशी जपता येतात, याचं हे जिवंत उदाहरण आहे. माजी विद्यार्थी मेळावे नात्यांचं पुनर्बांधणीचं काम करतात. या माध्यमातून मैत्रीचा पूल बांधला जातो. परंतु, आजच्या मानसिकेतेत त्याचा विपर्यासही होता कामा नये! माजी विद्यार्थी मेळाव्याच्या माध्यमातून कोणाच्या वैयक्तिक आयुष्यात विनाकारण न डोकावता हा मैत्रीचा सेतू असाच वाढत जावा त्याचे एक नवीन कुटुंब तयार व्हावे! कामाच्या प्रचंड व्यापात असलेल्यांना आता कुठेतरी एकत्र यावेसे वाटते आहे. माजी विद्यार्थी मेळावा हा त्याची पायरी ठरावा आणि विखुरलेले कुटुंब एकत्र येत संयुक्त कुटुंब पद्धती या जुन्या मैत्रीतील नव्या पर्वाचे शिखर ठरावे.

९८८१९०३७६५

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राजदमध्ये 'तेजस्वी' युग सुरू

मागील आठवड्यात राजधानी दिल्लीत मूळ बिहारचे असलेले नितीन नवीन यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सूत्रे स्वीकारली असताना बिहारमध्ये आणखी एक मोठी राजकीय घडामोड झाली. राजदचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तेजस्वी यादव यांची निवड झाली. राष्ट्रीय जनता दलाचे राष्ट्रीय अध्यक्षपद आतापर्यंत लालूप्रसाद यादव यांच्याकडे होते. आता तेजस्वी यादव यांना राजदचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष बनवत राजदने त्यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाचा मार्ग प्रशस्त केला आहे.

लालूप्रसाद यादव ७८ वर्षांचे आहेत, दुसरीकडे त्यांची प्रकृतीही त्यांना आता पहिलेसारखी साथ देत नाही. त्यांच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या आहेत. मुलगी रोहिणी आचार्यने दिलेल्या किडनीवर त्यांचे उर्वरित आयुष्य सुरू आहे. पक्ष वाढवण्यासाठी जी धावपळ करावी लागते, ती करण्याची क्षमता आता त्यांच्यात उरली नाही. काही महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाचा प्रचारही ते करू शकले नाहीत. त्यामुळे राजदला नव्या दमाच्या नेतृत्वाची गरज होती, ती तेजस्वीच्या रूपात पूर्ण झाली, असे म्हणायला हरकत नाही. तसेही गेल्या काही वर्षांपासून तेजस्वी यादवच पक्षाची धुरा सांभाळत आहेत.

देशातील राष्ट्रीय पक्षांनी आपले नेतृत्व तरुण पिढीकडे सोपवण्याची प्रक्रिया सुरू झाली, असे या घटनाक्रमावरून म्हणायला हरकत नाही. याला अपवाद फक्त काँग्रेसचा म्हणावा लागेल. काँग्रेसचे नेतृत्व ८० वर्षीय वयोवृद्ध नेत्याकडे आहे. रामविलास पासवान यांनी लोजपाचे नेतृत्व आपल्या मुलाकडे म्हणजे चिराग पासवानकडे सोपवले होते. त्या मालिकेत आता लालूप्रसाद आले आहेत.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजदचे पुरते बारा वाजले. राजदने ही निवडणूक महाविकास आघाडीच्या नावावर काँग्रेस आणि डाव्या पक्षांसोबत आघाडी करून लढवली होती. या आघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले होते. मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न पाहणाऱ्या तेजस्वी यादव यांना कसेबसे विरोधी पक्षनेतेपद मिळवता आले.

५ जुलै १९९७ ला लालूप्रसाद यादव यांनी जनता दलातून बाहेर पडत दिल्लीत राष्ट्रीय जनता दल आपल्या पक्षाची स्थापना केली होती. गंमत म्हणजे त्यांनी दोनदा बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवले. पण ते राजदचे मुख्यमंत्री नव्हते, तर जनता दलातर्फे मुख्यमंत्री झाले होते. चारा घोटाळ्यात तुरुंगात जायची वेळ आल्यामुळे लालूप्रसादांना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. पण आपल्या जागेवर पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्री बनवत मुख्यमंत्रिपद आपल्या घरातच ठेवण्याचा, आतापर्यंत कोणत्याही राजकीय नेत्याला सुचला नाही, असा मार्ग निवडला. राजकारणाचा गंध नसलेल्या राबडीदेवी यांनी एक, दोनदा नाही तर तीन वेळा राजदच्या नेत्या म्हणून बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवले.



बिहारमध्ये कधीकाळी लालूप्रसादांचा प्रभाव होता. चारा घोटाळ्यात तुरुंगात जावे लागल्यानंतरही तो काही प्रमाणात कायम होता. त्यामुळेच 'जब तक रहेंगा समोसे में आलू, तब तक रहेंगा बिहार में लालू' असे म्हटले जात होते. समोस्यातील आलू नेहमीसाठी कायम आहे. मात्र बिहारमधून लालूंचा प्रभाव नंतरच्या काळात कमी होत गेला. मुस्लिम आणि यादव अशा 'एमवाय' समीकरणाच्या आधारे लालूप्रसादांनी बिहारमध्ये राज्य केले, पण नंतर हे समीकरण म्हणजे मुस्लिम आणि यादव हा हक्काचा मतदारही त्यांच्या राजदपासून दूर झाला. तसे नसते तर २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत लालूप्रसादांच्या राजदचा दारुण पराभव झाला नसता. लालूप्रसादांना मोठा तेजप्रताप आणि लहान तेजस्वी अशी दोन मुले आहेत. लालूप्रसादांचा ओढा हा सुरुवातीपासून तेजस्वीकडे राहिला. त्यामुळे तेजप्रतापला डावलत त्यांनी तेजस्वीला आपला राजकीय वारस घोषित केले. तेजस्वीला मुख्यमंत्री म्हणून पाहायचे लालूप्रसादांचे स्वप्न होते. त्यासाठी वेगवेगळे प्रयोग त्यांनी केले. आपले कट्टर राजकीय विरोधक नितीशकुमार यांच्याशी आघाडी करायलाही मागेपुढे पाहिले नाही. २०१५ ची विधानसभा राजदने राज्यात नितीशकुमारांच्या जदयुसोबत आघाडी करून लढवली. या निवडणुकीत राजदला ८० तर जदयुला ७१ जागा मिळाल्या. जागा कमी असतानाही नितीशकुमार मुख्यमंत्री झाले. त्यांच्या मंत्रिमंडळात तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले. तेजप्रतापचाही मंत्रिमंडळात समावेश झाला. पण हे सरकार फार काळ टिकले नाही.

२०२० ची विधानसभा निवडणूक राजदने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करून लढवली. या निवडणुकीत राजद आघाडीला ११० जागा मिळाल्या, म्हणजे बहुमतापेक्षा फक्त १२ जागा कमी. यात राजदच्या सर्वाधिक म्हणजे ७५ जागा होत्या. काँग्रेसला १९ तर डाव्या पक्षांना १६ जागा मिळाल्या. यावेळी तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्रिपदाने हुलकावणी दिली.

२०२५ च्या विधानसभा निवडणुकीत तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वात महाविकास आघाडीचे पानिपत झाले. महाविकास आघाडीला ३३ जागा मिळाल्या. यात राजदच्या २५, काँग्रेसच्या ६ तर भाकपा मालेच्या २ जागांचा समावेश होता. या निवडणुकीत तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री म्हणून पाहण्याचे लालूप्रसादांचे स्वप्न पूर्णपणे बेचिराख झाले. राजदच्या नावातच फक्त राष्ट्रीय हा शब्द आहे. कधीकाळी हा पक्ष औटघटकेसाठी राष्ट्रीय पक्ष होताही. आता हा पक्ष बिहारपुरताच मर्यादित झाला आहे. आधी झारखंडमध्ये या पक्षाचा थोडा फार प्रभाव होता. पण आता तो तेवढाही राहिला नाही. २००८ मध्ये राजदने ईशान्येकडील काही राज्यांत यश मिळवले. त्यामुळे या पक्षाला राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाला. २०१० मध्ये मात्र राजदचा राष्ट्रीय पक्षाचा दर्जा जो निघाला, तो पुन्हा कधी त्याला मिळाला नाही आणि आता मिळण्याची दूरदूरपर्यंत शक्यताही नाही.

तेजस्वी यादव आता कधीच मुख्यमंत्री होण्याची शक्यता नसल्यामुळे लालूप्रसादांनी आपल्या राजकारण संन्यासाची अप्रत्यक्ष घोषणा करत पक्षाची संपूर्ण सूत्रे तेजस्वी यादव यांच्याकडे सोपवली. पण कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून तेजस्वी यादव यांची वाटचाल वाटते तितकी सोपी नाही. जदयु आणि भाजप यांचे कडवे आव्हान तर त्यांच्यासमोर आहे, पण त्यांना त्याआधी आपल्या घरातील भाऊबंदकीचा सामना करावा लागणार आहे. मोठा भाऊ तेजप्रताप याने राजदमधून हकालपट्टी झाल्यावर नव्या राजकीय पक्षाची स्थापना केली. लालूप्रसादांना किडनी देत जीवनदान देणारी रोहिणी आचार्य यांनीही तेजस्वी यादव यांच्या निवडीवर जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे तेजस्वी यादव यांच्यासाठी रात्रच नाही तर दिवसही वैऱ्याचा आहे. त्यामुळे नाव तेजस्वी असले तरी तेजस्वी यादव पक्षात तेजस्वी युग आणतील, याची शक्यता कमीच दिसते.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### पोलिसांनी केलेले समुपदेशन लाभदायक

कौटुंबिक स्वरूपाचे गुन्हे कमी व्हावेत यासाठी भरोसा सेल, दामिनी पथक, सामाजिक सुरक्षा पथक हे नेहमी सकारात्मक प्रयत्न करीत असतात. मागील वर्षी महिला दिनाच्या दिवशी धरमपेठ पॉलिटेक्निक या महाविद्यालयात प्रमुख अतिथी म्हणून पोलिस प्रशिक्षण केंद्र येथील पोलिस निरीक्षक शुभांगी वानखेडे उपस्थित होत्या. त्यांनी अनेक उदाहरणे देऊन अगदी क्षुल्लक कारणावरून भांडणे विकोपाला जातात आणि गुन्हे घडतात आणि कुटुंब मोडते. अशा वेळी पोलिस समुपदेशन करतात. बऱ्याच वेळा कौटुंबिक कलह संशयी स्वभावामुळे होतात. यात दोन्ही बाजू ऐकून दोघांनाही समुपदेशन केल्याने बऱ्याच अंशी हिंसा, कलह टळून गैरसमज दूर झाल्याचे दिसून आले आहे. योग्य समुपदेशनाने गुन्हेगाराला चूक सुधारण्याची संधी मिळते आणि कुटुंब अबाधित राहते. पोलिसांच्या समुपदेशनामुळे कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये २१ टक्क्यांनी घट झाल्याचे वृत्त समोर आले आहे. हे नक्कीच आशादायी चित्र आहे.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### स्वीकृत नगरसेवक सामाजिक क्षेत्रातून हवेत

राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकांनंतर लोकनिर्वाचित नगरसेवक शहर विकासाची जबाबदारी सांभाळत आहेत. त्याचबरोबर प्रत्येक नगरपालिका व महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक नेमण्याची तरतूद आहे. हा अधिकार राजकीय पक्षांकडे असला तरी तो केवळ राजकीय समतोलासाठी न वापरता सामाजिक विकासासाठी वापरण्याची गरज आहे.

पत्रकार, लेखक, पर्यावरणवादी, निवृत्त सैन्य व अग्निशमन अधिकारी, समाजसेवक, विचारवंत अशा निष्ठावंत सामाजिक कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून संधी दिल्यास नगरपालिका, महानगरपालिकेच्या कामकाजाला नवी ऊर्जा मिळेल. अशा व्यक्तींचा अनुभव, अभ्यास व समाजाशी असलेली बांधिलकी शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देऊ शकते. राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यालाही मानाचे स्थान देत, सरकार व सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन स्वीकृत नगरसेवकांची निवड सामाजिक पातळीवर केल्यास राज्यातील नगरपालिका, महापालिकांचे चित्र बदलू शकते. असा निर्णय घेतल्यास सामाजिक कार्याला नवी चालना मिळेल आणि राज्याचे नाव देशपातळीवर सुवर्ण अक्षरांनी कोरले जाईल.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

### अरिजित सिंहची निवृत्ती

अरिजित सिंह सर्व संगीतप्रेमींना मनापासून भावणारा स्वर. सिने जगतातील एक तरुण स्वर असलेला लाडका पार्श्वगायक. संगीत ही एक आजन्म करावयाची साधना आहे आणि त्यासाठी शिकणे, नवे प्रयोग करणे आवश्यक आहे. संगीत कला ही मनामनाला जोडणारी आहे आणि स्वरसाधना तर थेट परमेश्वराशी संवाद साधते. अरिजित यांची संगीत निवृत्ती ही घोषणा संगीतप्रेमींना अत्यंत धक्कादायक वाटली पण त्यामागे संगीत क्षेत्रात अजून काही भरीव कामगिरी करण्याचा प्रयत्न अधिक सुखावह आहे. त्यांची अनेक लोकप्रिय गीते रसिकांना मंत्रमुग्ध करतात. हिंदीबरोबरच बंगाली, तमिळ, तेलगू, मल्याळम, मराठी अशा अनेक भाषांतील गाणी ही पुन्हा पुन्हा ऐकावी अशीच आहे.



आज प्रत्येक व्यक्ती प्रसिद्धी आणि पैसा यामागे जीव तोडून धावत आहे. जगात प्रत्येक क्षेत्रात प्रचंड स्पर्धा आहे आणि अशा वेळी हा अतिशय अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. साधी राहणी, नम्र स्वभाव हा या गायकाचा एक गुण म्हणता येईल.कारकीर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असताना निवृत्ती जाहीर करणे म्हणजे अहंकारावर केलेली मात आहे. मी आणि माझे यातून निवृत्त होऊन मनाची शांती मिळवणे ही स्थितप्रज्ञ वृत्ती आहे. संगीत ही साधना आहे आणि साधना सिद्ध करायची तर या जगाच्या झगमगाटापासून दूर झाल्याशिवाय ती साध्य होणार नाही. साधनेचा हा ध्यास व्यक्तीला इप्सित साध्य करण्यासाठी लाभदायक असतो. स्वतःचा शोध घेण्याची वृत्ती अंगीकारली पाहिजे हे निश्चित. त्यागयुक्त भोग हेच खरे जगणे आहे. सर्वांत राहून देखील अलिप्त राहणे ही तपस्या आहे. यश आणि सत्य यात सत्याचा शोध महत्त्वाचा आहे. खरोखरच माया भुरळ घालते पण त्यातून सावरले पाहिजे हाच संदेश या प्रथितयश गायकाने दिला आहे हे निश्चित. तुम ही हो, चन्ना मेरे आ, केसरीया, ए दिल है मुश्किल अशा एकापेक्षा एक सरस गीतांच्या लहरींवर स्वार होत नवीन अधिक उत्तम संगीत लवकरच येईल ही आशा मानत आहे. अरिजित यांना संगीत क्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# दोन महिन्यापासून पगार नसल्याने झोन ४, ५ मधील घंटागाडी कामगार संपावर

**सुमारे १५० कामगारांनी एकत्र येत केली जोरदार निदर्शने**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

शहरातील कचरा संकलन करणाऱ्या झोन चार आणि पाच कडील घंटागाडी कामगारांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधत संप पुकारला. जुळे सोलापूर येथील डी मार्टच्या मागील बाजूस असलेल्या झोन पाचच्या आवारात एकत्र येत सुमारे दीडशे कामगारांनी जोरदार निदर्शने केली.

शहरातील कचरा घरोघरी जाऊन संकलित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने घंटागाडीच्या माध्यमातून कचरा संकलन करण्याचा मक्ता दिला आहे. या मक्तेदारांकडून कंत्राटी पद्धतीने घंटागाडी कामगार ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी झोन चार आणि पाच कडील घंटागाडी कर्मचाऱ्यांनी बुधवारी सकाळपासूनच दोन महिन्यापासून पगार झाला नसल्याकडे लक्ष वेधत संप पुकारला. कामगांराची पिळवणूक होत असल्याचा आरोप या कामगारांनी केला आहे. घंटागाडी मक्तेदार सर्व घंटागाडी कर्मचाऱ्यांची मानसिक, शारिरिक व आर्थिक पिळवणूक करीत आहेत. त्यांच्या त्रासाला कंटाळून बेमुदत संप करीत असल्याचे या घंटागाडी कामगारांनी स्पष्ट केले आहे.



शासन जीआर असतांना आजतगायत नियमाप्रमाणे किमान वेतन मिळत नाही. साप्ताहिक पगारी सुट्टी असतांना मिळत नाही. राष्ट्रीय सणाची सुट्टी मिळत नाही. पगार स्लिप दिली जात नाही. पीएफ, इएसआय पगारातुन कपात होतो पण त्याचा लाभ मिळत नाही. स्कॅनरचे आमचे काम नसतांना करायला लावतात. दर महिन्याच्या १० तारखेच्या आत पगार मिळावा. कामगारांना सुरक्षा साहित्य पुरवले जात नाही, त्यामुळे आमचे आरोग्य धोक्यात आहे. सर्व विषयावर कोणी बोलले तर कामावरून काढण्याची धमकी दिली जाते. याकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे कामगारांनी सांगितले. सर्व मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत संप राहील. कामगार हिताचे निर्णय घ्यावे व सर्व कामगारांची मानसिक, शारिरिक व आर्थिक पिळवणूक थांबवावी अशी मागणी या कामगारांनी केली आहे. दुसऱ्या दिवशीही हा संप सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांनी संबंधित कामगारांशी चर्चा केली. संबंधित मक्तेदाराला सूचना केल्या जातील, असे आश्वासन दिले. बाबा गड्ड्याला कधी नेणार आहात? सर्व जाऊन येत आहेत...!

### बाबा गड्ड्याला कधी नेणार आहात ?

सर्वजण जाऊन येत आहेत... आम्हालाही न्या की... असा हट्ट लहान मुले करीत आहेत. मात्र गेल्या दोन महिन्यापासून आम्हा घंटागाडी कामगारांना पगार दिला नाही. सोलापूर शहरातील घरोघरचा कचरा संकलित करणाऱ्या घंटागाडी कामगारांच्या मुलांना पैशाअभावी गड्डा यात्रा पाहता येत नाही. लहान मुले सतत हट्ट करत आहेत. त्यांना काय सांगायचे ? घरातील राशन संपलय, महिन्याच्या गोळ्या संपल्यात... काय करावं काही समजत नाही, अशी व्यथा घंटागाडी कामगारांनी मांडली.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात...



### श्री सरस्वती मंदिर

श्री सरस्वती मंदिर संस्थेच्या प्रांगणात भारतीय प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी श्री सरस्वती मंदिर संस्थेच्या सचिवा मा. सौ. रोहिणी तडवळकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. या सोहळ्यास श्री सरस्वती मंदिर संस्थेच्या उपाध्यक्षा मा. सौ रेवती कुलकर्णी, खजिनदार मा. श्री सुधीर देव, ज्येष्ठ सदस्य मा.ॲड.श्री रघुनाथ दामले आणि संस्थेचे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. स. हि. ने. प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ नीता येरमाळकर, ल. कि. प्रा. शाळेच्या मुख्या.सौ जयश्री राठोड, जा. रा. चंडक बालक मंदिर च्या मुख्या.सौ सोनाली सोनाळे आणि सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर प्रशालेचे संगीत विभाग प्रमुख संतोष कोथळीकर आणि संगीत बालचमू यांच्या सोबत उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत, ध्वजगीत व राज्य गीत गायले.



### नेताजी शिक्षण संकुल

नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संकुलातील मराठी प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष राजशेखर घंटे, सहसचिवा वैशाली अभंगे, प्राथमिक पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष पुजारी, माता पालक संघाच्या सदस्या भाग्यश्री बंदलगी, इंग्लिश मिडीयम माता पालक संघटनेच्या सदस्या रुपाली म्हमाणे, इंग्लिश मिडीयम पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष रमेश परशी उपस्थित होते. याप्रसंगी जयश्री घुगरे यांना आदर्श माता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन शितल पाटील यांनी केले. शिवानंद पुजारी यांनी आभार मानले.



### शमा उर्दू शाळा

मजरेवाडी येथील शमा उर्दू प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिवस संस्थच्या अध्यक्ष अय्यूब अहमद यांच्या अध्क्षतेखाली व प्र. मुख्यध्यापिका यास्मिन अ मन्नान बिजापूरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तर माजी प्राचार्य अब्दुल मन्नान शेख व सोशलचे माजी मुख्यध्यापक हाजी तजम्मुल हुसेन चाँदा व अब्दुल कुद्दूस यांची प्रमुख उस्थिती होती. प्रमुख पाहुणे चाँदा, शेख, नल्लामंदू यांनी विद्यार्थ्याना मार्गदर्शन केले .अबरार अहमद यांनी सर्व पाहुण्यांना शाल बुके देऊन सन्मान केले या वेळी विविध स्पर्धेत यश प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन कौतुक करण्यात आले. सूत्रसंचालन शाहीन शकील नल्लामंदू यांनी केले तर आभार आसीया बिजापूरे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलशाद अ रजाक, जुबेद सैदखा, मेअराज अल्लोळी यांनी परिश्रम घेतले.

# राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा व जीवन कौशल्य प्रशिक्षणास सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाअंतर्गत समग्र शिक्षण योजनेतून राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा व जीवन कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. हा शुभारंभ असोसिएशन ऑफ ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशनचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ग्रँडमास्टर युवराज गायकवाड तसेच मराठी शाळेचे मुख्याध्यापक सज्जन यांच्या हस्ते पार पडला.

सोलापूर महानगरपालिका सदर बाजार येथील मराठी शाळा क्रमांक १ ते ८ येथे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत मुलींची सुरक्षितता, आत्मविश्वास, शिस्त तसेच स्वसंरक्षण क्षमता विकसित व्हावी, या उद्देशाने राणी लक्ष्मीबाई आत्मरक्षा व जीवन कौशल्य प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात ग्रँडमास्टर युवराज गायकवाड, तसेच लेडीज कोच कश्यप जमादार व मोनिका गायकवाड हे प्रशिक्षक मुलींना कराटे व आत्मरक्षा प्रशिक्षण देणार आहेत. या कार्यक्रमास मुख्याध्यापक सज्जन, बंदुकवाले गोकुळ कांबळे, खांडेकर आदी उपस्थित होते. हा उपक्रम मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांना सक्षम, आत्मनिर्भर व स्वावलंबी बनवण्यासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २२/२०२६
नि.८

**सोलापूर येथील मे. ३ रे जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे कोर्टात**
**(श्री. पी.पी. राजवैद्य साहेब)**

**चि. प्रज्ञेश प्रशांत खडतरे,**
वय - ७ वर्षे, धंदा - शिक्षण,
अज्ञान अर्जदारतर्फे आ.पा.क. आई
**श्रीमती. अश्विनी प्रशांत खडतरे,**
वय - ३३ वर्षे, धंदा - घरकाम,
रा. प्रांत ऑफिस जवळ, कुर्डूवाडी,
ता. माढा, जि. सोलापूर — **अर्जदार**

विरूद्ध

**महाराष्ट्र शासन,**
**(सदर नोटीस ही मा. जिल्हाधिकारी सोलापूर, यांचेवर बजावण्यात यावी)** — **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अर्जदार यांचे नावे असणारी डि. व सब. डि. सोलापूर तालुका उत्तर पैकी शहर-सोलापूर महानगरपालिका हद्दीतील नेहरू नगर येथील रो-हाऊस मिळकत भूमापन क्र. २४२४/प्लॉट नं./१२/आर पैकी क्षेत्र १.११.०० आर चौ.मी. मधील अज्ञान अर्जदार याचा अविभक्त १/२ हिस्सा श्री. राजेंद्र तुकाराम राठोड यांना विक्री करण्यास परवानगी देण्यात यावी यासाठी दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकत विक्री करण्यास कोणाची काही हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा नेमलेली तारीख ०२/०३/२०२६ रोजी मे. न्यायालयामध्ये स्वतः अथवा वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे अथवा हरकत द्यावी. मुदतीत कोणाची काही हरकत न आल्यास मे. न्यायालय अर्जदार यांचे मागणी प्रमाणे मिळकत विक्रीस परवानगी देईल. त्यानंतर कोणाची काही तक्रार चालणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली ता. २९/०१/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय सोलापूर**

**नावात बदल**

माझे जुने नाव **नागुर शाहेराबानु हुसेनसाहेब** असे होते. आता नवीन नाव **नागुर साहेराबानु हुसेनसाब** असे आहे.
आता यापुढे नवीन नावाने ओळखण्यात यावे.
पत्ता : प्लॉट नं. २१ मोमीन नगर, मुळेगाव रोड, व्हीटीसी, सोलापूर पिन कोड : ४१३००५ सोलापूर
**ऑफि.नं. ३४२४**
**दि. २९/०१/२०२६**

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **KEDAR BALWANT GRAMOPADHYA** HAS BEEN CHANGED TO **KEDAR BALAVANTARAV GRAMOPADHYE**

Resi. - Gramopadhye Wada Tilak Galli, Akkalkot, Tal. Akkalkot Dist. Solapur - 413216

**KINDLY NOTE**

**THE SAME. (28413 Dtd.29.01.2026)**

**कागदपत्रे गहाळ जाहीर नोटिस**

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील राहिवाशांना या कागदपत्रे गहाळ नोटिस कळविण्यात येते की, **कागदपत्रांचे वर्णनः-** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगर पालिका हद्दीतील दक्षिण कसबा सर्व्हे क्र ५४४ब/२ मधील घर / मिळकत क्र ५११ब (सो.म.पा मिळकत क्र ०११९३५) यांसी एकूण क्षेत्र ५७ चौ.मी. अथवा ६१३.३२ चौ.फुट इतकी असून, सुनील जयकुमार भंडारकवठेकर यांच्याकडून माझे अशील चंद्रशेखर दिगंबर भादुले यांनी ०१/१०/२००४ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय उत्तर सोलापूर योग्य तो मोबदला देऊन रितसर खरेदी केली आहे.

सदर वर नमूद मिळकतीचा मूळ खरेदीदस्त श्री. चंद्रशेखर दिगंबर भादुले यांचे नावे आहे. त्यांच्या पश्चात मृत्युपत्रानुसार आनंद चंद्रशेखर भादुले यांच्या नावे झालेली आहे.

मी आनंद चंद्रशेखर भाटुले राहणार ५११/ब दक्षिण कसबा, सोलापूर येथे राहत असून माझ्या कडील खरेदीखत दस्त व मृत्युपत्र हे कागदपत्रे माझ्या ताब्यात होते, तरी मी दि. २३/१२/२०२५ रोजी माझे राहते घर ५११/ब दक्षिण कसबा, सोलापूर ते दत्त चौक, सोलापूरकडे मोटारसायकलला लावलेली पिशवी ही कोठे तरी पडून गहाळ झाले आहे. त्या पिशवीमध्ये खरेदीखत दस्त नं. ५२०४/२००४ दि. ०१/१०/२००४ तसेच मृत्युपत्र दि. ०५/११/२००९ रोजी रजि. दस्त नं १००६४ हवेली नं. १७ पुणे अशी कागदपत्रे होती. ही पिशवी व त्यातील कागदपत्रे कोणाला सापडले असतील तर ते कागदपत्रे खालील पत्त्यावर आणून देणे.

सदर या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, वर नमूद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह अन्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, खरेदीखत, पोटगी, टच, जप्ती, या व इतर अन्य कोणत्याही स्वरूपाचे बोजा, हक्क व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत आम्हांस खालील नमूद पत्र्यावर लेखी कागदपत्री पूराव्यानिशी वैध हरकत नोंदवावीत. मुदतीत कोणाचेही कसलाही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपूर्ण निर्वेध, निर्वेध निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल कर्ज प्रकरणाचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या जाहीर नोटीसीने घ्यावी.

ही गहाळ नोटिस दिली २९/०१/२०२६.

**सही/-**
**ॲड. दिपक बाबासाहेब सोनवणे**
**पत्ता:- बेसकर कॉम्प्लेक्स, दूसरा मजला**
**चेंबर नं. २०९. सिध्देश्वर पेठ, सोलापूर**
**मो.नं ८०५५६०६१०१**
**अशीलतर्फे ॲडव्होकेट**

**SHRI MAHAVIR URBAN CO. OP BANK LTD., SOLAPUR**

Head Office: 60/61, East Mangalwar Peth, Solapur 413002
PH: (0217) 2622933/44

**DEMAND NOTICE UNDER SECTION 13(2) OF SARFAESI ACT 2002**

Whereas you the below mentioned Borrower, Co-Borrower, Guarantors and Mortgagors have availed loan from Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur by mortgaging your immovable property. Consequent to default committed by you all, your loan account has been classified as Non Performing Asset, whereas Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur being a secured creditor under the Act, and in exercise of the powers conferred under section 13 (2) of the said Act read with rule 2 of Security Interest (Enforcement) Rules 2002 issued Demand Notice calling upon the Borrowers/ Co-Borrower/ Guarantor's/ Mortgagors as mentioned below to repay the amount mentioned in the notice with future interest thereon within 60 days from the date of receipt of the said notice, but the notice of Borrower, Co-Borrower and Guarantor No.1 has been returned unserved for some reason thus this notice as below.

| | |
|---|---|
| Name of Borrower/ Co-Borrower/ Guarantor/ Mortgagor | **Borrower:** **Shrinivas Shankarrao Yemul** R/o: 1194, New Pachha Peth, Near Old WIT College, Opp. Surya Gym, Solapur 413006 **Co- Borrower:** **Sarvesham Shankarrao Yemul** R/o: 1194, New Pachha Peth, Near Old WIT College, Opp. Surya Gym, Solapur 413006 **Guarantor:** **1) Vishnu Somayya Rapol** R/o: C-26-18, Vinkar Society, Gandhi Nagar, Akkalkot Road MIDC, Solapur 413005 **2) Meghsham Mallikarjun Yemul** R/o: 1159, New Pachha Peth, Solapur 413006 |
| Loan Account No. | 0030032130000031 |
| Loan Amount | Rs. 6,00,000/- (Rs. Six Lakh only) |
| Details of the Security to be enforced | All that piece and parcel of Land and Building situated within District and Sub District Solapur, Taluka.North Solapur, within limits of Solapur Municipal Corporation at New Pachha Peth, having C. T. S. No. 10394 out of it Final Plot No. 35, Sub Plot No. 351, having a total area of 357.7 Sq. Mt., the said property is bounded by as follows: **East :** Road, **West :** Residential Plot of Mallikarjun Kamtam, **North :** Road, **South :** Residential Plot of Lakshmipati Devsani |
| Date of NPA | **30/06/2025** |
| Demand Notice date | **02/01/2026** |
| Total Amount Due | **Rs. 6,56,288/-** (Rs. Six Lakh Fifty Six Thousand Two Hundred and Eighty Eight Only) Plus future interest and other expenses which is found due on 31/12/2025 |

Notice is therefore given to the Borrower/Co-Borrower/Guarantor/Mortgagor as mentioned above and calling upon them to make payment of the aggregate amount as shown above against the respective Borrower/Co-Borrower/Guarantor/Mortgagor within 60 days of Publication of this notice as the said amount is found payable in relation to the respective loan account as on the date shown above. It is made clear that if the aggregate amount together with future interest and other amounts which may become payable till the date of payment is not paid, Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur shall be constrained to take appropriate action for enforcement of security interest upon property described above. Please note that this publication is made without prejudice to such rights and remedies as are available to Shri Mahavir Urban Co-op Bank Ltd., Solapur against the Borrower/Co-Borrower/Guarantor's/ Mortgagors of the said financials under the law. You are further requested to note that as per section 13(13) of the said act, you are restrained/ prohibited from disposing of or dealing with the above security or transferring by way of sale, lease or otherwise of the secured asset without prior consent of Secured Creditor.

**Date:** 29/01/2026
**Place:** Solapur

SEAL

**Sd/-**
**Authorised Officer**
**Shri. Mahavir Urban Co op Bank Ltd., Solapur**

**ANGEL ONE LIMITED**
**Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093**
**Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in**
**Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX**
**Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,**
**NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534**

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| **Shubham Siddeshwar Mhamane** | **Shubham Siddeshwar Mhamane** | S/O Siddheshwar 246 Vidya Nagar Shelgi Near Janata Banksolapur North Solapur Mkt Solapur 413002 Maharashtra | **NSE : AP0397623221** |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

**Date : 30.01.2026**
**Place : Maharashtra**

**For ANGEL ONE LTD**
**Sd/-,**
**Authorised Signatory**

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक**
SJSB Multi-State Scheduled Coop.Bank
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com वेबसाईट : www.sjsbbank.com

**लिलाव सुचना**

आमचे बँकेच्या जुळे सोलापूर शाखा येथून श्री. प्रशांत हणमंतप्पा बिराजदार पाटील रा.६१ नवीन संतोष नगर, विजापूर रोड, सोलापूर. यांनी दि.२१/०५/२०२५ रोजी सोने जिन्नस तारणावर रक्कम रु.२८५०००/- चे कर्ज घेतलेले आहे. सदर कर्जखाते दि.२९/०८/२०२५ रोजी (NPA) मार्क झालेले आहे. सध्या त्यांचेकडून रक्कम रु.३०२१२१/- व दि.०१/०१/२०२६ पासूनचे व्याज येणे बाकी आहे.

याबाबत कर्जदार श्री. प्रशांत हणमंतप्पा बिराजदार पाटील यांना अनेक वेळा नोटीसीने मागणी करूनही त्यांनी सदरची येणेबाकी रक्कम आमचेकडे भरलेली नाही. सबब सदर कर्जदार श्री. प्रशांत हणमंतप्पा बिराजदार पाटील यांचे आमचेकडे असलेल्या सोने जिन्नसाचा लिलाव आमचे जुळे सोलापूर शाखेत दि.१६/०२/२०२६ दुपारी ठीक २.०० वाजता आयोजित करण्यात आलेला आहे.

**सोने जिन्नस तारणाचा तपशील**

| अनु. क्र. | जिनसाचे वर्णन |
|---|---|
| १ | रायडी सोन्याचे गंठन नग- १ काळे मणी सह वजन ५६.९०० ग्रॅम, अंदाजे सोने वजन ५१.९०० ग्रॅम, शुद्ध सोने. ४७.५०० ग्रॅम |

**सही/-**
**शाखाव्यवस्थापक**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**शाखा - जुळे सोलापूर**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकास या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि ।। व सब डि ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील मौजे मजरेवाडी येथील मिळकत यांसी जुना सर्व्हे नंबर २४०/१ यांसी नवीन सर्व्हे नंबर ३५/१, यापैकी बत्तुल नगर या नावाने ओळखले जाणारे नगरातील प्लॉट नं. २६ए, यांसी हद्द पूर्व-पश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २० फुट असे एकूण क्षेत्र ८०० चौरस फुट किंवा ७४.३४ चौरस मीटर इतके आहे. यात चारही बाजुने पत्रे असलेले वरती पन्हाळी पत्रे असलेले एक खोली असुन बाकीची जागा खुली आहे. यासी चतुःसिमा येणेप्रमाणे :- पूर्वेस - प्लॉट नंबर २५ए, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - प्लॉट नंबर २८, उत्तरेस - प्लॉट नंबर २६, येणेप्रमाणे वर्णनाची प्लॉट जागा ही विजयालक्ष्मी रमेश संदलगी, रा. सोलापूर यांचे मालकी व कब्जे वहिवाटीची असुन त्यांनी सदरहू प्लॉट जागा आमचे अशिल सिद्दू लिंगप्पा नाईकोडी यांना विक्री करण्याचे ठरवून आमचे अशिलाकडून काही रक्कम स्वीकारुन सदरहु प्लॉट जागेचे इसारापावती लिहून दिलेली आहे. तसेच सदरहु प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची ग्वाही त्यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तथापी ज्या कोणाचाही या प्लॉटजागा करार, साठेखत, दान, गहाण, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, बोजा, वाटणी पत्र, मृत्युपत्र, कोर्ट केसेस बँक केसेस, लिज पेन्डन्सी या अथवा अन्य कोणत्याही मार्गाने हक्क अथवा हितसंबंध असतील त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ (आठ) दिवसांचे आत कागदोपत्री पुरावा देऊन लेखी हरकत खालील नमुद पत्त्यावर द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरची प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचे समजुन पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर मात्र कोणाचीही कसलीही तक्रार व हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

ही जाहीर नोटीस दिली ता. २९/०१/२०२६

**सही/-**
**गड्डम डी. एम. (ॲडव्होकेट)**
**बी.कॉम., एलएल.बी. नोटरी भारत सरकार**
**शॉप नंबर ४२, कोर्ट कम्पाऊंड लगत, हॉटेल फाईव्ह स्टारसमोर, सिध्देश्वर पेठ, सोलापूर**
**मो.नं. ९४२०३५६६१५ अशिलातर्फे ॲडव्होकेट**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# फिरकीपटू हर्ष दुबेचे ६ बळी

## रणजी करंडक क्रिकेट ● उत्तर प्रदेश २३७, विदर्भ बिनबाद ३३ ● ध्रुव जुरेलचे शतक हुकले

◆ **नागपूर, २९ जानेवारी**

येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर गुरुवारपासून प्रारंभ झालेल्या उत्तर प्रदेशविरुद्धच्या एलिट गट अ क्रिकेट सामन्याच्या पहिल्या दिवशी विदर्भाच्या डावखुरा फिरकीपटू हर्ष दुबेने आपल्या घरच्या खेळपट्टीचा पुरेपूर फायदा घेत ६ बळी टिपण्याची किमया केली. उत्तर प्रदेशला पहिल्या डावांत ६८.५ षटकांत २३७ धावांत रोखल्यानंतर विदर्भाने प्रत्युत्तरात दिवस अखेर १२ षटकांत बिनबाद ३३ धावांची नोंद केली. खेळ थांबला तेव्हा सलामीवीर अमन मोखाडे नाबाद १९ धावांवर, तर सत्यम भोयर नाबाद १३ धावांवर खेळत होते.

उत्तर प्रदेश संघाचा कर्णधार आर्यन जुयालने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र त्यांना विदर्भाच्या गोलंदाजांसमोर अपेक्षेप्रमाणे चांगली सुरुवात करता आली नाही.

डावाच्या प्रारंभी नचिकेत भुतेने माधव कौशिकचा ( ४) त्रिफळा उडविला, नंतर हर्ष दुबेने सलामीवीर अभिषेक गोस्वामी (१४), कर्णधार आर्यन जुयाल (१२) व आदित्य शर्माला (१८) आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकविले. त्यामुळे उत्तर प्रदेशची २६.२ षटकांत ४ बाद ५० धावा अशी अवस्था झाली. मात्र त्यानंतर अनुभवी ध्रुव जुरेलने सिद्धार्थ यादव (१९), शिवम शर्मा (१) व शिवम मावीच्या (४७) साथीने संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. शतकाकडे वाटचाल करत असताना ध्रुव जुरेलला हर्ष दुबेने त्याला कदमकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. जुरेलने शिवम मावीसोबत सातव्या गड्यासाठी ९२ धावांची भागीदारी केली. यश कदमच्या गोलंदाजीवर बाद होण्यापूर्वी शिवम मावीने ५७ चेंडूंत ४७ धावांची भर घातली. ध्रुव जुरेलने १२२ चेंडूंत ११ चौकारांसह ९६ धावांची खेळी केली. कार्तिक यादववगळता तळाच्या फळीतील फलंदाज हर्ष दुबेच्या फिरकीसमोर टिकाव धरू शकले नाही व उत्तर रप्रदेशचा डाव २३७ धावांवर आटोपला. कार्तिक यादव १७ धावांवर नाबाद राहिला.

विदर्भाकडून हर्ष दुबेने ६ बळी, प्रफुल्ल हिंगे, नचिकेत भुते व पार्थ रेखडेने प्रत्येकी १ बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)





| ध्रुव जुरेल | धावा | चेंडू | चौकार |
|---|---|---|---|
| | ९६ | १२२ | ११ |

रणजी करंडक क्रिकेट सामन्यात उत्तर प्रदेशविरुद्ध ६ बळी टिपणारा विदर्भाचा हर्ष दुबे

# दिव्या देशमुख नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत पदार्पण करण्यास सज्ज

◆ **स्टावांगर, २९ जानेवारी**

भारतीय ग्रॅण्डमास्टर व विश्वचषक विजेती नागपूरची दिव्या देशमुख या वर्षी नॉर्वे महिला बुद्धिबळ स्पर्धेत पदार्पण करणार आहे. २०२४ मध्ये या स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच ती या महिलांच्या स्पर्धेत खेळणारी सर्वात तरुण खेळाडू ठरणार आहे.

गत वर्षीच्या यशस्वी कामगिरीमुळे जगातील अव्वल खेळाडूंमध्ये आपले स्थान निश्चित करणारी दिव्या देशमुख, २५ मे ते ५ जून दरम्यान होणाऱ्या या प्रतिष्ठित स्पर्धेसाठी ओस्लो येथे पोहोचणार आहे. १९ वर्षीय दिव्याने गत वर्षी बाटुमी येथे महिलांचा विश्वचषक जिंकताना अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले. तिने ग्रॅण्डमास्टर पदवी मिळवली आणि महिलांच्या कॅण्डिडेट्स स्पर्धेतही स्थान मिळवले.

या एलिट स्पर्धेत ती विद्यमान विश्व ब्लिट्झ विजेती कझाकिस्तानच्या बिबिसारा असाऊबायेवा व नॉर्वे चेस वुमेन्स स्पर्धेची गतविजेती युक्रेनची ॲना मुझीचुक यांच्यासह इतर खेळाडूंमध्ये सहभागी होणार आहे.

मी नॉर्वे चेसमध्ये खेळण्यासाठी खूप उत्सुक आहे. मी पहिल्यांदाच या देशात येत आहे आणि नॉर्वे कसा आहे हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक आहे. या अनोख्या फॉरमॅटचा अनुभव घेण्यासाठी आणि अशा प्रतिष्ठित स्पर्धेत खेळण्यासाठी मी आतुर आहे. माझ्यासाठी शुभेच्छा देणाऱ्या सर्व चाहत्यांचे आभार, तुमच्या प्रेमाबद्दल आणि प्रोत्साहनाबद्दल धन्यवाद, आपण तिथे भेटू, असे देशमुख म्हणाली. गत वर्षी ग्रॅण्डमास्टर कोनेरू हम्पी व आर. वैशालीने स्टावांगर येथे झालेल्या स्पर्धेच्या महिला विभागात भाग घेतला होता.

दिव्या देशमुख ही ग्रॅण्डमास्टर पदवी मिळवणारी इतिहासातील चौथी भारतीय महिला ठरली आहे तिचे हे यश जागतिक बुद्धिबळ पटलावर देशाची वाढती ताकद दाखविते.



तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करतानाही यश मिळवले आहे, वैयक्तिक आणि सांघिक दोन्ही सुवर्णपदके जिंकली आहेत व तिच्या पिढीतील सर्वात आश्वासक तरुण खेळाडूंपैकी एक म्हणून तिने आपली ओळख निर्माण केली आहे. भारत सातत्याने उत्कृष्ट तरुण बुद्धिबळपटू निर्माण करत आहे आणि दिव्या हे त्या गतीचे उत्तम उदाहरण आहे, असे नॉर्वे चेसच्या सीओओ बेनेडिक्टे वेस्ट्रे स्कोग म्हणाल्या.खुल्या गटात भारताच्या आर. प्रज्ञानंदने विद्यमान जागतिक रॅपिड आणि ब्लिट्झ विजेता मॅग्नस कार्लसन व जर्मनीचा व्हिन्सेंट केमर यांच्यासोबत आपला सहभाग निश्चित केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### स्क्वॅश ऑन फायरमध्ये सेंथिलकुमार पुढील फेरीत

**वॉशिंग्टन** : विद्यमान पुरुष राष्ट्रीय स्क्वॅश विजेता वेलवन सेंथिलकुमार आणि वीर चोत्रानीने येथे सुरू असलेल्या स्क्वॅश ऑन फायर ओपन स्पर्धेत पीएसए कांस्य-स्तरीय स्पर्धेतील पहिल्या फेरीत संघर्षपूर्ण विजय मिळवून पुढील फेरीत प्रवेश केला आहे. जागतिक क्रमवारीत ४६ व्या क्रमांकावर असलेल्या सेंथिलकुमारने इंग्लंडच्या टॉम वॉल्शचा १२-१४, ११-८, ११-८, ११-६ असा पराभव केला आणि आता तो पुढील फेरीत मेक्सिकोच्या जागतिक क्रमवारीत ११ व्या क्रमांकावर असलेल्या आणि दुसरी मानांकित लिओनेल कार्डिनासशी खेळेल. जागतिक क्रमवारीत ४९ व्या क्रमांकावर असलेल्या चोत्रानीने हंगेरीच्या बालाझ फार्कासचा ६-११, ९-११, ११-५, ११-९, ११-३ असा पराभव केला आणि आता तो पुढील फेरीत फ्रान्सच्या जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेल्या आणि चौथ्या मानांकित बॅप्टिस्ट मासोटीशी खेळेल. दरम्यान, महिला राष्ट्रीय विजेती आणि सातवी मानांकित अनाहत सिंगला पहिल्या फेरीत बाय मिळाला.



### भारतीय हॉकी संघाचे माजी प्रशिक्षक नॉब्स यांचे निधन

**मेलबर्न** : २०१२ च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये भारतीय पुरुष संघाला प्रशिक्षण देणारे ऑस्ट्रेलियाचे माजी हॉकीपटू मायकल नॉब्स यांचे दीर्घ आजारानंतर निधन झाले आहे. ते ७२ वर्षांचे होते आणि त्यांच्या पश्चात पत्नी ली केप्स व मुलगी केटलिन असा परिवार आहे. केप्स या ऑस्ट्रेलियाच्या माजी आंतरराष्ट्रीय महिला खेळाडू आहेत, तर केटलिन सध्याची हॉकीरूज संघाची स्टार खेळाडू आहे. हॉकी ऑस्ट्रेलिया मायकल यांच्या कुटुंबियांना, मित्रांना, माजी सहकाऱ्यांना, खेळाडूंना आणि ज्यांच्या आयुष्यावर व कारकिर्दीवर हॉकीमधील त्यांच्या योगदानाचा प्रभाव पडला, त्या सर्वांप्रती तीव्र शोक व्यक्त करत आहे. त्यांची एक स्वाभिमानी कुकाबुरा, एक आदरणीय व्यावसायिक आणि खेळाचे सेवक म्हणून आठवण ठेवली जाईल, असे हॉकी ऑस्ट्रेलियाने एका निवेदनात म्हटले आहे. १९७९ ते १९८५ दरम्यान त्यांनी ऑस्ट्रेलियासाठी ७६ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आणि एक गोल केला. ते ऑस्ट्रेलियन पुरुष हॉकीच्या सर्वात मजबूत युगांपैकी एकाचे सदस्य होते.

### विश्वविजेत्या भारतीय दिव्यांग महिला क्रिकेट संघाचा गौरव

**नवी दिल्ली** : दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी गुरुवारी मुख्यमंत्री जनसेवा सदन येथे भारतीय दिव्यांग महिला टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा, त्यांच्या प्रशिक्षकांसह आणि ब्लाइंड असोसिएशनच्या प्रतिनिधींसोबत सत्कार केला आणि त्यांच्या ऐतिहासिक कामगिरीचे व धैर्याचे कौतुक केले. कर्नाटकच्या दीपिका टी. सी. हिच्या नेतृत्वाखालील आणि महाराष्ट्राच्या गंगा एस. कदम हिच्या उपकर्णधारपदाखालील भारतीय संघाने संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहून वर्चस्वपूर्ण कामगिरी केली. कोलंबो येथे झालेल्या अंतिम सामन्यात नेपाळवर सात गडी राखून दणदणीत विजय मिळवून भारताने विजेतेपद पटकावले. नेपाळला ५ बाद ११४ धावांवर रोखल्यानंतर, भारतीय फलंदाजांनी केवळ १२.१ षटकांत सहजपणे लक्ष्य गाठले. आपल्या देशाच्या मुली खूप कणखर आहेत, आणि मला पूर्ण विश्वास आहे की तुम्ही जिथे जाल, तिथे लोकांना थक्क करून सोडाल. तुम्ही खूप काही साध्य केले आहे आणि देशाचे नाव उज्वल केले आहे, आणि आम्हाला तुमचा खरोखरच अभिमान आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री गुप्ता यांनी संघाची प्रशंसा केली.

### पीपल्स पंजा कुस्ती महासंघाला पॅरालिम्पिक कमिटीकडून संलग्नता

**मुंबई** : पीपल्स आर्मरेसलिंग (पंजा कुस्ती) फेडरेशन ऑफ इंडियाला पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडियाकडून अधिकृत संलग्नता मिळाली आहे. ही संलग्नता भारतातील पॅरा-आर्मरेसलिंगसाठी एक मोठे पाऊल आहे. या मान्यतेुळे संघटित स्पर्धा, खेळाडूंचा विकास आणि जागतिक पॅरालिम्पिक परिसंस्थे ध्ये दीर्घकालीन समावेशाचा मार्ग अधिक मजबूत होईल. आर्मरेसलिंगने आधीच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण गती प्राप्त केली आहे, कारण त्याचा दुबई येथे झालेल्या २०२५ च्या आशियाई युवा पॅरा गेम्सम ध्ये समावेश करण्यात आला होता. हा अशा काही खेळांपैकी एक आहे, यात पॅरा खेळाडूंचा मुख्य स्पर्धेत समावेश केला जातो. या प्रगतीच्या आधारावर, आता आशियाई पॅरा गेम्स आणि आशियाई क्रीडा स्पर्धा ध्ये या खेळाच्या समावेशाकडे लक्ष देत आहे.

# लातूरच्या रोहन अकादमीविरुद्ध एनजी अकादमीची मजबूत धावसंख्या



अभिजित सरवदे



आनंद शेंडे



ऋग्वेद पाटील

**क्रिकेट मालिका : अभिजित सरवदेचे द्विशतक, आनंद शेंडेचे शतक, ऋग्वेद पाटीलचे पाच बळी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

अभिजित सरवदेचे द्विशतक व आनंद शेंडेच्या शतकाच्या जोरावर एनजी क्रिकेट अकादमीने लातूरच्या रोहन अकादमीविरुद्धच्या सामन्यात पहिल्या डावात ६७५ धावा केल्या आहेत. दुसऱ्या दिवशीचा खेळ संपताना रोहन अकादमीने दुसऱ्या डावात ४ बाद १३१ धावा केल्या आहे.

एनजी क्रिकेट अकादमीने आयोजिलेल्या दोन संघा दरम्यानच्या मालिकेतील तीन दिवसीय सामन्यातील नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या रोहन क्रिकेट ॲकॅडमीचा पहिला डावात ३४ षटकात सर्व बाद १०९ धावांत आटोपला. यात आनंदने चार बळी घेत अष्टपैलू तर ऋग्वेद पाटीलने ५ बळी टिपत त्यांच्या डाव गुंडाळला.

**धावफलक** : रोहन क्रिकेट ॲकॅडमी पहिला डाव : ३४ षटकात सर्व बाद १०९ (नरेश देशमुख ३१, साई १४, ऋग्वेद पाटील ५-१८, आनंद शेंडे ४-१६, अनुज वाल्मिकी १-३३)

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी पहिला डाव : ९४.२ षटकात सर्व बाद ६७५ धावा (अभिजीत सरवदे नाबाद २१६, आनंद शेंडे १३३, आर्या उमाप ८५, कबीर कीर्तीकर ६३, जयवर्धन भोसले नाबाद ५५, श्रवण म्हेत्रे ३२, नरेश देशमुख, श्रीतेज लहाने, कौतिक वाणी, यशवंत शिनगारे प्रत्येकी दोन बळी).

रोहन क्रिकेट ॲकॅडमी दुसरा डाव : दिवस अखेर ३४ षटकात ४ बाद १३१ (अजिंक्य मुळे ३२, वेदांत हाक्के ६५ धावांवर खेळत आहे, सुजल गायकवाड ३-२९, जयवर्धन भोसले १-२०).

# सांगोल्यात संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमीस सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२९ जानेवारी -**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे सन २०२६-२७ हे अमृत महोत्सवी वर्ष आहे. यानिमित्त प्रजासत्ताक दिनी बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अॅकॅडमी अंतर्गत सांगोला तालुका शहर व तालुका बास्केटबॉल असोसिएशन संलग्न संभाजी कदम बास्केटबॉल स्पोर्ट्स अॅकॅडमीचे उद्घाटन भारतीय बास्केटबॉल संघाचे प्रशिक्षक संभाजी कदम यांचे हस्ते करण्यात आले.



यावेळी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्य शीलाकाकी झपके, चंद्रशेखर अंकलगी, संभाजी कदम बास्केटबॉल अॅकॅडमी पुणेचे प्रशिक्षक शरद नागणे, गणेश नागणे, सागर कदम, सांगोला तालुका बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष सुहास होनराव, प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अमोल गायकवाड, सूत्रसंचलन प्रा.धनाजी चव्हाण, सुनील मोरे यांनी केले. सचिव प्रशांत मस्के यांनी आभार मानले.

सुभेदार संभाजी कदम यांनी सांगोल्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य मार्गदर्शन मिळावे आणि कौशल्य प्राप्त व्हावे व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची उत्तुंग कामगिरी व्हावी या उद्देशाने ही अॅकॅडमी स्थापन केल्याचे सांगितले.

# कुमठेचा वेदांत कद्रे वेगवान धावपटूसह दुहेरीचा मानकरी

**सोलापूर जिल्हा बाल मैदानी स्पर्धा**

**पंढरपूरच्या अधिरा धनवडेलाही दुहेरी मुकुट**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

जिल्हा बाल मैदानी स्पर्धेत १० वर्षांखालील गटात पंढरपूरची अधिरा धनवडे व कुमठेचा वेंदात कद्रे यांनी वेगवान धावपटूसह दुहेरी मुकुटाचा मान मिळविला. त्यांनी २०० मीटर धावण्याची शर्यतही जिंकली.

नेहरूनगर शासकीय मैदान येथे सुरू झालेल्या या स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय खेळाडू पूजा राठोड व अधिरा धनवडे या दोन खेळाडूंच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी, उपाध्यक्ष दशरथ गुरव, सुरेश भोसले खुर्द, सब ज्युनिअर स्पर्धा प्रमुख प्रकाश गायकवाड, तक्रार निवारण समिती जीवन इंगळे, सुनील चव्हाण, महाराष्ट्र टेक्निकल कमिटीचे सदस्य चेतन धनवडे, श्रीरंग खांडेकर, दिनेश गावडे, सूर्याजी लिंगडे, रविराज राठोड, प्रा. प्रमोद चुंगे, प्रा.राहुल हजारे, भारती लिंगडे, विक्रम पवार, सरपंच दत्ता मासाळ, शितल शिंदे, दीपक कळसे, पुंडलिक कलखामकर, प्रदिप पाटमस आदी उपस्थित होते.



**सलामीच्या दिवशी झालेले अंतिम निकाल (प्रथम तीन)**

**१० वर्षे : ५० धावणे : मुली** : अधिरा चेतन धनवडे (आर्यंत पब्लिक स्कूल पंढरपूर), प्रियल घुगे (प्रार्थना अकादमी नेहरूनगर), रिया खलावटे (जि. प. प्राथमिक शाळा बोरामणी). **मुले** : वेदांत कद्रे (लिटिल स्टार इंग्लिश मीडियम स्कूल, कुमठे), अहरमली सय्यद (प्रार्थना अकॅडमी), प्रज्वल पांढरे (ज्ञानज्योती मराठी विद्यालय).

**१०० मीटर धावणे : मुली** : अधिरा धनवडे, प्रियल घुगे, नवता विर (लिजंट अकादमी, करमाळा). **मुले** : वेदांत कद्रे, अहरमली सय्यद, नहुश फाटे (सिल्व्हर ओक, आष्टी)

**गोळा फेक** : मुली : आराध्या निखिल धनवडे (अजिंक्य स्पोर्ट्स पंढरपूर), मिताली पवार (सिल्व्हर ओक इंग्लिश स्कूल आष्टी), दुर्वा कदम (ब्राह्मण स्पोर्ट्स कुमठे). **मुले** : रविराज मासाळ (जि प प्राथमिक शाळा वाटंबरे सांगोला), रितेश यलपले, आर्यन राठोड (पायोनियर इंग्लिश स्कूल मंगेवाडी सांगोला). **स्टँडिंग ब्रॉड जम्प : मुली** : प्रिया घुगे, नवता विर, स्वराली बनकर (अभिमान गुरुकुल अजनाळे सांगोला). **मुले** : महूष फाटे (सिल्व्हर ओक आष्टी). अरहम अली सय्यद, वेदांत कदरे (ब्रम्हा स्पोर्ट्स).

# पुरुष गटात मध्य रेल्वे, महिला गटात पश्चिम रेल्वेला विजेतेपद

**विद्यार्थी क्रीडा केंद्राची ६२ वी खो-खो स्पर्धा**

**वेळापूरचा रामजी कश्यप अष्टपैलू खेळाडू**

**मुंबई, दि. २९ जानेवारी-**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने परळच्या ऐतिहासिक लाल मैदानावर झालेल्या विद्यार्थी क्रीडा केंद्राच्या ६२ व्या मुंबई व्यावसायिक जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत पुरुष व्यावसायिक गटात मध्य रेल्वे, महिला व्यावसायिक गटात पश्चिम रेल्वे, तर ४ फूट ११ इंच प्रायोगिक गटात यजमान विद्यार्थी क्रीडा केंद्राने अजिंक्यपदावर मोहोर उमटवली.

**पुरुष : मध्य रेल्वेचा अंगावर शहारा आणणारा विजय**

पुरुषांच्या अंतिम सामन्यात मध्य रेल्वेने आपला पारंपरिक प्रतिस्पर्धी पश्चिम रेल्वेचा २.४० मिनिटे राखून १३१२ असा १ गुणाने पराभव करत अजिंक्यपद पटकावले. मध्य रेल्वेने नाणेफेक जिंकून प्रथम संरक्षण स्वीकारले होते. या थरारक सामन्यावर देवेंद्र बर्डे यांनी पंचप्रमुख म्हणून काम पाहिले. मध्य रेल्वेच्या विजयात रामजी कश्यप (२.२०, नाबाद २ मि. संरक्षण व २ गुण), दिलीप खांडवी (१.१०, २ मि. संरक्षण व १ गुण), मिलिंद चावरेकर (१.२०, १.४० मि. संरक्षण व १ गुण), विजय हजारे (१.१०, १.४० मि. संरक्षण) अर्णव पाटणकर (१.४० मि. संरक्षण व २ गुण) यांनी निर्णायक योगदान दिले. पराभूत पश्चिम रेल्वेकडून महेश शिंदे (२.२०, २.१० मि. संरक्षण व २ गुण), ऋषभ वाघ (१.२०, १.५० मि. संरक्षण), निखील सोडये, राहुल मंडल, मझहर जमादार (प्रत्येकी ३ गुण) यांनी दिलेली झुंज अखेर अपुरी ठरली.

**महिला : पश्चिम रेल्वेचा 'राजेशाही' विजय**

महिलांच्या अंतिम सामन्यात पश्चिम रेल्वेने आक्रमक खेळाचे दमदार प्रदर्शन करत रचना नोटरी वर्क्सचा ६४ असा एक डाव राखून २ गुणांनी दणदणीत धुव्वा उडविला. . पश्चिम रेल्वेने नाणेफेक जिंकून संरक्षण स्वीकारले. या सामन्याचे प्रमुख पंच कांती सरवैया होते. विजेत्या पश्चिम रेल्वेकडून संध्या सुरवसे (५ व नाबाद ३ मि. संरक्षण व १ गुण), अर्चना मांजी (४ मि. संरक्षण व २ गुण), तेजस्विनी के. आर. (नाबाद २ मि. संरक्षण), दिव्या गायकवाड, किशोरी मोकाशी (प्रत्येकी २ मि. संरक्षण), कल्याणी कंक व सुहानी धोत्रे (प्रत्येकी २ गुण) यांनी शानदार खेळ केला. तर पराभूत रचना नोटरी वर्क्सकडून साक्षी वाफ ेलकर (१ मि. संरक्षण व ४ गुण), गीतांजली नरसाळे (२.२० मि. संरक्षण), साक्षी तोरणे (१.३० मि. संरक्षण), काजल शेख (१.४० मि. संरक्षण) यांचा लढाऊ खेळ मोठ्या पराभवापासून संघाला वाचवू शकला नाही.




**४ फूट ११ इंच गटात विद्यार्थी क्रीडा केंद्राचा विजयी डंका**

४ फूट ११ इंच मुलांच्या प्रायोगिक निमंत्रित अंतिम सामन्यात विद्यार्थी क्रीडा केंद्राने ओम साईश्वर सेवा मंडळावर ५५ (पूर्वार्ध २२, उत्तरार्ध ११, जादा डाव २२) अशी बरोबरी झाल्यानंतर लघुत्तम आक्रमणात ४.४९ मिनिटे राखून थरारक विजय मिळवला. विद्यार्थी क्रीडा केंद्राने नाणेफेक जिंकून संरक्षण निवडले होते. या सामन्याचे प्रमुख पंच अनिल गुरव होते. विद्यार्थी क्रीडा केंद्राकडून विघ्नेश जाधव (२.१०, २.५०, ५.०७५ मि. संरक्षण व २ गुण), ओमकार जाधव (नाबाद १, नाबाद ७, नाबाद १.३० मि. संरक्षण व १ गुण), कार्तिक चोडणकर (३.५०, २.४० मि. संरक्षण) यांनी विजयात सिंहाचा वाटा उचलला. तर पराभूत ओम साईश्वरकडून सार्थक गामी (३.३०, ४.५० मि. संरक्षण), आरव साटम (३, ५.१०, १.५० मि. संरक्षण), श्लोक जाधव (३ गुण) यांनी शेवटपर्यंत झुंज दिली.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ विद्यार्थी क्रीडा केंद्राचे अध्यक्ष गजानन वाईरकर, कार्याध्यक्ष बाळ नाईक, सचिव पराग आंबेकर, मुंबई खो-खो संघटनेचे अध्यक्ष ॲड. अरुण देशमुख, प्रमुख कार्यवाह सुरेंद्र विश्वकर्मा व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सहसचिव बाळासाहेब तोरसकर यांच्या हस्ते पार पडला.

**स्पर्धेतील वैयक्तिक सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्कार**

**पुरुष** : संरक्षक महेश शिंदे (पश्चिम रेल्वे), आक्रमक अर्णव पाटणकर (मध्य रेल्वे), अष्टपैलू रामजी कश्यप (मध्य रेल्वे)

**महिला** : संरक्षक अर्चना मांजी (पश्चिम रेल्वे), आक्रमक साक्षी वाफ ेलकर (रचना), अष्टपैलू संध्या सुरवसे (पश्चिम रेल्वे)

**४ फूट ११ इंच गट** : संरक्षक विघ्नेश जाधव (विद्यार्थी), आक्रमक श्लोक जाधव (ओम साईश्वर),अष्टपैलू कार्तिक चांदोरकर (विद्यार्थी)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष

## २३ फेब्रुवारीपासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत राज्यभर कार्यरत असलेल्या कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत मनरेगा राज्य संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. येत्या दहा दिवसांत मागण्या मंजूर न झाल्यास २३ फेब्रुवारी पासून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा निर्णय संघटनेने घेतला आहे.मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.



दरम्यान, मनरेगा योजनेअंतर्गत राज्य समन्वयक, जिल्हा समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, क्लार्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर, शिपाई आदी विविध पदांवर मंत्रालय, आयुक्तालय, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील व पंचायत समिती स्तरावर हजारो कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रामीण दुर्बल घटकांचा सर्वांगीण विकास आणि प्रत्येक कुटुंबाला रोजगाराची हमी देण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य हे कर्मचारी करत असून, त्यांच्या योगदानामुळेच महाराष्ट्र राज्य मनरेगा अंमलबजावणीत देशात अग्रस्थानी असल्याचा दावा संघटनेने केला आहे. तथापि, सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समायोजन व संरक्षण देण्याबाबत शासनाने निर्णय घेतले असताना, मनरेगा कर्मचाऱ्यांबाबत मात्र अद्याप कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही, ही बाब अन्यायकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. याशिवाय, रोहयो विभागामार्फत खासगी कंपन्यांमार्फत मनुष्यबळ पुरवठा करून कंत्राटी कर्मचाऱ्यांची अप्रत्यक्ष पिळवणूक होत असून, त्यांच्या सेवासुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. विशेषतः इन्फोटेक या कंपनीमार्फत होत असलेली भरती प्रक्रिया बेकायदेशीर असल्याचा आरोप करत ती तात्काळ थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष प्रसन्न जाधव, राज्य उपाध्यक्ष राहुल शंतनु गायकवाड,जिल्हाध्यक्ष प्रशांत ढगे, जिल्हाध्यक्ष संतोष सोनवले, विशाल कुंभार, रणजीत सुरवसे ,अमर हरकरे, श्रीकांत शिंगाडे, सिद्धराम जमखंडी, अप्पासाहेब प्रचंडे आदींची उपस्थिती होती.

### संघटनेच्या प्रमुख मागण्या

मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करणे, समान काम समान वेतन लागू करणे तसेच मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा व आकृतीबंध तयार करणे

## महत्वाचे...



### हलव्याचे दागिने स्पर्धेत कोमल सोनवणे प्रथम; श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानतर्फे आयोजन

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त संस्थेच्या वतीने महिलांसाठी हलव्याचे दागिने स्पर्धा आयोजित करण्यात आला होता. हा आठवा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. समाजकल्याण केंद्रात आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मेडिकल कॉलेज सब पोस्ट ऑफिसच्या पोस्टमास्टर योगिता क्षिरसागर, शहा व कुलकर्णी डेव्हलपर्सच्या संचालिका अमृता कुलकर्णी, किर्ती इंडस्ट्रीजच्या मॅनेजिंग डायरेक्टर आरती बेत, ॲड. सुनिता नरोटे, संस्थेचे अध्यक्ष महेश कासट उपस्थित होते. स्पर्धेत २१ ते ६५ वयोगटातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कामिनी गांधी इन्स्टिटयूट ऑफ फॅशन डिझायनरच्या कामिनी गांधी यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. अध्यक्षीय मनोगत पोस्टमास्टर योगिता क्षिरसागर यांनी व्यक्त केले. संस्थापक महेश कासट यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राहुल बिराजदार यांनी केले तर आभार अक्षता कासट यांनी मानले.

**स्पर्धेतील बक्षिसाचे मानकरी (प्रथम तीन व उत्तेजणार्थ)**

कोमल सोनवणे (पैठणी), प्रियंका जाधव (डिनर सेट), अमृता भोसले (कुकर), उत्तेजनार्थ : पुजा आंडगे (बांगडी).



### शिवतेज शिवजन्मोत्सव युवक मंडळाच्या अध्यक्षपदी विश्वजित शिंदे

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

संस्थापक अजित शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नवीपेठ येथे झालेल्या मीटिंग मध्ये हा निर्णय घेण्यात आला १६ ते १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सोहळ्यात वृक्षारोपण, प्रसाद वाटप, महिलांच्या हस्ते पुजन, शिवचरित्र व्याख्यान असे विविध कार्यक्रम करण्यात येणार आहे असे अजित भाऊ शिंदे यांनी सांगितले यावेळी नूतन अध्यक्ष विश्वजित शिंदे यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सुजित शिंदे, निलेश ताकभाते, राजू खुर्द, सुनील भोसले, मिथुन कामत, नितीन शिंदे, निलेश बलरामनवर, वासुदेव कुलकर्णी, अभिजित फताटे, रोहित शिंदे, आबा ताकभाते, लक्ष्मीकांत दरक, श्रीपाद येरमालकर, राजू ताकभाते, गणेश परदेशी, प्रशांत ताकभाते, सागर सोनकांबळे, आकाश ताटवे, नागेश शटगार, अशोक मेंगजी, संजय जावळकोटी, विकी भुमकर, सुरेंद्र चिल्लळ, उपस्थित होते यावेळी वासुदेव कुलकर्णी यांनी आभार मानले.



### जय महाराष्ट्र तरुण मंडळ शिवजन्मोत्सव उत्सव अध्यक्षपदी अर्जुन घाडगे

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

जय महाराष्ट्र तरुण मंडळ शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ च्या उत्सव अध्यक्ष पदी अर्जुन घाडगे यांची निवड करण्यात आली. सालाबादप्रमाणे यावर्षी नुतन पदाधिकारी निवड व यंदाही उत्साही व जल्लोषपुर्ण वातावरणात करण्यात आली. मंडळाचे आधारस्तंभ दिलिप कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली मिटिंग पार पडली. अन्य पदाधिकारी असे : उपाध्यक्ष- अरबाज शेख, कार्याध्यक्ष- पार्थ कोल्हे, प्रसिद्धी प्रमुख- राहुल काटे, रवि व्हनमोरे, कुणाल बाईंग, खजिनदार-करण निकम, उपखजिनदार- गिरिष मडिवाळ, सचिव- आकाश जाधव, उपसचिव-रोहित बळवंत, गुरुप्रसाद हिरेमठ, लेझीमप्रमुख- रणजित कोल्हे, चंद्रकांत गायकवाड, रणविर कोल्हे, सल्लागार समिती- अमित जेटिथोर, जावेद शेख, युवराज घाडगे, गुलाब शेख, मिरवणुक प्रमुख-रवि कोल्हे, राजु पवार, सुभाष कदम, कादर जमादार

# ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत २६ अत्याधुनिक शिलाई मशीन वाटप

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

मुळेगाव व मोहळकर तांडा ता. दक्षिण सोलापूर येथील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे करिता त्यांना शिलाईचा व्यवसाय ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत सुरू करून देण्यात आला. महिलांना शिलाई केंद्रासाठी आणखी शिलाई मशीनची आवश्यकता असल्याने तेथील महिलांनी पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांचेकडे शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे यांना शिलाई मशीन उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या हस्ते दि. २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी मुळेगाव तांडा व मोहळकर तांडा येथील शिलाई केंद्रांना २६ अत्याधुनिक शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.



ग्रामीण जिल्ह्यात चौकशी अवैध गावठी हातभट्टी दारू गाळणाऱ्या इसम व त्यांना मदत करणाऱ्या महिलांना अवैध गावठी दारूच्या व्यवसायापासून परावृत्त करून त्यांचे करिता स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना इतर व्यवसाय सुरू करण्याकरिता उपाय योजना राबवून चौकशी अवैध हातभट्टी दारू व्यवसायाकडे आकर्षित होऊ नये या करिता अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर ग्रामीण पोलीस दल प्रयत्न करीत आहेत. यावेळी प्रीतम यादवकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, संकेत देवळेकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सोलापूर ग्रामीण उपविभाग सोलापूर, राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका पोलीस ठाणे, सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम व बोरामणी दुरक्षेत्र कडील पोलीस अमलदार उपस्थित होते.

शिलाई मशीन उपलब्ध करून देणे करिता संजय जगताप, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण, राहुल देशपांडे, पोलीस निरीक्षक, सोलापूर तालुका पोलीस ठाणे व सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम यांनी प्रयत्न केले आहेत.

# अनाथ मुला-मुलींना दाखविली गड्डा यात्रा

## आस्था रोटी बँकेचा स्तुत्य उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांच्या यात्रेच्या निमित्ताने शहर आनंदात न्हाऊन निघाले असताना, त्या झगमगाटापासून दूर काही चेहरे मात्र शांतपणे दुःखाशी झुंज देत होते. आई-वडिलांच्या मायेपासून वंचित राहिलेली अनाथ मुले-मुली आणि आयुष्याच्या संध्याकाळी एकटेपणाने वेढलेले वृद्ध. या मूक वेदनांना शब्द देण्यासाठी आणि त्यांना आनंदाचा स्पर्श देण्यासाठी आस्था रोटी बँकच्या वतीने एक अत्यंत भावस्पर्शी, हळवा व माणुसकीचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला.



या मुला मुलींनी कधीही सिद्धारामेश्वरांचे गड्डा यात्रा बघितलेले नव्हते प्रथम त्यांना गड्डा यात्रेचे जत्रा पाहून खूप भावनिक झालेले होते मुलं मुली, आई-वडिलांचे हात ज्यांनी कधी घट्ट धरले नाहीत, अशा या अनाथ मुलांसाठी जत्रा म्हणजे स्वप्नांच्या पलीकडची गोष्ट होती. एका दिवसाच्या आनंदाने अनेक दिवसांचे दुःख हलके झाले आणि जत्रेच्या गर्दीतही माणुसकी अजून जिवंत आहे, याचा पुन्हा एकदा हृदयस्पर्शी प्रत्यय आला.

रंगीबेरंगी फुगे केवळ खेळणी नव्हती, तर त्यांच्या अपूर्ण स्वप्नांची उडणारी आशा होती. उंच पाळण्यात झुलताना ही मुले जणू आयुष्यालाच सांगत होती- आज तरी आम्ही एकटे नाही. त्या एका दिवसाने त्यांच्या अनेक दिवसांच्या शांत वेदनांना हळुवारपणे कवेत घेतले. वृद्धाश्रमातील आजी-आजोबांसाठीही हा अनुभव तितकाच भावूक करणारा ठरला. पाळण्याचा झोका लागताच त्यांच्या डोळ्यांत दाटून आलेले अश्रू वेदनेचे नव्हे, तर आयुष्याच्या जुन्या, गोड आठवणींना उजाळा देणारे होते. आम्ही विसरले गेलो नाही, ही भावना शब्दांत न उमटता त्यांच्या ओलसर डोळ्यांतून व्यक्त होत होती. आस्था फाऊंडेशनचे सर्वेसर्वा विजय छंचुरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. यावेळी पुष्कर पुकाळे, स्नेहा वनकुद्रे, विद्या सिंघम, मंगल पांढरे, विनोद भोसले, स्नेहा मेहता, प्रकाश डोंगरे, सौजन्य आले, राठोड सर आदींनी प्रेमाने व आपुलकीने सहभाग घेत हा आनंद द्विगुणित केला.



# सारोळेत 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' हा अभिनव उपक्रम

## एकता महिला मंचचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**

**वैराग, दि.२९ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील सारोळे येथे एकता महिला मंचच्या वतीने मकरसंक्रांतीचे औचित्य साधून 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' हा अभिनव उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

समाजात आजही विधवा महिलांना मंगल कार्यांपासून दूर ठेवण्याच्या अनिष्ट प्रथा अस्तित्वात असताना, बार्शी तालुक्यातील सारोळे येथे 'एकता महिला मंच' ने या जुनाट परंपरांना छेद देणारा एक क्रांतीकारी निर्णय घेतला. मकरसंक्रांतीचे औचित्य साधून 'मी विधवा नव्हे, मी स्त्री' या अभिनव उपक्रमांतर्गत सुवासनी आणि विधवा भगिनींचा एकत्रित हळदी-कुंकू सोहळा उत्साहात आणि मांगल्याच्या वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी माजी सरपंच अमरजा गाटे, सरपंच सुवर्णा काकडे, एकता महिला मंच प्रमुख प्रभाकर क्षीरसागर, एकता महिला मंच भांडेगाव प्रमुख स्वाती शिंदे, प्रभावती साबळे, पूजा भोसले, गीता पाटील, स्वाती चौधरी, आणि यांची प्रमुख उपस्थिती होती.

**स्पर्धेतील प्रथम तीन**

**उखाणे स्पर्धा :** दमयंती कुलकर्णी, कविता पाटील, शालन चौधरी.

**संगीत खुर्ची :** भाग्यश्री गाटे, प्रिया गाटे, सुजाता गाटे

# मंत्री गोगावले यांच्या हस्ते हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिका अनावरण सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

हिंदवी स्वराज्याच्या राजधानी, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन चरणस्पर्शाने पवित्र झालेल्या दुर्गदुर्गेश्वर रायगड येथे श्री शंभुराजाभिषेक सोहळ्याच्या पवित्र व ऐतिहासिक निमित्ताने हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिकाचे भव्य व अर्थपूर्ण अनावरण मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले.



स्वराज्याच्या विचारधारेचा उगम ज्या रायगडावर झाला, त्याच दुर्गदुर्गेश्वर रायगडावर हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिकेचे अनावरण होणे हे विशेष ऐतिहासिक व वैचारिक महत्त्वाचे मानले जात आहे. छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्वराज्यविचारांपासून प्रेरणा घेऊन हिंदवी स्वराज्य तिथीदर्शिका ही संकल्पना मारुती सुरवसे यांनी मांडली असून, ही तिथीदर्शिका केवळ दिनदर्शिका नसून हिंदवी स्वराज्याच्या कालगणनेचा, मराठी अस्मितेचा व भारतीय संस्कृतीचा वैचारिक घोष आहे. पाश्चिमात्य ग्रेगोरियन कालगणनेच्या प्रभावातून समाजाला बाहेर काढत, शालिवाहन शकानुसार भारतीय तिथी पद्धतीचे महत्त्व अधोरेखित करण्याचा हा एक सशक्त प्रयत्न आहे. या तिथीदर्शिकेत शालिवाहन शकावर आधारित मराठी कालगणना, हिंदू सण-उत्सव तसेच हिंदवी स्वराज्यातील महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांचा सविस्तर व अभ्यासपूर्ण समावेश करण्यात आला आहे. स्वराज्याच्या प्रशासन, धर्मनीती, समाजरचना व सांस्कृतिक परंपरांचे प्रतिबिंब या तिथीदर्शिकेत ठळकपणे दिसून येते.

श्री शंभुराजाभिषेक सोहळ्याच्या दिवशीच या तिथीदर्शिकेचे अनावरण होणे हे छत्रपती संभाजी महाराजांच्या तेजस्वी, त्यागमय व स्वराज्यनिष्ठ जीवनकार्याला समर्पित केलेले वैचारिक व सांस्कृतिक अभिवादन मानले जात आहे. हिंदवी स्वराज्याचा इतिहास, त्यामागील तत्वज्ञान व कालगणना समाजाच्या दैनंदिन जीवनाशी पुन्हा जोडण्याचा हा उपक्रम भविष्यात मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी श्री शंभुराजाभिषेक समितिचे अध्यक्ष सिध्देश मोरे, शिवसेवक प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष मारुती सुरवसे, उपाध्यक्ष अशोक झाडे, सुधीर थोरात तसेच हजारों शिवभक्त उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### अंबाजी क्यातम



**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

जुन्या पिढीतील सूत व्यावसायिक अंबाजी सिद्रामप्पा क्यातम यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी ते ९२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली ज्ञाती संस्थेच्या शांतीधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम यांचे ते वडील होत.

### डॉ. गिरीश चंडक



**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

जुन्या पिढीतील इ.एन.टी. स्पेशालिस्ट डॉ. गिरीश लोणकरण चंडक (वय ८६) यांचे अल्पशा आजाराने गुरुवार दिनांक २९ जानेवारी रोजी दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात २ पुत्र, २ मुली , सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंतयात्रा शुक्रवार ३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता चंडक बगीचा, बाळीवेस येथून निघेल.

# 'देवदूत' कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी कुसगाव येथे भारतीय मजदूर संघाचा संघर्ष

## सकारात्मक निर्णय न झाल्यास सोमवार २ फेब्रुवारीपासूनपासून बेमुदत आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**

**कुसगाव (पुणे ), दि. २९ जानेवारी**

पुणे मुंबई राष्ट्रीय महामार्गावर अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करून अनेकांचे प्राण वाचविणाऱ्या 'देवदूत' कामगारांच्या न्याय्य मागण्यांकडे आयर्न पंप कंपनी प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ २६ जानेवारी २०२६ कुसगाव येथे भारतीय मजदूर संघाच्या माध्यमातून तीव्र आंदोलन करण्यात आले.




या कामगारांकडून अत्यंत धोकादायक व जबाबदारीचे काम करून घेतले जात असतानाही त्यांना योग्य वेतन, सामाजिक सुरक्षा, विमा संरक्षण, सुरक्षितता साधने, कामाचे निश्चित तास व कायदेशीर हक्क मिळत नाहीत. या अन्यायकारक परिस्थितीविरोधात भारतीय मजदूर संघाने रस्त्यावर उतरून प्रशासनाचे लक्ष वेधले.

या आंदोलनाचे नेतृत्व भारतीय मजदूर संघ संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, उपाध्यक्ष सचिन मेंगाळे, महाराष्ट्र अखिल भारतीय ठेका मजदूर महासंघ सचिव सागर पवार, पुणे जिल्हा उमेश विश्वाद बाळासाहेब पाटील यांनी केले.

यावेळी उपस्थित नेत्यांनी स्पष्ट इशारा दिला की, देवदूत कामगारांच्या प्रश्नांवर तात्काळ ठोस निर्णय न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढवण्यात येईल व ही लढाई राज्य स्तरावर नेली जाईल. भारतीय मजदूर संघाने कंपनी व्यवस्थापन व संबंधित यंत्रणांना आवाहन केले आहे की, देवदूत कामगारांना वेतनवाढ, प्रलंबित प्रश्नांबाबत, ई सर्व कायदेशीर लाभ व सामाजिक सुरक्षा तात्काळ लागू करावी अशी ठाम मागणी करण्यात आली.

या बाबतीत त्रिपक्षीय बैठक संपन्न होवून देशदुत मधील कामगारांना सन्मानजनक वेतनवाढ बाबतीत वरिष्ठ पातळीवर चर्चे करुन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. कामगार च्या पत्नी व मुलांकरिता सध्या कार्यरत ३ लाख मेडिक्लेम मधे समाविष्ट करण्यात येईल. सर्व कामगारांना करिता अपघाती मृत्यु विमा योजनेंतर्गत २० लाख रु चा लाभ देण्यात येणार आहेत. मागील काळातील प्रलंबितच ओव्हरटाईम वेतन लवकरच कामगारांना देण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर लेखी स्वरूपात समझोता झाला आहे . त्या मुळे आंदोलन शनिवार ३१ जानेवारी २०२६ पर्यंत स्थगित करण्यात आले असून या बाबत आर्यन पंप कंपनी ने सकारात्मक निर्णय न झाल्यास सोमवार २ फेब्रुवारीपासून पासून बेमुदत आंदोलन करण्या बाबतीत इशारा बाळासाहेब भुजबळ संघटन सचिव भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश व सचिन मेंगाळे उपाध्यक्ष भारतीय मजदूर संघ व सागर पवार यांनी दिला आहे.

# ७४ नाल्यांच्या पर्जन्यजल नियंत्रण आराखड्यास मंजुरी

## पावसाळी समस्येवर शाश्वत, ऐतिहासिक पाऊल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

पावसाळ्यात सखल भागांमध्ये पाणी साचून नागरिकांना होणाऱ्या त्रासावर आता कायमस्वरूपी उपाययोजना होणार आहेत. सोलापूर महानगरपालिकेने शहरातील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर ठोस तोडगा काढण्यासाठी ७४ नाल्यांचा पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला. महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी त्यास सक्षम मंजुरी दिली आहे.



सन २०१८, २०२० आणि २०२५ मध्ये शहरातील अनेक भागांमध्ये गंभीर जलसंचय निर्माण झाला होता. पावसाचा योग्य निचरा न होणे, नैसर्गिक प्रवाहात अडथळे व नाल्यांवरील अतिक्रमण ही यामागील प्रमुख कारणे होती. यावरुन महानगरपालिकेने सखोल अभ्यास करून हा व्यापक आराखडा तयार केला आहे. ड्रोन सर्व्हेक्षण, सॅटेलाईट इमेज, टोपोशीट व टोटल स्टेशन सर्व्हेच्या आधारे शहरातील १७८ चौ.कि.मी. क्षेत्रात ७४ नाले निश्चित करण्यात आले असून, त्यांची ६ बेसिनमध्ये विभागणी करण्यात आली आहे.

नाल्यांची एकूण लांबी सुमारे ११५.७७ कि.मी. इतकी आहे. आराखड्यानुसार नाल्यांची सफाई, गाळ काढणे, अतिक्रमणे हटवणे, नाल्यांची रुंदी व खोली वाढवणे, भूमिगत नाले, बॉक्स कल्व्हर्ट व क्रॉस ड्रेनेजची कामे करण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३० नाल्यांवर प्रत्यक्ष काम सुरू करण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर हा संपूर्ण आराखडा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आला असून, सोलापूर शहराच्या पावसाळी सम स्येवर हे शाश्वत आणि ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे.

### बेसिननिहाय वर्गीकरण याप्रमाणे

| अ.क्र. | बेसिन | समाविष्ट नाले एकूण लांबी (कि.मी.) |
|---|---|---|
| १ | बेसिन क्र. १ | सुनील नगर ते दहिटणे १० (१३.०२) |
| २ | बेसिन क्र. २ | रेल्वे नाला ३२ (५२.२७ |
| ३ | बेसिन क्र. ३ | आदिला नदी ०५ (१६.८९) |
| ४ | बेसिन क्र. ४ | विजापूर रोड ते सोरेगाव तलाव ०४ (९.२२) |
| ५ | बेसिन क्र. ५ | होटगी रोड ते मजरेवाडी ०९ (१२.५४) |
| ६ | बेसिन क्र. ६ | आकाशवाणी केंद्र, नवले नगर ते देसाई सांडपाणी प्रक्रिया केंद्र १४ (११.८३) |
| एकूण | ७४ | ११५.७७ कि.मी. |

### असा आहे आराखडा

| | |
|---|---|
| एकूण नाले | ७४ |
| बेसिन | ६ |
| नाल्यांची लांबी | ११५.७७ कि.मी. |
| पहिला टप्पा | ३० नाले |
| मंजुरी :आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत | |

### माहिती वेबसाईटवर उपलब्ध

सोलापूर शहर आपत्ती व्यवस्थापन आराखडा, पर्जन्यजल नियंत्रण आराखडा, नालानिहाय सर्व्हेक्षण अहवाल व समिती बैठकींचे इतिवृत्तांत सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सोलापूर शहरातील पावसाळी पाणी साचण्याच्या समस्येवर शाश्वत व कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे महानगरपालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

### आपत्ती व्यवस्थापन अधिनियमानुसार मंजुरी

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २६ व कलम ३० अंतर्गत प्राप्त अधिकारास अनुसरुन, केंद्रशासनाचे विधी व न्याय मंत्रालय यांचेकडील आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील दुरुस्तीमधील कलम ४१ नुसार शहर प्राधिकरण स्थापित करुन आयुक्त यांना शहर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष म्हणून अधिकार प्राप्त झाले आहे. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या आढावा बैठकीत ७४ नाल्यांचा पर्जन्यजल नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन आराखडा, तांत्रिक अहवाल तसेच तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजनांना सक्षम मंजुरी देण्यात आली आहे.

## महत्वाचे...



### थोर स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव यांना जयंतीनिमित्त अभिवादन

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

मॅकेनिक चौकात उभा असलेला तुळशीदास दादा जाधव यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि बाळे येथील महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आझाद हिंद चौकात ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी, स्वर्गीय. तुळशीदासदादा जाधव १२२व्या जयंतीनिमित्त दादांच्या पूजाकृती पुतळ्यास पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आझाद हिंद चौकात आयोजित स्वातंत्र्य सैनिक तुळशीदास जाधव यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेत बोलत होते. यावेळी ॲड. बिपिन ठोकळ, जयवंत जाधव, वैशाली जाधव, अरुणा चव्हाण, प्रमिला मेमाणे, अमृत जाधव, नीलम पाटोळे, रवी पाटोळे, महाराष्ट्र शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, कोषाध्यक्ष नितीन मेमाणे, संचालक दत्तात्रय गाजरे, मुख्याध्यापक मोहनराव घोडके, उदय जाधव, चंद्रकांत कुंटेलू, राष्ट्रविकास शिक्षण संस्था, इंदिरा ज्ञानवर्धिनी, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाच्यासर्व शाखांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, स्वातंत्र्यसैनिक आदी उपस्थित होते.




### लक्ष्मी ऑटोमोबाईल्सला तीन पारितोषिके

**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

सोलापूरच्या लक्ष्मी ऑटोमोबाईल्सने 'माय स्कोअर सिस्टीम' अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करत ३ मोठी पारितोषिके पटकावली आहेत. सेल्स विभाग व सर्व्हिस विभागाने प्रथम तर सर्वाधिक स्पेअर पार्ट्स वापराचेही द्वितीय पारितोषिक पटकाविले. हे यश टीमची मेहनत आणि ग्राहकांनी दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे सांगत लक्ष्मी ऑटोमोबाईल्सचे दिपक पाटील यांनी आपल्या टीमचे कौतुक केले आहे.

### हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आज दोन मिनिटे मौन पाळण्याचे आवाहन


**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी शुक्रवार, दि.३० जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता दोन मिनिटे मौन पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात यावी, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सुनील सोनटक्के यांनी केले. दरवर्षी ३० जानेवारी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. यादिवशी हुतात्म्यांच्या आदरादाखल देशभरात मौन पाळण्यात येते. त्याअनुषंगाने शुक्रवारी सकाळी १०.५९ वाजता भोंगा वाजविण्यात येणार आहे. सकाळी ११.०३ वाजता भोंगा बंद करण्यात येणार आहे. याकाळात नागरिकांनी आपापल्या ठिकाणी उभे राहून मौन पाळावेत, असेही त्यांनी सांगितले.

## खून खटल्यात एकास जन्मठेप; तिघांची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

मड्डी वस्ती येथील खून खटल्यातील तिघांची निर्दोष मुक्तता करण्यात आली असून एकास जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. नाम देव गजानन चौगुले वय ४२ रा. तळेहिप्परगा, सोलापूर याचा खून केल्याप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.जे. कटारिया यांनी अजय आडप्पा भांडेकर (वय ३०), विजय आडप्पा भांडेकर (वय २७ दोघे रा. तळेहिप्परगा सोलापूर), बाबुराव गुंडपा लिंबोळे (वय ४४ रा. मड्डी वस्ती सोलापूर) या तिघांची निर्दोष मुक्तता केले तर शंकर गुंडप्पा लिम्बोळे वय ४३ रा. मड्डीवस्ती, सोलापूर यास जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.



यात हकीकत अशी की, यातील मयत नामदेव चौगुले याने आरोपी शंकर लिंबोळे यांच्या पत्नीची छेडछाड केली होती. त्यावरून आरोपी शंकर यांच्या पत्नीने मयताविरुद्ध तक्रार दिली होती. दिनांक ७/९/२०२१ रोजी रात्री १० सुमारास आरोपी शंकर याची पत्नी घरी झोपली असता रात्री साडेदहाच्या सुमारास त्याच्या घराच्या दरवाज्यावर कोणीतरी लाथा मारू लागला म्हणून आरोपी शंकर याने दरवाजा उघडला असता, त्यावेळेस मयत नामदेव चौगुले हा होता व तो त्यास म्हणत होता की, 'तुझ्या पत्नीने दिलेली तक्रार मागे घे' म्हणून शिवीगाळ करत होता, त्यावेळी आरोपी बाबुराव लिंबोळी यांनी मिरचीची पूड मयताच्या अंगावर टाकली, त्यामुळे शंकर हा घरातून कुऱ्हाड घेऊन आला व मयत पळून जात असताना नामदेव याने कुऱ्हाडीने त्याच्या पायावर वार करून इतर आरोपींनी लाकडी काठी व पाईपने मारहाण करून नामदेव यांस जीवे ठार मारले, त्यास ठार मारून शंकर हा स्वतःहून कुऱ्हाडीसह पोलिस ठाण्यात हजर झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब भालचिम यांनी फिर्याद दिली होती. सदर गुन्ह्याचा तपास करून पोलिसांनी आरोपीविरुद्ध दोषारोप पत्रक दाखल केले होते.

या खटल्यात सरकारतर्फे एकूण २९ साक्षीदार तपासण्यात आले. ॲड.मिलिंद थोबडे यांनी आपली युक्तिवादात, खटला हा परिस्थितीजन्य पुराव्यावर अवलंबून असून खटल्यात सरकार पक्षातर्फे ठोस असा पुरावा आला नसल्याचा युक्तिवाद मांडला, त्यावरून न्यायाधीशांनी तीन आरोपींची निर्दोष मुक्तता केली मात्र एकास जन्मठेपेची शिक्षा सुनावली. यात आरोपींतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे ॲड. प्रकाश जन्नू यांनी काम पाहिले.

## हातभट्टी अड्ड्यावर कारवाई; ५० लाखांचा मुद्देमाल जप्त

### शहर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ जानेवारी-**

शहर व जिल्ह्यात अवैध हातभट्टी निर्मिती केंद्रांवर, अवैध देशी-विदेशी मद्य विक्री, अवैध हातभट्टी निर्मिती, विक्री व वाहतुकीवर दी. १६ ते २८ जानेवारी २०२६ मध्ये केलेल्या धडक कारवाईत एकुण ८३ गुन्हे नोंद करण्यात आली असुन ८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत २४,०७५ लि. रसायन, १६२६ ब.लि. हातभट्टी दारु, ३९३ ब. लि. देशी मद्य, १८९ ब.लि. बनावट देशी मद्य, ३६८ ब.लि. विदेशी मधु, ९६४ ब.लि. परराज्यातील विदेशी मद्य, १७००० बनावट बुचे, ८० ब.लि. बिअर, ६२५ लि. ताडी तसेच ०३ चारचाकी वाहन व ०७ दुचाकी वाहनांसह एकुण रूपये ४९ लाख ६७ हजार १०२ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



तसेच दि. २५ ते २८ जानेवारी २०२६ या कालवधीमध्ये निरीक्षक पंढरपूर विभाग सांगोला तालुक्यातील निजामपूर येथे कारवाई करुन ३४६ ब.लि. बनावट विदेशी मद्य तसेच बनावट बुचे, बनावट लेबले, ईत्यादीसह एकुण रुपये ५ लाख ०३ हजार ८४०/- चा मुद्देमाल जप्त केला असुन एक आरोपीस अटक करण्यात आला आहे, तसेच निरीक्षक ब विभाग सोलापूर या कार्यालयाने शहरातील जुना विडी घरकुल परिसरात कारवाई करुन अवैध परराज्यातील गोवा बनावटीचे ५६० ब.लि. मद्य एक दुचाकी वाहनासह एकुण रुपये ९ लाख २० हजार १२५/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच निरीक्षक भरारी पथक क्र.१ या कार्यालयाने मोहोळ तालुक्यातील मौजे आष्टी येथे कारवाई करुन १८९ ब. लि. बनावट देशी मद्यासह एकुण रुपये ८४०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एक आरोपीस अटक करण्यात आली आहे. अवैध मद्य विक्री करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणाऱ्या एकूण ०८ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून एकुण २४ आरोपींवर कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर कारवाई प्र.उपअधीक्षक जे.एन. पाटील, निरीक्षक आर. एम. चवरे, ओ व्ही घाटगे, राकेश पवार, पंकज कुंभार, सचिन भवड, तसेच दुय्यम निरीक्षक एस.डी. कांबळे, राम निंबाळकर, धनाजी पोवार, आर. एम. कोलते, सुखदेव सिद, सचिन शिंदे समाधान शेळके, सहाय्यक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, संजय चव्हाण, जवान आण्णा करचे, नंदकुमार वेळापूरे, वसंत राठोड, चेतन व्हनंगुटी, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, विनायक काळे, अण्णासाहेब फड, कपिल स्वामी, गजानन ढब्बे, तानाजी जाधव, पवन उगले, योगीराज तोग्गी यांनी पार पाडली.

## माढ्यात कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे प्रशिक्षण; २२९ जण राहिले गैरहजर

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २९ जानेवारी-**

माढा तालुक्यात होत असलेल्या ७ जिल्हा परिषद गट व १४ पंचायत समिती गणातील निवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी जयश्री आव्हाड यांनी दिली.

येत्या सात फेब्रुवारीला जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीचे मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने प्रशिक्षणासाठी १ हजार ७३४ कर्मचाऱ्यांना आदेश देण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांम ध्ये मतदान केंद्राध्यक्ष, सहायक म तदान अधिकारी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणास सुमारे २२९ कर्मचारी गैरहजर होते. त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या कर्मचाऱ्यांना मतदान प्रक्रिया कशी पार पाडवयाची याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी आव्हाड आणि सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे यांनी दिली.



## श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी पतसंस्थेचा ५०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

येथील सहकार क्षेत्रात अत्यंत नावाजलेली पतसंस्था म्हणून ज्याचे नाव घेतले जाते शिवाय महाराष्ट्र शासनाचे सहकारनिष्ठ पुरस्कार मिळवलेले जोडभावी पेठ कन्ना चौक येथील श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रीय नागरी पतसंस्थेने ५०० कोटी व्यवसायाचा टप्पा पार केला असल्याचे चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी यांनी सांगितले.

उदगिरी म्हणाले, व्यवसाय उद्दिष्ट पूर्तीचे सर्व श्रेय ज्यांनी आमच्या संस्थेत अत्यंत विश्वासाने ठेवी ठेवल्या अशा ठेवीदार, खातेदार आणि कर्जदार अशा ग्राहकांना जातो. संस्थेचे संपत्ती स्थिती मजबूत असून शहरातील ग्राहकांचा विश्वास वाढला आहे. एकूण ठेवी २६२ कोटी असून कर्जे २३८ कोटी इतकी झालेली आहे. आणि यामध्ये जास्तीत जास्त सोने तारण कर्ज असून ग्राहकांनी सोने तारण कर्ज मिळविण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याचे इथे नमूद करावे लागेल. तसेच आमच्या संस्थेचे खेळते भांडवल ३१२ कोटी इतकी आहे. महाराष्ट्र शासन दरबारी अनेक वेळा आमच्या पतसंस्थेची दखल घेतली गेली असून व्यवसायाचे अनेक पुरस्कार आमच्या संस्थेला मिळाले असल्याचे चेअरमन यांनी सांगितले.

संस्थेच्या प्रगतीत शाखा अधिकारी कर्मचारी आणि संचालक मंडळाचा मोठा वाटा आहे. संचालक मंडळ कोणतेही मानधन न घेता कोणते कर्ज न घेता कर्जाला जामीन न राहता येथे सेवा बजावीत असतो. त्यामुळे संस्थेचा एनपीए नेहमी झिरो आहे आणि तशी काळजी घेतली जाते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक चेअरमन लक्ष्मीकांत उदगिरी यांनी केले व्हाईस चेअरमन विलास बडगंची यांनी आभार मानले. सूत्रसंचालन मुख्य व्यवस्थापक राजेंद्र उदगीरी यांनी केले. यावेळी समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम, संस्थापक रामचंद्र पूडूर, अरुण चिंता, रामकृष्ण उदगिरी, डॉ. नारायण रंगम विद्यमान संचालक मंडळ विठ्ठल बडगंची, अरविंद पुडूर, विष्णू म्याकल, नरेंद्र बत्तूल, मल्लिकार्जुन खंडे, अजय रंगम, चंद्रकांत रंगम, अंबिका उदगिरी, विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड, भगवंत फलमारे, ॲड. अंबादास कंदीकोंडा आदी उपस्थित होते.

## वडिलांनी केली मुलीला मारहाण

**सोलापूर** - वडिलांकडून मुलीला विटांनी आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. प्रशंसा प्रकाश अडगुळे वय १६, रा. रंगभवन चर्च मागे सोलापूर असे मारहाण झालेल्या मुलीचे नाव आहे. प्रशंसा ही मंगळवारी रात्री ९.१५ वाजता राहत्या घराजवळ काम करत होती. त्यावेळी वडील प्रकाश हा तेथे आला, त्याने विनाकारण तिला विटांनी मारहाण केली. यात तिला मुकामार लागल्याने तिची आई स्मिता यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. याची नोंद सिव्हिल चौकीत झाली आहे.

## चक्कर येऊन पडल्याने जखमी

**सोलापूर** - उत्तर सोलापूर तालुक्यातील राहत्या घरी असताना अचानक चक्कर येऊन पडल्याने महिलेच्या डोक्याला जखम झाली. हा प्रकार बुधवारी सकाळी १० वाजता घडला. लक्ष्मी विश्वनाथ निंबाळकर वय ३१ असे जखमी महिलेचे नाव आहे. बुधवारी सकाळी १० वाजता त्या वडाळा येथील राहत्या घरी होत्या. त्यांना अचानक चक्कर आली, आणि त्या खाली कोसळल्याने त्यांच्या डोक्याला जखम झाली. त्यांच्यावर वडाळा येथील रुग्णालयात उपचार करून पती विश्वनाथ यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## दुचाकी घसरून तरुण जखमी

**सोलापूर** - अचानक दुचाकी घसरून मेहता शाळेजवळ झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला आहे. मंगळवारी घडलेल्या अपघातात सिद्धाराम आप्पाया स्वामी वय २४ राहणार शेळगी हा जखमी झाला. रात्री साडेअकराच्या सुमारास सिद्धाराम हा दहिटणे येथून शेळगीच्या दिशेने दुचाकीने जात होता. मित्रनगर रोडजवळ दुचाकी घसरून सिद्धाराम हा खाली पडल्याने त्याच्या डोक्याला जखम झाली आहे, त्याला शुभम याने उपचारासाठी सिव्हिल मध्ये दाखल केले.



## आर्द्रा मॉलमध्ये चार हजाराच्या खरेदीवर भेटवस्तू, लकी ड्रॉ कुपन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ जानेवारी-**

प्राइड ऑफ सोलापूर असलेले सर्वात मोठे कपड्यांचे नवीन डेस्टिनेशन आर्द्रा मॉलने ग्राहकाकरिता ४ हजार रुपयेच्या खरेदीवर हमखास भेटवस्तू आणि एक लकी ड्रॉ कुपन तेही दहा कपल्स ना दुबईला जाण्याकरिताची स्कीम सुरू केली असल्याचे आर्द्रा मॉलचे प्रमुख व्यवस्थापक शुभम भुतडा यांनी सांगितले.

सम्राट चौक सोलापूर-पुणे हायवे डी मार्ट समोर असलेले आर्द्रा मॉल दिवाळीमध्ये कार वितरण केल्यानंतर च्या प्रचंड यशानंतर हे दुसरे दुबईला दहा कपल्स ना पाठवण्याची आणि एक कोटीपर्यंतची बक्षीस योजना त्यांनी आखली आहे. तीन हजारापेक्षा जास्त ग्राहकासाठी भव्य बक्षीस मिळण्याची सुवर्णसंधी आहे. ही योजना २५ एप्रिलपर्यंत चालणार आहे. दिवाळीमध्ये सुरू केलेला लकी ड्रॉ कूपनद्वारे एका कुटुंबाला कार आणि ३ हजार कुटुंबांना वेगवेगळे बक्षीस मिळाले.

ग्राहकांच्या उस्फूर्त प्रतिसादानंतर हा दुबईचा स्कीम त्यांनी लॉन्च केलेला आहे. ज्यांचं नवीन लग्न ठरलेलं आहे त्यांनी बसण्यासाठी आणि ज्यांचं लग्न झालेला आहे त्यांनी लग्नाच्या वाढदिवसाच्या गिफ्ट खरेदी करण्यासाठी आग्रा मॉलला भेट द्यायचा आहे आणि आपली दुबई ट्रिप नक्की करायची आहे असे आवाहन भुतडा परिवारान केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'रासेयो'च्या विद्यार्थ्यांनी शाश्वत विकासासाठी प्रयत्न करावेत

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी युवकांचा सक्रिय सहभाग आणि सर्वतोपरी योगदान रासेयोच्या माध्यमातून विद्यार्थी देऊ शकतात. श्रमदान, वृक्ष लागवड, स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्यविषयक जनजागृती, महिलांचे रोगनिदान, सांडपाण्याचे व्यवस्थापन, जलसंधारण व्यवस्थापन असे विविध उपक्रम राबवून स्वयंस्फूर्तीने कार्य करावे, असे प्रतिपादन समाज प्रबोधन अकादमीचे सचिव सुधाकर शिंदे यांनी केले.

औसा तालुक्यातील चिंचोली तपसे येथे किल्लारीतील शहीद भगतसिंग महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सरपंच विश्र्वंभर सुरवसे, उपसरपंच युवराज यादव, मनोज इंजे, चव्हाण, अकादमीचे कोषाध्यक्ष डॉ. संजय मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. संदीप चव्हाण उपस्थित होते. यावेळी कोषाध्यक्ष डॉ. संजय मोरे म्हणाले, रासेयो शिबिर हे विद्यार्थ्यांना समाजसेवेतून नेतृत्व विकासासाठी घडविणारी महत्त्वाची योजना आहे. प्राचार्य डॉ. संग्राम मोरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अशोक गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संदीप चव्हाण यांनी आभार मानले.



# लातूर जिल्ह्यात दोन्ही सेना अस्तित्वहिन..?

## सामान्यांना प्रश्न पडलाय.. सेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** कधीकाळी शिवसेना म्हटले की, सामान्य नागरिकांच्या डोळ्यांसमोर शिवसेनेच्या वाघाचे चित्र तरळून जायचे. मागच्या काही कालखंडात शिवसेनेबद्दलचा आदर, दरारा जणू संपल्यागत झाला आहे. त्यातच सेनेत दुफळी झाल्यानेही लातूर जिल्ह्यात उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि एकनाथ शिंदेंची सेना सद्यस्थितीत अस्तित्वहिन झाल्याचे निदर्शनास येत आहे. त्यामुळे सामान्यांच्या तोंडून आता शिवसेनेचा वाघ डरकाळी फोडणे विसरला की काय ? असे एक ना अनेक प्रश्न ऐकावयास मिळत आहेत.

लातूर जिल्ह्याच्या राजकारणात शिवसेना एकसंघ असतानाही फारसे प्राबल्य दाखवू शकली नव्हती. परंतु लोकोपयोगी उपक्रमांत, सामान्यांच्या प्रश्र्नांच्या सोडवणुकीसाठी आक्रमकपणे रस्त्यावर उतरणारी शिवसेना आणि शिवसैनिक जुने जाणते लोक आजही विसरलेले नाहीत. सामान्यांच्या हितासाठी रस्त्यावर उतरणारा बाळासाहेबांचा शिवसैनिकही आता कालबाह्य झाल्यागत झाला आहे. मध्येच एकनाथ शिंदेंमुळे बाळासाहेबांच्या शिवसेनेत मोठी फूट पडली. सत्तेच्या अभिलाषेमुळे आजमितीस राजकारणात कधीही, काहीही होऊ शकते असे म्हटले जाते. एकसंघ असलेल्या शिवसेनेची शकले उडाल्याने सध्यस्थितीत दोन्ही शिवसेनांची अवस्था तशी बिकटच असल्यासारखी पाहायला मिळते.

कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला असणाऱ्या लातूर जिल्ह्यात केवळ शिवसेनाच नाही तर अन्य कोणत्याही विरोधी पक्षाचे अस्तित्व दखल घेण्याजोगे वाढणार नाही, याची खबरदारी काही नेतेमंडळींकडून घेतली गेली.


आज देशात प्रथम क्रमांकाचा राजकीय पक्ष असणाऱ्या भाजपलाही याठिकाणी मजबूत पाय रोवू देण्यापासून अनेक मार्गांनी रोखले जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख आणि गोपीनाथराव मुंडे या दोघांमधील जीवश्र्च कंठश्र्च मैत्री जगजाहीर होती. या दोन्ही नेत्यांनी मैत्रीत राजकारण येऊ दिले नसले तरी कायम एकमेकांना सांभाळून घेण्याचे काम तहहयात केल्याचे सर्वज्ञात आहे. ७या दोन्ही नेत्यांनंतर त्यांच्या वारसांनीही हा पायंडा पुढे चालू ठेवण्याचे काम केल्याचेही सर्वांनी पाहिले - अनुभवले आहे. मागच्या काही वर्षात जिल्ह्यात भाजपने भक्कमपणे आपली पायाभरणी केली आहे. त्यामुळे आज भाजप जिल्ह्यातही एक अग्रेसर राजकीय पक्ष म्हणून पुढे आला आहे. मात्र, कधीकाळी भाजपचा मोठा भाऊ असणाऱ्या शिवसेनेला जिल्ह्यात कधीच मोठी उभारी घेता आली नाही. सेनेकडे कोणत्याही भूमिकेवर खंबीर राहणारे नेतृत्व नसल्यानेही कदाचित असे घडले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सेनेत दुफळी झाल्यानेही मूळ शिवसेनेतील मंडळी इकडे - तिकडे विखुरली गेली. जे बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांशी बांधील होते, ते मूळ शिवसैनिक आजही उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ आहेत. कोणत्याही पदाची अपेक्षा न धरता काही मंडळी आजही तत्वांशी बांधील आहेत. अशा चेहऱ्यांमध्ये लातूरचे ज्येष्ठ शिवसैनिक त्र्यंबक गुरुनाथ स्वामी यांच्या सारख्यांचा समावेश आहे. या मंडळींना कोणी कितीही आमिषे दाखवली तरी बाळासाहेबांचे खंदे समर्थक असणारी ही मंडळी कायम तत्वनिष्ठ राहत आली आहेत. या मंडळींमुळेच बाळासाहेबांची मूळ शिवसेना आपले अस्तित्व टिकवून आहे, ही बाबही काही कमी नाही. महाविकास आघाडीमध्ये शिवसेनेचा सहभाग असला तरीही लातुरात उद्धव ठाकरेंची शिवसेना फारसा प्रभाव दाखवण्याकामी निष्प्रभ ठरली आहे, ही बाब मान्यच करावी लागेल. जिल्ह्यात ना उद्धवसेना अस्तित्व वाढवू शकलीय ना शिंदेसेना. त्यामुळे शिवसेनेचा वाघ बदलत्या राजकीय वातावरणात डरकाळी फोडणे विसरून गेला की काय ? असा प्रश्र्न सामान्यांना भेडसावत असल्याचे दिसत आहे. सामान्य नागरिकांना २० टक्के राजकारण आणि ८० टक्के समाजकारण करणारी बाळासाहेबांची शिवसेना आजही हवी आहे, असे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे. चालू असलेल्या जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणुकीतही जिल्ह्यात दोन्ही सेना निष्प्रभ थरातील असे दिसतेय. यामध्ये आमूलाग्र बदल, सुधारणा आवश्यक असल्याची भावना हिंदुत्ववादी मतदारांतून व्यक्त होताना ऐक्याला मिळतेय.

## साईसेवक प्रतिष्ठानच्यावतीने १ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** गेल्या ४० वर्षापासून साईसेवक प्रतिष्ठान कव्हा नाका लातूरच्यावतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ३१ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत परमपुज्यनिय विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांच्या उपस्थितीमध्ये सार्वजनिक साईबाबा भंडारा उत्सव २०२५-२६ चे आयोजन राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे करण्यात आलेले आहे.



या भंडारा उत्सवानिमित्त ३१ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ०७ ते १० या वेळेत भजन संध्या, ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ०७ ते ०८ या वेळेमध्ये अभिषेक व महापुजा तर ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वा महाराष्ट्रातील प्रसिध्द कीर्तनकार परमपुज्य विद्यानंदजी महाराज (बाबा) गातेगावकर यांचे कीर्तन राजीव नगर, कव्हा ता.जि.लातूर येथे आयोजित करण्यात आलेले आहे. त्यामुळे कव्हा गाव व परिसरातील भाविकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन साईसेवक प्रतिष्ठान, कव्हा नाका, लातूर व समस्त ग्रामस्थ कव्हा यांच्यवतीने करण्यात आलेले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने मोठ्या प्रमाणात प्रगती होत असताना दिसून येत आहे. क्वांटम विज्ञानातून भविष्यातील संशोधनाला चालना मिळेल असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर यांनी केले.




महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर आणि इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (आयएपीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने The Quantum Enigma: Unveiling Reality Secrets या विषयावर एक दिवसीय ऑन लाइन इंटरनॅशनल वेबिनार आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील भौतिकशास्त्र विभागातील प्रोफेसर डॉ.के.एम.जाधव, Mahle Constructor University, Slovenia येथील डॉ.झाक्लिना लुबेई, Velika Gorika, Zagreb, Croatia येथील अन्तोनिजा बरीसिक, प्रभारी प्राचार्य डॉ.आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी, मुख्य संयोजक डॉ.एस.एम. डोंगरगे, सहसंयोजक डॉ.ए.एच. हेडाव, सह संयोजक प्रा.आर. एस.देव्हडे, डॉ.एम.एम.बेटकर आणि डॉ.अमित पवार यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ.के.एम.जाधव यांनी नवीन तंत्रज्ञान हे क्वांटम तंत्रज्ञानावर आधारित आहे असे सांगितले. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरून डॉ. झाक्लिना लुबेई यांनी मानवाच्या मेंदूची रचना आणि कार्यपद्धती नैसर्गिकरित्या वेगवेगळी असते आणि ही वेगळेपणाची अवस्था आजारपण नसून मानवी विविधतेचा भाग आहे असे सांगितले.

अन्तोनिजा बरीसिक यांनी आधुनिक जगात भौतिकशास्त्राचा वापराबद्दल माहिती दिली. तर डॉ. जी. एच. जाधव यांनी फोटॉन सिद्धांत, नॅनो-स्केल डिव्हाइसेसमधील चार्ज कॅरिअर मॉडेलिंग, क्वांटम फिजिक्सचे आधुनिक नियम आणि सेमीकंडक्टर डिव्हाइस स्केलिंगवरील क्वांटम परिणाम या विषयांवर सविस्तर माहिती दिली. आइनस्टाईच्या क्वांटम सापेक्षकांच्या काही संकल्पनांवर आक्षेप घेऊन त्यांच्या विरुद्ध सापेक्ष प्रात्यक्षिक मांडून क्वांटमच्या नवीन संशोधनाला वाट करून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या प्रात्यक्षिकासाठी ते प्रयत्नशील आहेत असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.आर.एस.देव्हडे यांनी केले प्रमुख पाहुण्यांचे परिचय प्रा.डॉ. अविनाश हेडाऊ यांनी केले तर आभार डॉ.करणसिंह मोरे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.राम पाटील, प्रा.पंकज साळवे, प्रा.गोपाल रांजनकर, प्रा.पी. एल.पाटोळे, प्रा.ए.एस.कल्याणी, प्रा.एस.सी.राजे, प्रा.सोनाली खुब्बा यांचे सहकार्य लाभले.

या आंतरराष्ट्रीय वेबिनारमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांबरोबरच इतर राज्यांतून मिळून ३१७ प्राध्यापक, संशोधक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

# शाळेत शिक्षक नसल्याचे पाहून रुद्धाच्या सरपंचांनीच घेतली शाळा

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २९ जानेवारी :** निवडणुकीच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक गेल्याने शाळा ओस पडल्याचे माहिती मिळताच रुद्धा (ता. अहमदपूर) येथील सरपंच गजानन चंदेवाड यांनी स्वतः शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे वर्ग घेतले. केवळ पाहणी करून न थांबता, त्यांनी विद्यार्थ्यांना 'कौशल्य विकास' या विषयावर मार्गदर्शन करत एक आगळावेगळा आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

सध्या प्रशासनाकडून निवडणुकीच्या अनुषंगाने शिक्षकांना विविध जबाबदाऱ्या आणि प्रशिक्षणे दिली जात आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता भासत असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. हीच परिस्थिती रुद्धा येथील जिल्हा परिषद शाळेत निर्माण झाली होती. दि २४ जानेवारी रोजी शाळेत शिक्षक उपलब्ध नसल्याची बाब समजताच सरपंच गजानन चंदेवाड यांनी तात्काळ शाळेत धाव घेतली आणि शिक्षकाची भूमिका बजावत



विद्यार्थ्यांना जमेल त्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

एकेकाळी ग्रामीण शिक्षणाचा कणा असलेल्या जिल्हा परिषद शाळांची अवस्था सध्या बिकट होताना दिसत आहे. वर्षानुवर्षे कमी होत जाणारी पटसंख्या यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. पट अभावी अनेक ठिकाणी शाळांचे विलीनीकरण होत असून, एकेकाळी नामांकित मानली जाणारी ही शिक्षण व्यवस्था आता नाममात्र ठरताना दिसत आहे. अशा परिस्थितीत, सरपंच गजानन चंदेवाड यांनी दाखवलेली तत्परता आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याप्रती असलेली तळमळ कौतुकाचा विषय ठरत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांत महिला बालविकास विभाग यंत्रणा निर्माण व्हावी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** महिला व बाल विकास विभागाकडील पदांचा आकृतिबंध सर्वसमावेशक करावा, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांत महिला व बालविकास विभाग यंत्रणा निर्माण करावी, अशी मागणी महिला व बाल विकास विभागाच्या राजपत्रित अधिकारी संघटना व इतर संघटनांच्या वतीने पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. महिला व बाल विकास विभागामार्फत ग्रामीण व शहरी क्षेत्रात एकात्मिक बालविकास सेवा योजना तसेच महिलांसाठी विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येते.या विभागामार्फत विधिसंघर्षग्रस्त बालके, निराधार निराश्रित महिला, हुंडा प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, अशा अनेक योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी, प्रधानमंत्री मातृवंदना योजना याच विभागामार्फत राबविल्या जातात. मात्र, या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्र्न बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित आहेत.

महिला व बालकल्याण विभागाकडील विविध योजनांसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करावे, विभागाकडील विविध संवर्गाचे सेवा प्रवेश नियम सुधारणा करावे, जिल्हा परिविक्षा अधिकारी पद राजपत्रित जाहीर करावे, पर्यवेक्षिका व मुख्यसेविका संवर्ग एकत्रीकरण आणि वेतन तफावत सुधारणा करावी, विविध स्तरांवरील पदोन्नती प्रकरणे विहित कालमर्यादेत पूर्ण करावीत, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचारी दर्जा द्यावा व स्वतंत्र सेवा प्रवर्ग तयार करावा, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावेळी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक त्या सूचना संबंधितास देण्यात येतील, असे आश्र्वस्त केले. यावेळी महिला व बालविकास विभागाकडील राजपत्रित अधिकारी संघटना, पर्यवेक्षिका संघटना, संरक्षण अधिकारी संघटना, परिवीक्षा अधिकारी संघटना, अंगणवाडी कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# निष्ठावंत पारंपरिक शिंप्याची दु:खभरी कहाणी म्हणजे उसवण होय : सौदागर

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २९ जानेवारी :** पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येकाला काही ना काही उद्योग व्यवसाय करावाच लागतो. जेंव्हा लोकांच्या जीवनपद्धतीत लहानमोठे बदल होतात. तेव्हा काही प्रस्थापित व्यवसाय आणि सामाजिक सस्था कालबाह्य होऊन नष्ट होतात मग त्यांच्याशी निगडित असणाऱ्या व्यक्ती समाजात उपऱ्या होऊन जातात तर काही जणांचे जीवन उदध्वस्त होऊन जाते. असाच शिलाई व्यवसाय करणाऱ्या एका निष्ठावंत पारंपरिक शिंप्याची दुःखभरी कहाणी म्हणजे उसवण ही कादंबरी होय असे मत प्रसिद्ध साहित्यिक देविदास सौदागर यांनी व्यक्त केले.




अमर्याद ज्ञान मर्यादित वेळेत प्राप्तीसाठी गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत डॉ. हणमंत पवार यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५३ वे पुष्प देविदास महादेव सौदागर यांनी युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त उसवण या साहित्यकृतीवर संवाद साधून गुंफले. पुढे बोलताना ते म्हणाले. शहरात लोकप्रिय असलेले अल्प दरातील रेडिमेड कपडे जेंव्हा खेड्यांतही सहज मिळूलागत. त्याचा शिंप्याच्या जीवनावर विपरीत परिणाम होऊन धंदा बंद पडून त्याचे कुटुंब उपासमारीच्या खाईत लोटले जाते.

या संवादा नंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात डॉ. हनुमंत पवार म्हणाले कष्टकरी शिंप्याच्या जगण्याची लढाई , निर्मिती करतानाचे अनुभव, प्रकाशन ते युवा साहित्य अकादमीपर्यंतचे विविध अनुभवही सौदागर यांनी मांडले ते सर्व कष्टरी व्यावसायिक या सर्वांसाठी अत्यंत प्रेरणादायी असून या वाचक संवादच्या माद्यमातून सर्वांपुढे आले. आजच्या काळासाठी हे काम खूप महत्वाचे आहे.

शासकीय दूध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या अत्यंत प्रभावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुरेश शिंदे यांनी केले, संवादकांचा परिचय डॉ. ज्ञानदेव राऊत यांनी करून दिला शेवटी आभार वीरभद्र स्वामी यांनी मानले. या कार्यक्रमास प्रसिद्ध साहित्यिक सुरेंद्र रावसाहेब पाटील, माजी गट शिक्षणाधिकारी नागोराव भोसले, बालाजी बिरादार, प्राचार्य विजयकुमार पाटील गणेशपूरकर, डॉ. नामदेव खंडगावे, उद्योजक रमेश अंबरखाने, डॉ.अनिल भिकाने यांचेसह अनेक मान्यवर उपस्तिथ होते.

## गिलचे यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषद, जळगावच्या वतीने देण्यात येणारा महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त लातुरातील इंदिरा गांधी विद्यालयातील शिक्षक बस्वराज गिलचे यांना यंदाचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जळगावातील बचत भवन येथे आयोजित सोहळ्याला नाशिकचे माजी शिक्षक आमदार किशोर दराडे, मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार किरण सोनवणे, समता शिक्षक परिषद महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष भरत शिरसाट, उपाध्यक्ष रणजित सोनवणे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी शिक्षक बस्वराज गिलचे यांना मान्यवरांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या यशाबद्दल संस्था सचिव राजेंद्र इंद्राळे, शाळेचे मुख्याध्यापक एस.एन. पेठे, बी.डी. इंद्राळे, बी.व्ही. सुडे, एन.डी. स्वामी, राहुल जाधव, संदीप येलमटे, दीपाली इंद्राळे, आशा दुभासे, गणेश आकनगिरे, सचिन गोंडगावे, जगदीश सूर्यवंशी, पंढरीनाथ महंकावार, प्रदीप राठोड, परमेश्वर गायकवाड, ज्ञानोबा गायकवाड, महेश शिंदे-बाकलीकर यांनी कौतुक केले आहे.

# दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथे मानसिक आरोग्यावर राष्ट्रीय परिसंवाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २९ जानेवारी :** दयानंद एज्युकेशन सोसायटीच्या दयानंद विधी महाविद्यालय, लातूर येथील महिला अध्ययन केंद्राच्या वतीने हॉलिस्टिक अप्रोच टू मेंटल वेलनेस या विषयावर शनिवार, दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राष्ट्रीय स्तरावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

आजच्या धकाधकीच्या, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक ताण, अस्वस्थता, नैराश्य व भावनिक थकवा वाढत असून मानसिक स्वास्थ्य जपणे ही काळाची गरज बनली आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य महत्त्वाचे असून ते समग्र दृष्टीकोनातून समजून घेणे आवश्यक आहे. या पार्श्र्वभूमीवर मानसिक आरोग्याविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे व मानसिक स्वास्थ्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहण्याची गरज अधोरेखित करणे हा या परिसंवादाचा मुख्य उद्देश आहे.

या परिसंवादात प्रा. डॉ मीत शिंदे, प्राध्यापक पी. एन. दोशी कॉलेज, मुंबई, तसेच डॉ. उज्ज्वल अनिल नेने, मानसोपचारतज्ज्ञ, के. ई. एम. रुग्णालय, पुणे, हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादात मानसिक आरोग्याशी संबंधित सामाजिक, मानसिक व कायदेशीर पैलूंवर तज्ज्ञांकडून सखोल विचार मांडले जाणार आहेत. या राष्ट्रीय परिसंवादाचा लाभ संशोधक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओळखपत्र विचारले असता...
# दुय्यम निबंधक डोके चे डोकेच फिरले

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. २९ जानेवारी :** चाकूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयाचा कारभार पुन्हा एकदा संशयाच्या भोवऱ्यात सापडला असून प्रशासनाच्या नियमांची सर्रास पायमल्ली होत असल्याचे चित्र समोर आले आहे. सदर कार्यालयात एकूण मंजूर तीन कर्मचाऱ्यांपैकी दुय्यम निबंधक व शिपाई ही दोन्ही पदे सध्या रिक्त आहेत. त्यामुळे कार्यालयाचा कारभार प्रभारी पद्धतीने सुरू आहे.

लातूर येथील वरिष्ठ लिपिक व्यंकट डोके यांनी प्रभारी दुय्यम निबंधक म्हणून तात्पुरत्या स्वरूपात रुजू होऊन कामकाज सुरू केले आहे. मात्र, प्रत्यक्षात कार्यालयीन शिस्त व नियमांचे पालन होत आहे का, याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले आहे की, येथे कोणत्याही प्रकारचे काम एजंटमार्फत केले जात नाही, तसेच एजंटमार्फत

**ओळखपत्राविना अधिकारी खुर्चीवर, सीसीटीव्हीचा अभाव; शिस्तभंग कारवाई होणार का?**

काम होत असल्याचे आढळल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. तसेच कार्यालयाचे कामकाज दुपारी एक वाजल्यापासून सुरू होणार असून, लातूर येथील कामकाज पूर्ण केल्यानंतरच चाकूर येथील कामकाज हाताळले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.मात्र सहाय्यक दुय्यम निबंधक डोके यांना आपली कार्यालय कामकाजाची वेळ काय आणि आय कार्ड का घातले नाही असे विचारले असता डोकेंचे डोकेच सरकले आणि चाकूर व अहमदपूर तालुक्यात माझी खूप ओळख आहे असे म्हणाले.मग ओळख




सांगण्यामागचा उद्देश काय होते हे मात्र समजले नाही.

प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी पत्रकारांनी दुय्यम निबंधक कार्यालय, चाकूर येथे भेट दिली असता धक्कादायक प्रकार उघडकीस आला. प्रभारी अधिकारी व्यंकट डोके हे गळ्यात ओळखपत्र न घालता खुर्चीवर बसलेले आढळून आले. पत्रकारांनी त्यांच्याकडे ओळखपत्राची विचारणा केली असता, दुय्यम निबंधक डोके चे डोकेच फिरले संबंधित अधिकाऱ्यांचा संताप अनावर झाला व पत्रकारांनी त्यांच्या गळ्यात ओळखपत्र नसलेला फोटो काढला असता, त्यांनी उलट पत्रकारांचाच फोटो काढण्यास सुरुवात केली.

विशेष म्हणजे, सदर कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले नाहीत, त्यामुळे पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. सरकारी कार्यालयात सीसीटीव्ही असणे हे सुरक्षितता व जबाबदारीच्या दृष्टीने अत्यावश्यक मानले जाते. मात्र, येथे त्याचा अभाव दिसून येत असून त्यामुळे कार्यालयाचा कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

नियमांनुसार, सरकारी कर्मचारी व अधिकारी यांनी कामकाज करताना ओळखपत्र गळ्यात घालणे अनिवार्य आहे. हे कायद्याच्या व प्रशासकीय मार्गदर्शक सूचनांनुसार बंधनकारक असताना, त्याचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. मात्र, या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेणार, आणि नियमभंग करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?, याकडे आता सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

चाकूर तालुक्याच्या ठिकाणी दुय्यम निबंधक कार्यालय हे नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाशी थेट संबंधित असताना, अशा प्रकारची बेफिकीर कार्यपद्धती प्रशासनाच्या विश्र्वासार्हतेवर प्रश्र्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे.

## ग्रामपंचायत बैठकीत नागरिकांच्या विविध समस्यांवर चर्चाविमर्श

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २९ जानेवारी :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे थेरगाव येथील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते व सरपंच सौ रेखा जाधव यांनी सरपंच सौ रेखाबाई संजय जाधव यांच्या अध्यक्षते खाली ग्रामपंचायत कार्यालय थेरगाव येथे ग्रामसभा आयोजित केली होती. सर्व गावातील नागरिक, ग्रामपंचायत पंचायत सदस्य, सर्व विभागातील अधिकारी / कर्मचारी इ. सर्वांनी ग्रामसभेस उपस्थित राहावे असे आवाहन केले होते.

परंतु सदरील ग्रामसभेला एकाही सदस्यांची उपस्थिती नसल्याने गावातील नागरिकांच्या भावना अनावर झाल्या होत्या. कार्यकाळ संपल्यामुळे नागरिक आपणास प्रश्न विचारतील आपण त्यांना काय उत्तर द्यावे आपण तर निवडणुकीत जनतेला भरपूर आश्वासने दिली होती.त्याची आपण पुरवतात केली नाही त्यांना काय उत्तर द्यायचे यामुळे एकही सदस्य ग्रामसभेला उपस्थित राहिले नाहीत असे उपस्थित नागरिक बोलत होते.पाच वर्षे गावचा



कारभार पाहणाऱ्या उपसरपंचाने तरी उपस्थित राहुन नागरिकांचे समाधान करायला हवे होते परंतु उपसरपंच नॉट रिचेबल होते.त्यामुळे सरपंच सौ रेखा जाधव यांना जनतेला काय उत्तर द्यायचे हा मोठा प्रश्न उभा होता. परंतु कर्तव्यदक्ष ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते यांच्या बुध्दीचातुर्याने त्यांच्या कार्यकाळातील झालेल्या विकास कामाची माहिती व संभाव्य कामासंदर्भातील माहिती देवून नागरिकाकडून खेळीमेळीच्या वातावरणात ग्रामसभेला उपस्थित युवा नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व उपस्थित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन दिले.या ग्रामसभेला ठेवलेल्या या प्रमुख विषयासंदर्भात चर्चा करण्यात आली.

यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेणे, जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचा कामाचा आढावा घेणे, आपले सरकार सेवा केंद्रा मार्फत देण्यात येणाऱ्या सेवांच्या प्रगतीचा आढावा घेणे व सेवांची व्याप्ती वाढविणे, बालविवाह प्रतिबंध, बाल अत्याचार प्रतिबंध व एकल महिलांचे सक्षमिकरण बाबीवर चर्चा व नियोजन करणे, मेरा गाव मेरी धरोहर उपक्रमाबत चर्चा व मान्यता घेणे, शासनाने सूचित केलेले इतर कोणतेही विषय आणि आयत्या वेळी उपस्थित नागरिकांच्या समस्या यांच्यावर विस्तारित चर्चेतील समाधान यावर विचारमंथन करण्यात आले.

## प्रजासत्ताक दिनी देशभक्ती संगीतावर कवायत

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २९ जानेवारी :** येथील श्रीराम प्राथमिक माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रेणापूर येथे सोमवार दि . २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा. त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य सिध्देश्र्वर मामडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड, सचिव ॲड.पंडितराव उगीले, उपाध्यक्ष रविकांत अकनगिरे, कोषाध्यक्ष ज्ञानोबा बरुरे, सहसचिव विठ्ठलराव कटके, संचालक ॲड. सुनील कुटवाड, ॲड. दीपक गोडभरले, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्राध्यापक जुबेरखान पठाण



यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संगीत विभाग प्रमुख महादेव बन यांनी देशभक्तीपर गीत सादर केले. सुरेखा बस्तापूरे यांनी उपस्थितांना साक्षर मुक्तीची शपथ दिली. देशभक्तीपर गीतावर सामूहिक संगीत कवायत घेण्यात आली. यामध्ये वेगवेगळ्या राष्ट्रभक्ती गीतावरती विद्यार्थ्यांनी वेगवेगळे प्रकारच्या कवायती सादर केल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृतेश्वर स्वामी यांनी केले तर आभार प्रा.लहुकांत शेवाळे यांनी मानले.

## शोकसंदेश



मनाला चटका लावणारी महाराष्ट्रासाठी दुर्दैवी दुःखद घटना आज घडली, अजितदादा हे धडाडीचे नेते होते राज्याच्या राजकारणात त्यांचे चागले योगदान होते . दादाचेअकाली निधनाने राज्याच्या राजकारणात पोकळी निर्माण झाली . सत्ताधारी असो या विरोधक यांच्या वर त्याचा वेगळाच दबदबा होता. अजीतदादा हे धडाडीचे नेते होते. पवार कुटुंबीयांना दुःख सहन करण्याची शक्ती ,बळ व ताकद परमपिता परमेश्र्वर देवो भावपुर्ण श्रद्धांजली.

**–माजी आ. त्र्यंबक (नाना) भिसे**

-------



महाराष्ट्रातल्या राजकारणातील रोखठोक व्यक्तिमत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुःखद निधन झालं त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. राज्याच्या सहकार, कृषि, क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत मंत्रिमंडळात उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजितदादा पवार यांच्या जाण्याने राज्यातील लोकाभिमुख चेहरा हरवला आहे पवार कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत ओम् शांती.

**ता शिरूरअनंतपाळ दैठणा येथील ग्रामपंचायत विद्यमान उपसरपंच आशिष गोविंदराव बिरादार**




## रेणापूर बाजारपेठ बंद ठेवून व्यापाऱ्यांची दादांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २९ जानेवारी :** रेणापूर शहर बंद ठेवून व्यापारी बांधवांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

महाराष्ट्राचे राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात बुधवार दि. २८ जानेवारी रोजी अकाली निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. २९ जानेवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. गुरुवारी रेणापूर येथील संपूर्ण मार्केटच्या व्यापारी बांधवानी सकाळ पासुनच स्वयंस्पुर्तीने आपआपली दुकाने, संपूर्ण बाजारपेठ, व्यवहार दुपारी दोनपर्यत बंद ठेवून अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## श्रीराम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २९ जानेवारी :** प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा परिषद लातूर या ठिकाणी श्री गुरु तेगबहादुर समागम जन्मशताब्दी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या वक्तृत्व व गीत गायन जिल्हास्तरीय स्पर्धेच्या प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा लातूर येथे सत्कार संपन्न झाला.

यावेळी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना व जिल्हा परिषद प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्या हस्ते श्रीराम विद्यालयाची विद्यार्थिनी वक्तृत्व स्पर्धेतील जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम आलेली कु. पूर्वी घोडके व गीत गायन स्पर्धेत प्रथम आलेली कु.माहेश्वरी गायकवाड यांचा पालकासमवेत सत्कार संपन्न झाला.

त्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख अमृतेश्वर स्वामी व संगीत विभाग प्रमुख



महादेव बन यांचे मार्गदर्शन लाभले. प्रातिनिधिक स्वरूपामध्ये विद्यार्थी व तुलसीदास गोंदरकर यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड, सचिव ॲड. पंडितराव उगीले, प्राचार्य सिद्धेश्वर मामडगे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे, पर्यवेक्षक अनिल कुटवाड, प्रा. जुबेरखान पठाण यांनी व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक यांचे अभिनंदन केले.

## अजितदादांच्या निधनाने किनगाव शहर कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव, दि. २९ जानेवारी :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आकस्मिक निधनाच्या दुःखद वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून दि.२९ /०१/२०२६ रोजी किनगाव शहरातील व्यापारी वर्गातून देखील शोक भावना व्यक्त करण्यात आल्या.

या पार्श्वभूमीवर किनगाव शहरातील मुख्य बाजारपेठ पूर्णता कडकडीत बंद ठेवण्यात आली होती. सकाळपासूनच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवत, दिवंगत नेत्याप्रती शोक भावना व्यक्त केल्या.



नेहमी गजबजलेली किनगाव शहरातील बाजारपेठ आज मात्र ओस पडलेली दिसून आली . रस्त्यावर सुकसुकाट दिसत होता , सर्वत्र शोकमय वातावरण झाले होते. विविध राजकीय पक्षांचे नेते कार्यकर्ते, सामाजिक संघटनेचे प्रतिनिधी तसेच नागरिकांनी किनगाव शहरातील प्रमुख शिवाजी चौक येथे फलकाच्या माध्यमातून श्रद्धांजली अर्पण केली काही ठिकाणी मौन पाळून दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. अजित दादा पवार यांनी राज्याच्या राजकारणात व प्रशासनात दिलेले योगदान अविस्मरणीय असल्याच्या भावना नागरिकांकडून व्यक्त व्यक्त करण्यात आल्या त्यांच्या आकस्मिक जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी असल्याची प्रतिक्रिया अनेकांनी दिली. किनगाव शहराने कडकडीत बंद पाळून दिवंगत नेत्याला मानवंदना दिल्याचे चित्र सर्वत्र पाहावयास मिळाले.

## अजितदादांना देवणीकरांकडून अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २९ जानेवारी :** वलांडी प्रतिनिधी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाल्याची बातमी समजताच तालुक्यातील सर्वपक्षीय नेत्यांना धक्का बसला.बुधवारी दुपारी वलांडी,देवणी येथे शोकसभा घेवुन सर्वपक्षीय नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.महाराष्ट्र भावी मुख्यमंत्र्यांना मुकला ..अशा भावुक प्रतिक्रियानी कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले..

**प्रेमाची दादागिरी मालवली**

दादांच्या बोलण्यात राग असल्यासारखे वाटायचे पण कार्यकर्त्या प्रति असलेली त्यांची खरी प्रेमाची दादागिरी मालवली अशा प्रतिक्रिया काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजित बेळकोणे यांनी व्यक्त केल्या.



**कार्यकर्त्यांचा नेता गमावला**

सामान्य कार्यकर्त्यांना राजकारणाच्या माध्यमातून सर्वच बाबीने सक्षम बनवुन युवकाचे सक्षमीकरण करणारा युवकांचा नेता महाराष्ट्राने गमावल्याची खंत ह.भ.प.प्रशात पाटील दवणहिप्परगेकर यांनी व्यक्त केली.

**ग्रामीण विकासाला लागणार ब्रेक...**

हल्ली युवकांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकास करण्याचा वसा दादांनी घेतला होता..विकासाची चक्रे गतिमान होत असताना काळाने घातलेला हा घाला विकासाला ब्रेक लावणारा आहे.

**–महेश जाधव**
**तालुकाध्यक्ष राकॉ**

ह ज र ज बा बी , मुत्सद्दी,विकासाचा दृष्टिकोन असलेला नेता महाराष्ट्राने गमावल्याने सामान्य कार्यकर्त्यांचा आधारवड काळाने हिरावल्याची खंत अंकुश गायकवाड यांनी व्यक्त केली.

**भावी मुख्यमंत्र्यांना महाराष्ट्र मुकला..**

सहकारामध्ये उत्तम कामगिरी बजावत महाराष्ट्राच्या राजकारणात मजबुत पकड करत उपमुख्यमंत्री पदानंतर मुख्यमंत्री पदावर विराजमान होवुन महाराष्ट्राचा विकास साधण्याचे दादांचे स्वप्न अधुरे राहिले.महाराष्ट्र भावी मुख्यमंत्र्यांना मुकला अशा भावनिक प्रतिक्रिया माजी आमदार धर्माजी सोनकवडे यांनी व्यक्त केल्या.

**तालुक्यात शोकसभा**

तालुक्यातील धनेगाव, हेळंब, वलांडी, देवणी, जवळगा आदी गावांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी दिलीप पाटील नागराळकर, बाजार कमिटीचे उमाकांत नागलगावे, राम भंडारे, सदाशिव पाटील, अरुण पाटील, रामलिंग शेरे, सोनु डगवाले, उमेश बिरादार, कालिदास माने, संभाजी पाटील, सुर्यकांत भोसले, सुधीर भोसले, किशोर बिरादार, विवेक बिरादार, संदीप पाटील,बंटी सुर्यवंशी, गजानन भोपणीकर,अनिल इंगोले, अमरदीप बोरे आदींसह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

## बोंबळीत सहा एकर ऊसाच्या फडाला आग, चार शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**

**वलांडी, दि. २९ जानेवारी :** वलांडी प्रतिनिधी तालुक्यातील बोंबळी (खुर्द ) येथील चार शेतकऱ्यांच्या उसाला मंगळवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास शॉर्टसर्किटने आग लागल्याने सहा एकर उसाचा फड जळून खाक झाला आहे. तर या चारही शेतकऱ्यांच्या शेतातील शेती अवजारे ,ठिंबक सिंचन जळून खाक झाली आहेत. याबाबत बोंबळी शेतशिवारातील सर्वे नंबर चार मधील सुधीर दिगंबर भोसले यांचा तीन एकर ऊस, नारायण स्मृत भोसले यांचा एक एकर, सुग्रीव व्यंकट भोसले यांचा एक एकर, धैर्यराज विलास भोसले यांचा एक एकर ऊस आगीच्या भक्षस्थानी पडला आहे. शेजारच्या शेतकऱ्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले पण आगीने रौद्ररूप धारण केल्याने सदर शेतकऱ्याचा लाखो रुपयाचा ऊस जळून खाक झाला आहे त्यामुळे कारखान्यांनी जळीत ऊस त्वरित घेऊन जाण्याची मागणी शेतकऱ्याकडून करण्यात येत आहे.



CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये नूतन नगरसेविकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२९ जानेवारी -**

येथील मुक्तांगण इंग्लिश स्कूलमध्ये पालक मेळावा व नूतन नगरसेविकाचा सत्कार तसेच हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडला. प्रारंभी सर्व पालकांचे स्वागत संस्था अध्यक्ष किरण पुजारी, मुख्याध्यापिका विशाखा पाटील व त्यांच्या सहकार्याने केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक म्हणून



त्यांच्या माता मोठ्या प्रमाणात सहभागी झाल्या होत्या. यावेळी उपस्थित पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल माहिती देण्यात आली. तसेच यावेळी नुतन नगरसेविका जयश्री कंदले, अश्विनी रोचकरी, मंजुषा देशमने, नीता क्षिरसागर, डॉ. प्रगती कदम, श्वेता साळुंके, महंताबाई साठे, सरोजा अमृतराव, प्रियांका गंगणे, ज्योती सावंत, सुप्रिया गवळी व प्रियंका रोचकरी यांचा शाळेच्या वतीने फेटा बांधून शाल हार पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या उपस्थित पालक महिलांना हळदीकुंकू देऊन त्यांना भेटवस्तू देण्यात आल्या.



### संक्षिप्त वृत्त...



## धाराशिव जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले. ध्वजारोहणानंतर जिल्हाधिकारी पुजार यांनी स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यानंतर राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उपस्थितांना तंबाखूमुक्तीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास स्वातंत्र्यसैनिक बुबासाहेब जाधव, भास्करराव नायगावकर, नामदेव माने, श्रीपती जावळे, बाबुराव तवले, शेषराव बनसोडे व कलावती उंबरे तसेच त्यांचे नातेवाईक प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, संतोष राऊत, उमेश पाटील, स्वाती शेंडे, प्रवीण धरमकर व अरुणा गायकवाड, पुजार, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, तहसीलदार मृणाल जाधव, प्रकाश व्हटकर, नायब तहसीलदार संतोष पाटील, सचिन पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## स्वामी विवेकानंद व बसवेश्वर विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

**उमरगा, दि.२९ जानेवारी -**

येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ८.०५ वाजता संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन आप्पा दंडगे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष डॉ. चंद्रकांत महाजन, कार्यवाह डॉ. कपिल महाजन यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक, पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावर्षी शासनाच्या धोरणानुसार देशभक्तीपर गीतांवर आधारित अत्यंत सुंदर कवायत सादर करण्यात आली. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी भारतमाता, सैनिक, चाचा नेहरू, शेतकरी यांचे आकर्षक पेहराव परिधान करून उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. ध्वजारोहणानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



## पेठ सांगवी जि.प. शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात

**उमरगा, दि.२९ जानेवारी -**

तालुक्यातील पेठ सांगवी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दि. २६ जानेवारी रोजी ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजनानंतर मुख्याध्यापिका कल्पना गुंजोटे यांच्या हस्ते सकाळी ८ वाजता ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगते सादर करत विविध कला व सांस्कृतिक कार्यक्रमातून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमास सरपंच कौसरबी मुजावर, उपसरपंच सिराज शेख, शालेय समितीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उमरगा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी अजित पवारांचे अमूल्य योगदान स्मरणीय









**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आकस्मिक निधनाने राज्यभर शोककळा पसरली आहे. त्यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे उमरगा तालुका आणि आसपासच्या परिसरातील शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे.

उमरगा, लोहारा, औसा, तुळजापूर आणि निलंगा या परिसरात मोठ्या प्रमाणावर ऊस लागवड केली जाते. मात्र, दीर्घकाळ शेतकऱ्यांना उस गाळपासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. वेळेवर ऊस गाळप न होणे, कमी दर, वाहतुकीचा खर्च व मानसिक ताण यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होई. ही परिस्थिती पाहून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांसाठी ठोस पावले उचलली.

अजित दादांनी ऊर्जामंत्री असताना धाराशिवसह उमरगा व लोहारा तालुक्यात महावितरणच्या माध्यमातून विद्युत वितरणाचे प्रभावी जाळे उभारले, ज्यामुळे शेतकऱ्यांसाठी पाणीपुरवठा व शेतीसंबंधी सुविधा सुलभ झाल्या. उजनीचे पाणी धाराशिव जिल्ह्याला पुरवण्यासंदर्भातील पुढाकार शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला.

उमरगा परिसरातील भाऊसाहेब बिराजदार सहकारी साखर कारखाना आर्थिक आणि दुष्काळी अडचणींमुळे बंद पडला होता. यामुळे शेतकऱ्यांचा ऊस गाळपाचा प्रश्न अधिक गंभीर झाला होता. या समस्येवर उपाय म्हणून अजित पवारांनी त्यांच्या क्यू एनर्जी इंडस्ट्रीजच्या माध्यमातून कारखाना तब्बल वीस वर्षांसाठी भाडेतत्त्वावर घेतला. मागील सात वर्षांपासून कारखान्याद्वारे शेतकऱ्यांचा ऊस गाळपाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटला आहे. वेळेवर ऊस गाळप, चांगला दर आणि विश्वासार्ह व्यवस्थापनामुळे शेतकऱ्यांकडून या प्रयत्नांना प्रचंड प्रतिसाद मिळाला.

अजित पवारांचे योगदान केवळ शेतकऱ्यापुरते मर्यादित नाही. १९९३ साली धाराशिव व लातूर जिल्ह्यातील भीषण भूकंपाने अनेक भाग उद्ध्वस्त झाले. किल्लारी, सास्तुर, माकणी इत्यादी ठिकाणी प्रचंड जीवित आणि वित्तहानी झाली, अनेक कुटुंबे नामशेष झाली आणि मुले निराधार झाली. त्या कठीण काळात तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी जाहीर केलेल्या पुनर्वसन योजनांना प्रत्यक्षात लागू करण्यासाठी अजित पवार यांनी वैयक्तिक पातळीवर पुढाकार घेतला. त्यांनी भूकंपग्रस्त कुटुंबांचे पुनर्वसन, निराधार मुलांचे भविष्य आणि रोजगार सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

विशेषतः भूकंपात कुटुंब गमावलेल्या तरुणांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी त्यांनी अपूर्व प्रयत्न केले. अनेक निराधार तरुणांना रोजगार मिळवून त्यांचे आयुष्य पुन्हा उभे केले. प्रशासन, शासन आणि भूकंपग्रस्त यांच्यात दुवा म्हणून त्यांनी निभावलेली भूमिका आजही अनेक कुटुंबांच्या आठवणीत ताजी आहे.

अजित पवारांचे नेतृत्व नेहमीच तळमळीने, संवेदनशीलतेने आणि ठाम निर्णयक्षमतेने होत असे. सामान्यांच्या अडचणी आपल्याच अडचणी मानून त्यांना सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न उमरगा, धाराशिव व लातूर जिल्ह्याच्या जनतेसाठी अमूल्य ठरले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास, समाजातील सुरक्षा आणि सर्वांगीण विकास सुनिश्चित झाला.

उमरगा तालुका व परिसरातील जनतेसाठी अजित पवारांनी केलेले हे योगदान आणि शेतकऱ्यांसाठी घेतलेले दूरदृष्टीपूर्ण निर्णय नेहमी स्मरणात राहणार आहेत.

## उमरगा पोलिसांकडून प्रतिबंधित गुटखा जप्त; आरोपी ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

उमरगा पोलीस ठाण्याचे पथक दि.२५ जानेवारी रोजी चौरस्ता उमरगा येथील ज्योती पान शॉप मध्ये तपासणी करत असताना प्रतिबंधित गुटखा व तत्सम पदार्थ जप्त केले आहेत.

आरोपी ज्ञानेश्वर मधुकर सुर्यवंशी (रा. हराळी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांच्या ताब्यात ५,७२० रूपये किंमतीचा गुटखा, विमल पान मसाला आणि व्ही १ तंबाखू सापडला.

पोलिसांनी हा माल जप्त करून आरोपीस अन्न सुरक्षा व मानके कायदा, तसेच भारतीय दंडसंहिता कलम २२३, २७४, २७५ आणि १२३ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

## एकलव्य विद्या संकुल येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

मंगरूळ (यमगरवाडी), ता. तुळजापूर येथील एकलव्य विद्या संकुल येथे भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर प्रमुख पाहुण्या भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानच्या सदस्य डॉ. प्रणिता गडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यानंतर डॉ. प्रणिता गडेकर, सोलापूर येथील आनंद काळे, नांदेड येथील मार्तंड चावरे, गोविंद



सोमानी व सुमन सोमानी यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थी श्रावणी पाटोळे, प्रणय सुपलकर व कुमारी पवार यांनी भाषणे सादर केली. चंचल मोहिते व विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीत सादर केले.

विद्यार्थ्यांनी कवायत, डंबेल्स तसेच लेझीमची बहारदार प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. इयत्ता नववीतील विद्यार्थिनीने देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. जिल्हास्तरीय आश्रमशाळा क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेल्या विश्वजीत जाधव, अबोली माने, मानसी मोहिते, सुरजीत जाधव, ओंकार गंधेवाड व रमेश बंडगर यांचा सत्कार करण्यात आला.

तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल दयानंद भडंगे, अनुज कांबळे व देव कांबळे यांचा तसेच आश्रमशाळा गुणवत्ता समितीवर निवड झाल्याबद्दल अनिल घुगे यांचा सत्कार करण्यात आला. मगर सांगवी येथील महेश पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांसाठी खाऊची व्यवस्था केली. कार्यक्रमास मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, डॉ. प्रणिता गडेकर, अण्णासाहेब कोल्हटकर, आनंद काळे, मार्तंड चावरे, फुलाजी ताटी कुंडलवार, अशोक बनकर, अण्णासाहेब मगर, संगीता पाचंगे, पालक, माजी विद्यार्थी, कर्मचारी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला हुग्गे, अस्मिता भोजने व रूपाली गिरी यांनी केले. आभार प्रदर्शन अण्णासाहेब कोल्हटकर यांनी केले.

## लोहारा तालुक्यात 'उमेद' अंतर्गत वृक्ष लागवड उपक्रम यशस्वी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत यशस्वी महिला शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड यांच्या पुढाकारातून अंतर्गत पुनरुत्पादक शेती उपक्रमांतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. हा उपक्रम उमेदच्या जिल्हा अभियान व्यवस्थापक वनिता डोंगरे व जिल्हा व्यवस्थापक गोरक्षनाथ भांगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असून, टेक्नो सर्व्ह व से-ट्रीज या संस्थांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभत आहे.

या कार्यक्रमास तालुका अभियान व्यवस्थापक सचिन ठोकळ, प्रभाग समन्वयक अविनाश चव्हाण, टेक्नो सर्व्हचे चंद्रवीर सिंह व मुचिंथला पवन कुमार तसेच से-ट्रीजचे प्रसाद गिरी व निलेश अटकारे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक शेती पद्धती, झाडांची लागवड व योग्य देखभाल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

वृक्ष लागवडीमुळे जमिनीचा कस वाढणे, पाण्याचे संवर्धन होणे तसेच जैवविविधतेला चालना मिळणे अपेक्षित आहे. शेतकरी बांधवांनी उत्साहाने सहभाग घेत शेतात व शेताच्या बांधावर आंबा, रक्तचंदन, महोगणी,




साग आदी विविध प्रकारची झाडे लावली.

हा उपक्रम ग्रामीण भागातील हरित कवच वाढविण्यासाठी व शाश्वत शेतीला चालना देणारा ठरत असून, भविष्यात शेतकऱ्यांचे उत्पादन व उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. यशस्वी महिला शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेडच्या संचालक मंडळातील अनिता माळी, विजया आळंगे, मनीषा करभारी, रुपाली करभारी, सरोजा गावडे, सुमित्रा शिंदोरे, कविता भोसले, कल्पना शिंदे, जयश्री म्हेत्रे व विठाबाई मडोळे यांनी या उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष योगदान दिले.

या उपक्रमामुळे महिलांचा शेतीतील सहभाग वाढत असून त्यांच्या नेतृत्वाला बळ मिळत आहे. स्थानिक पातळीवर पर्यावरण संरक्षणाचा संदेश देणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरत आहे.

## रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत धाराशिव येथे अवयवदान जनजागृती कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने दि.१ जानेवारी २०२६ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत जिल्हाभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्यात आले. त्याच अनुषंगाने दि.२७ जानेवारी २०२६ रोजी आरोग्य विभागाच्या सहकार्याने अवयवदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव येथे जिल्हा शल्य चिकित्सक, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने वाहन चालक व मालक, मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे चालक, कार्यालयात आलेले शिकाऊ व पक्के परवाना उमेदवार तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी अवयवदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. प्रशांतराव साळी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार दरवर्षी रस्ता सुरक्षा अभियान राबविले जाते. अपघातांचे प्रमाण कमी करणे व नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी अशा कार्यक्रमांद्वारे जनजागृती केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. रक्तदाना प्रमाणेच अवयवदानासाठीही नागरिकांनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. अपघातग्रस्त व्यक्तींच्या अवयवदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. त्यामुळे अपघातातील रुग्णांच्या नातेवाईकांनी अवयवदानाचे महत्त्व समजून घेऊन त्यासाठी सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयातील डॉ. विक्रम राठोड, डॉ. शिवाजी फुलारे व डॉ. अर्चना गुट्टे यांनी अवयवदानाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अवयवदान हे महादान असून जीवनापलीकडचे वरदान आहे. मृत्यूनंतर हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुस, स्वादुपिंड, त्वचा, डोळे व हाडे आदी अवयव गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी देणे हा मानवतेचा सर्वोच्च उपकार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. योग्य अवयव उपलब्ध न झाल्यामुळे दरवर्षी हजारो रुग्ण मृत्युमुखी पडतात, तर अनेक रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत वेदनादायी जीवन जगत असल्याचे सांगण्यात आले.

नेत्रदानामुळे अंध व्यक्तींना नवी दृष्टी मिळू शकते. अवयवदानासाठी वयाची अट नसून अवयवांची गुणवत्ता महत्त्वाची असल्याचेही त्यांनी नमूद केले. अवयवदानासाठी यांच्या संकेतस्थळावर किंवा स्थानिक रुग्णालयात ऑर्गन डोनर कार्डसाठी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमास मोटार वाहन निरीक्षक अनिल खेमनार, पूनम पोळ, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कुणाल होले, महेबूब मुसा सय्यद, वाघ, अधिक्षक डी.के. लोंढे, नरसिंह कुलकर्णी, ए.आर. राऊत, बालाजी वाघमारे, रमेश कऱ्हाळे, संध्या राणी गवाड, करिष्मा लोहार तसेच शिपाई दत्तू सरपे, एस.जी. काळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कुणाल होले यांनी आभार प्रदर्शन केले.

## नळदुर्गमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ जानेवारी -**

नळदुर्ग येथे दि.२६ जानेवारी रोजी भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील सर्व शाळा, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय कार्यालयांवर राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला.

प्रजासत्ताक दिनाचा मुख्य ध्वजारोहण समारंभ सकाळी १०.१५ वाजता नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यावर पार पडला. यावेळी अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते, नगराध्यक्ष बसवराज धरणे व उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. याप्रसंगी उद्देशिकेचे वाचन करण्यात आले तसेच नळदुर्ग पोलिसांच्या वतीने राष्ट्रीय ध्वजाला सशस्त्र मानवंदना देण्यात आली.



शहरातील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अध्यापक विद्यालय, सर्व जिल्हा परिषद व खाजगी शाळा, महामार्ग पोलिस केंद्र, वीज वितरण कंपनी कार्यालय, नळदुर्ग बसस्थानक, सर्व बँका, हुतात्मा स्मारक, चावडी चौक, पोस्ट ऑफिस, उपजिल्हा रुग्णालय, क्रांती चौक, पोलीस ठाणे तसेच नगरपालिकेत विविध मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नगरपालिकेत नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार, सर्व नगरसेवक, नगरपालिका कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी पत्रकार आयुब शेख यांनी नगराध्यक्ष बसवराज धरणे व अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना भारतीय संविधान ग्रंथाची प्रत भेट दिली.

या कार्यक्रमास नगरसेवक तानाजी जाधव, इमाम शेख, निरंजन राठोड, प्रविण गायकवाड, रिझवान काझी, लोकतंत्र सेनानी बलभीमराव मुळे, किशोर नळदुर्गकर, शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख ज्ञानेश्वर घोडके, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले, उपतालुका प्रमुख सरदारसिंग ठाकूर, भाजपचे पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, पत्रकार विलास येडगे, लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड, पप्पू पाटील, बंडप्पा कसेकर, पुरातत्व विभागाचे किल्ला प्रभारी नागनाथ गवळी, तलाठी कार्यालयातील कर्मचारी, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष कुरेशी, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा जाधव यांच्यासह शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कळंब तालुक्यात घरफोडी; साडेसात लाखांचा मुद्देमाल लंपास



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

निशिकांत भागवत पाटील (वय ५७, रा. मस्सा खंडेश्वरी, ता. कळंब, जि. धाराशिव) यांच्या राहत्या घराचे कडी-कोंडा अज्ञात व्यक्तीने कापून घरात प्रवेश करून घरफोडी केल्याची घटना दि.२५ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास घडली.

या घरफोडीत पाटील यांच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम १०,००० रुपये तसेच बापुराव बाबुराव इंगोले (वय ६६, रा. मस्सा खंडेश्वरी) यांच्या घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम ३५,००० रुपये असा एकूण ७,३२,३८५ रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्याने लंपास केला आहे.

या प्रकरणी फिर्यादी निशिकांत पाटील यांनी दि.२७ जानेवारी रोजी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास कळंब पोलीस करीत आहेत.



## शोक संदेश...



### हृदय पिळून टाकणारी घटना

प्रशासनातील मजबूत पकड असलेले उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन, हृदय पिळून टाकणारी घटना आहे. अजितदादा पवार यांनी नेहमी तळागाळातील शेतकरी आणि कामगारांच्या भावना समजून, त्यांच्या समस्या सोडवण्यावर लक्ष केंद्रित केले. शेतीविषयक त्यांचे प्रेम आणि दूरदृष्टीमुळे राज्यभरातील लहान शेतकरी आणि ग्रामीण नागरिकांना धोरणांचा प्रत्यक्ष फायदा मिळाला. अनेक विकास उपक्रम आणि शेतकरी हिताचे निर्णय त्यांच्या नेतृत्वामुळे यशस्वी ठरले, ज्यामुळे जनतेवर त्यांचा ठसा कायम राहिला. आज त्यांच्या अनुपस्थितीमुळे जाणवणारा रिकामा ठसा न भरून येणारा आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबियांना ही दु:खद वेळ सहन करण्याची ताकद देवो.



**- सुधीर घोलप,** भाजप, वाशी तालुका उपाध्यक्ष

### बातमी मनाला सुन्न करणारी

अजितदादा यांची बातमी मनाला सुन्न करणारी आहे. दादांची काम करण्याची पद्धत मी जवळून पाहिली आहे. काही कामानिमित्त तीन वेळा माझी आणि दादांची प्रत्यक्ष भेट झाली होती; त्यापैकी एक भेट कुटुंबीय कार्यक्रमात झाली. प्रशासनातील त्यांचा प्रचंड अनुभव, निर्णयक्षमता आणि राजकारणातील मजबूत पकड हे गुण प्रत्यक्ष अनुभवताना त्यांच्या नेतृत्वाची उंची प्रकर्षाने जाणवली. अशा कर्तृत्ववान नेतृत्वाचे जाणे राज्यासाठी मोठी हानी आहे. त्यांच्या आठवणी आणि कार्य सदैव मार्गदर्शक ठरतील.



**- प्रशांत बाबा चेडे,** शिवसेना (ठाकरे गट) नेते, वाशी

### कर्तव्यदक्ष नेतृत्वाचा असा दुर्दैवी अंत

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांचे अपघाती निधन अत्यंत दुर्दैवी आहे. अशा कर्तव्यदक्ष नेतृत्वाचा असा दुर्दैवी अंत खूपच वेदनादायक आहे. दादांच्या निधनाने महाराष्ट्र राज्याने एक महान नेत्याला हरवले असून, त्यांच्या योगदानाची भरपाई कधीही होऊ शकणार नाही. शिवसेना वाशी तालुका पवार परिवारासोबत त्यांच्या दु:खात सहभागी आहे. दादांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**- ॲड. सत्यवान गपाट**
तालुका प्रमुख, शिवसेना वाशी

### एक कर्तृत्ववान व प्रभावी नेतृत्व गमावले

रोखठोक भूमिका, दूरदृष्टी, राज्याच्या कानाकोपऱ्यातील माहितीची सखोल जाण आणि राजकारण-समाजकारणात तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेली लोकप्रिय ओळख असलेले नेते अजितदादा पवार यांचे विमान अपघातात झालेले निधन अत्यंत धक्कादायक व मनाला तीव्र वेदना देणारे आहे. महाराष्ट्राने एक कर्तृत्ववान व प्रभावी नेतृत्व गमावले आहे.



**- सुरेश बप्पा कवडे**, भाजप नेते, वाशी

### मी निशब्द...

या घटनेला कोणत्या शब्दात व्यक्त व्हावे ही माझी भावना आहे. मी निशब्द आहे ज्या नावावर आमचं राजकारण, समाजकारण उभं राहिलं तो आधारच गेल्याने माझी आणि माझ्यासारख्या तमाम अजितदादा प्रेमी कार्यकर्त्यांवर आभाळ कोसळलं आहे. अजित दादा या लोकनेत्याला विनम्र आदरांजली.



**- सूर्यकांत सांडसे,** राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष वाशी

# दादांच्या निधनाचा इम्पॅक्ट धाराशिव जिल्ह्यात प्रचारावर!

**कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये शोकभावना... प्रचारापेक्षा श्रद्धांजली आणि शोकसभांवर भर... दिग्गज नेत्यांच्या नियोजत सभा रद्द...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्रातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील राजकीय वातावरणावर मोठा परिणाम झाला आहे. या घटनेमुळे सलग दोन दिवस जिल्ह्यात निवडणूक प्रचार थंड अवस्थेत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

निधनाच्या धक्कादायक बातमनंतर सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आपल्या प्रचार कार्यक्रमांना तात्पुरती स्थगिती दिली. नियोजित जाहीर सभा, प्रचार फेऱ्या आणि बैठका रद्द किंवा पुढे ढकलण्यात आल्या. विशेषतः अजित पवार यांच्या सासुरवाडी तेर परिसरात शोकाचे वातावरण अधिक गडद असून, तेथील प्रचार जवळपास पूर्णपणे थांबलेला आहे.

कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये दु:खाची भावना असून, प्रचाराऐवजी श्रद्धांजली सभा, मौन पाळणे आणि शोक व्यक्त करण्यावर भर दिला जात आहे. रस्त्यांवरील प्रचार वाहनांची वर्दळ कमी झाली असून, पोस्टर-बॅनर काढून टाकण्यात आल्याचेही



काही ठिकाणी दिसून आले.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचे वेळापत्रक कायम ठेवले आहे. त्यामुळे प्रचार दोन दिवस थंड असला तरी, येत्या काळात निवडणूक रणधुमाळी पुन्हा वेग घेण्याची शक्यता आहे.

एकूणच, अजित पवार यांच्या निधनाचा धाराशिव जिल्ह्यातील निवडणूक प्रचारावर तात्पुरता पण ठळक परिणाम झाला असून, दोन दिवस जिल्ह्यात शांत आणि शोकमय वातावरण पाहायला मिळाले.

निधनाच्या बातमीनंतर अनेक राजकीय पक्षांनी प्रचार कार्यक्रमांना तात्पुरती स्थगिती दिली आहे. धाराशिव जिल्ह्यातील तसेच सासुरवाडी तेर परिसरातील काही जाहीर सभा रद्द करण्यात आल्या असून, प्रचार फेऱ्या आणि बैठका पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये शोकभावना असून, प्रचारापेक्षा श्रद्धांजली आणि शोकसभांवर भर दिला जात आहे.

सासुरवाडी तेर परिसरात अजित पवार यांचा वैयक्तिक आणि राजकीय संपर्क मोठ्या प्रमाणात असल्याने, तेथील वातावरण अधिक भावनिक झाले आहे. काही ठिकाणी स्वयंस्फूर्तीने फलक, बॅनर काढून श्रद्धांजली अर्पण करण्यात येत असून, प्रचाराची गती लक्षणीयरीत्या मंदावली आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, अजित पवार यांचा प्रभाव पश्चिम महाराष्ट्रात अधिक असला तरी धाराशिव जिल्हा आणि त्यांच्या सासुरवाडी तेर परिसरात त्यांच्या निधनाचा प्रचारावर थेट भावनिक परिणाम झाला आहे. आगामी काही दिवसांत प्रचार पुन्हा सुरू होण्याची शक्यता असली, तरी सध्याचे वातावरण शोकमय असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

## परंडा तालुक्यात जि.प. व पं.स. निवडणुकीत चौरंगी-बहुरंगी लढतीचे चित्र स्पष्ट



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२९ जानेवारी -**

परंडा तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीत चौरंगी व बहुरंगी लढती होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. जवळा (नि.) गटात अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी दि.२७ जानेवारी रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत उमेदवारी मागे न घेतल्याने निवडणुकीचे संपूर्ण चित्र समोर आले आहे.

जवळा (नि.) गटात अपक्ष उमेदवार धनंजय सावंत यांच्यासह शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात चौरंगी-बहुरंगी आणि काट्याची लढत होणार आहे.

या गटातून रमेश कारकर (शिवसेना शिंदे गट), श्रीगणेश चोबे (शिवसेना उबाठा), नानासाहेब पवार (राष्ट्रवादी काँग्रेस - घड्याळ), सुरेश पाटील (मनसे), गुरुदास कांबळे (प्रहार) तसेच धनंजय सावंत (अपक्ष) हे प्रमुख उमेदवार रिंगणात आहेत.

जवळा (नि.) जिल्हा परिषद गटाचे अपक्ष उमेदवार धनंजय सावंत यांना आठवले गटाने जाहीर पाठिंबा दिला आहे. याबाबतचे अधिकृत पाठिंब्याचे पत्र रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे प्रदेश सचिव संजयकुमार बनसोडे यांनी धनंजय सावंत यांना दिले आहे.

याशिवाय कमलाकर खैरे, बिभीषण चोबे, नुरजहाँ शेख व डॉ. प्रशांत मांजरे हेही अपक्ष उमेदवार नशीब आजमावत आहेत.

जवळा (नि.) गटात खरी लढत शिवसेना (शिंदे गट) व अपक्ष उमेदवार धनंजय सावंत (छत्री चिन्ह) यांच्यात होण्याची शक्यता असून, शिवसेना (उबाठा) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) हेही या गटात चांगली टक्कर देऊ शकतात, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

## खानापूर शिवारात शेतातील स्प्रिंकलरची चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

सदाशिव हरिश्चंद्र राठोड (वय ७०, रा. घाटंग्री, ता. जि. धाराशिव) यांच्या खानापूर शिवारातील शेत गट क्रमांक ४४ मधील स्प्रिंकलरचे १६ नग, एकूण १५,००० रुपये किमतीचे, अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना दि.२६ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास घडली.

या प्रकरणी फिर्यादी सदाशिव राठोड यांनी दि.२७ जानेवारी रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास धाराशिव शहर पोलीस करीत आहेत.

## धाराशिवात 'गुलमोहर' भित्तिपत्रिकेचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

धाराशिव येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त विवेकानंद वार्षिक अंक संपादक मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'गुलमोहर' भित्तिपत्रिकेचे प्रकाशन प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रास्ताविकात संपादक प्रा. राजा जगताप यांनी गुलमोहर भित्तिपत्रिकेची परंपरा महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सुरू असल्याचे सांगून, विद्यार्थ्यांच्या नवोदित साहित्याला व्यासपीठ मिळावे यासाठी वर्षभर विविध थीमवर भित्तिपत्रिकेचे प्रकाशन केले जाते, असे नमूद केले.

प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांनी विद्यार्थ्यांच्या साहित्य लेखनाला प्रोत्साहन मिळत असल्याचे सांगून निवडक साहित्यिक विद्यार्थ्यांचे कौतुक केले व सातत्याने लेखन करण्याचे आवाहन केले.

यावेळी उपप्राचार्य प्रा. बबन सूर्यवंशी, नॅक समन्वयक प्रा. डॉ. मंगेश भोसले, संपादक मंडळातील सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या भित्तिपत्रिकेसाठी मराठी विभागातील बी.ए. भाग १ मधील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## नॅचरल शुगरमध्ये गाळप हंगामाच्या १००१११ व्या साखर पोत्याचे पुजन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

नॅचरल शुगर ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीज लि. रांजणी कारखान्याचा चालू गाळप हंगाम यशस्वीरित्या सुरू असून हंगामातील उत्पादीत ९ लाख १११ व्या साखर पोत्याचे पजून ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून नॅचरल उद्योग समुहाचे संस्थापक अध्यक्ष कृषिरत्न बी.बी. ठोंबरे यांचे शुभहस्ते व सुनिल दळवी, शास्त्रज्ञ, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी पुणे यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी बोलताना ठोंबरे म्हणाले, चालू गाळप हंगाम २०२५-२६ मध्ये नॅचरल शुगरने १३.०० लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्यीष्ट ठेवलेले असून कारखान्याचे ऊस गाळप दैनंदीन ७७०० मे.टन याप्रमाणे सुरू आहे.

त्यामुळे चालु गाळप हंगामामध्ये उद्यीष्टाप्रमाणे एकूण १३.०० लाख मे.टन ऊसाचे गाळप करण्यासाठी ऊस उत्पादकांनी कारखान्याकडे नोंदणी केलेल्या ऊसाची इतरत्र विल्हेवाट न करता नोंदवलेल्या सर्व ऊसाचा पुरवठा नॅचरल शुगरलाच करून सहकार्य करावे असे आवाहन बी.बी. ठोंबरे, यांनी यावेळी केले.

नॅचरल शुगरने चालू गाळप हंगामात गाळपास आलेल्या ऊसास दिलेली पहिली उचल मराठवाड्यात सर्वात जास्तीची असून अंतीम ऊस दर देखील सर्वात जास्तीचा राहणार असल्याचे त्यांनी आमचे प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

यप्रसंगी सुनिल दळवी यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट निर्मित वसंत ऊर्जा वापराची माहिती व शेती पिकासाठी त्यांचे होणारे फायदे या विषयी उपस्थित शेतक-यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

सदर प्रसंगी कारखान्याचे संचालक, प्रवर्तक, ऊस उत्पादक शेतकरी सभासद, अधिकारी, कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना उमरग्यात भावपूर्ण श्रद्धांजली



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२९ जानेवारी -**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथील विमान अपघातात अकाली निधन झाल्याने उमरग्यात शोककळा पसरली. उमरगा नगरपरिषद कार्यालयाच्या वतीने दि.२८ जानेवारी रोजी प्रियतार्षणी सभागृहात विशेष शोकसभा आयोजित करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

सभेला नगरपरिषद कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सकाळी १० वाजता दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांच्या निधनाची शोकांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात लेखापाल कृष्णा काळे, संगणक अभियंता महेश शिंदे, शहर अभियंता राजन वाघमारे, सहाय्यक लेखापाल मनोज जंगले, विद्युत अभियंता प्रसाद माळी, पाणी पुरवठा अभियंता गणेश पुरी, कार्यालयीन अधीक्षक भैरवनाथ काळे, प्रशासकीय अधिकारी मुसा मुबारक, आस्थापना अधिकारी अरुणा कौडगावे आणि इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी अजित पवार यांचे योगदान व कार्यशैली आठवत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पित केली.

## अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची न भरून येणारी हानी : नगराध्यक्षा सुनंदा कापसे



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२९ जानेवारी -**

मी नगराध्यक्षा झाल्यानंतर बाजार समितीचे सभापती शिवाजी आप्पा कापसे व मी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली होती. सासरवाडीच्या अध्यक्षा असल्याने त्यांनी आम्हाला वेळ देत कळंबच्या विकासाबाबत सविस्तर चर्चा केली होती. कळंबच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली होती.

ते अर्थमंत्री असल्याने कळंब शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी मिळावा यासाठी लवकरच प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले होते. पक्ष कोणताही असो, विकासकामांमध्ये कधीही तडजोड न करणारे, निर्णयक्षम आणि स्पष्टवक्ते नेतृत्व अचानक आपल्यातून निघून गेल्याने महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे.

ही निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही.

असा नेता पुन्हा होणार नाही, अशा भावना नगराध्यक्षा सुनंदा शिवाजी कापसे यांनी व्यक्त करत दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

## धाराशिव प्रशालेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२९ जानेवारी -**

धाराशिव प्रशाला येथे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

धाराशिव जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती, धाराशिव प्रशाला, धाराशिव तसेच स्वामी रामानंद तीर्थ विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थितांनी अजित पवार यांच्या कर्तव्यनिष्ठ, समाजाभिमुख व मूल्यनिष्ठ कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यांच्या साध्या, संवेदनशील स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते, अशा भावना व्यक्त करण्यात आल्या. कार्यक्रमास संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## नळदुर्गमध्ये कडकडीत बंद; दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण




**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२९ जानेवारी -**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दि.२८ जानेवारी रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाल्याची बातमी समजताच नळदुर्ग शहर व परिसरात शोककळा पसरली. सर्वत्र सन्नाटा पसरला असून, एक दिलदार, स्पष्टवक्ते आणि कणखर नेतृत्व आपल्यातून निघून गेल्याची भावना नागरिकांत दिसून येत होती.

दि.२९ जानेवारी रोजी नळदुर्गकरांनी स्वयंस्फूर्तीने शहरात कडकडीत बंद ठेवून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. शहरातील मुख्य चावडी चौकात आयोजित शोकसभेत विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शोकसभेला नगराध्यक्ष बसवराज धरणे, दत्तात्रय दासकर, मारुती खारवे, तानाजी जाधव, आकाश कुलकर्णी, सुधीर पोतदार, रिझवान काझी, पांडुरंग पुदाले, संजय बताले, शफीभाई शेख, शहेबाज काझी, सुशांत भुमकर, स्वप्नील काळे, बलदेवसिंग ठाकूर, ज्ञानेश्वर घोडके, संतोष पुदाले, अजित जुनैदी, महेबुब शेख, सतीश पुदाले, सुभाष कोरे, दयानंद स्वामी, पद्माकर घोडके, धीमाजी घुगे, प्रमोद कुलकर्णी, समीर मोरे, मिनाजोद्दीन इनामदार, गौस इनामदार, खालेद इनामदार यांच्यासह सर्व पक्षीय कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## खामसवाडीत अजित पवार यांच्या निधनाने गावभर हळहळ

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२९ जानेवारी -**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अजित पवार यांचे बुधवारी सकाळी निधन झाले. ही दु:खद बातमी गावात येताच संपूर्ण खामसवाडीमध्ये हळहळ व्यक्त करण्यात आली.

सद्यस्थितीत होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराच्या गाड्यांवरील पक्षाचे झेंडे व स्टिकर सर्व राजकीय कार्यकर्त्यांनी काढले. गावाचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, अशोक शेळके, संजय पाटील, सुशील शेळके, प्रभाकर शेळके, निवडणूक उमेदवार व इतर राजकीय नेते व कार्यकर्ते उपस्थित राहून अजित दादांना श्रद्धांजली अर्पण केली.